मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष-फाल्गुन १९३६
जानेवारी - मार्च २०१५ / खंड ३८ अंक ४


- ... आर्थिक ...
- डॉ. व्य. सु. पाटणकर-एक प्रगल्भ ...
- केंद्रीय अर्थसंकल्प: अपेक्षा आ... नीती आ...
- ग्रामीण भारतातील शेतीक्षेत्राची वाटचाल
- भारतीय महिला बँकेची वाटचाल
- भारतीय अन्नसुरक्षा विधेयक
- ग्रामविकासात परंपरागत उद्योगांची भूमिका
- भारतीय आयुर्विमा महामंडळ: विश्लेषण
- अर्थ शब्दांची वाट पाहे

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जानेवारी-मार्च २०१५ / खंड ३८ अंक ४

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**

अविनाश रामलाल निकम

**सहाय्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१२-१५)

प्रशांत काटोले

अशोक खाचणे

राहुल म्होपरे

अशोक हळ्ळी

**संपादकीय पत्रव्यवहार**

डॉ.अविनाश निकम

मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

लेखातील मते लेखकांचीच

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवादः हिमवृष्टी, गारपीट अन् अर्थकारण........३४७

श्रीराम जोशी, जळगाव
भारतातील आर्थिक विषमता आणि दारिद्र्य..................३४९

यशवंत रारावीकर, कोलकाता
डॉ. व्यं. सु. पाटणकर-एक प्रगल्भ व्यक्तिमत्त्व..............३६१

राहूल म्होपरे, अर्जुननगर
केंद्रीय अर्थसंकल्पः अपेक्षा आणि वास्तव...................३६५

प्रशांत हरमकर, अमरावती
नीती आयोग................................................ ३७२

गजानन कदम, इंदापूर
ग्रामीण भारतातील शेतीक्षेत्राची वाटचाल.................. ३८३

हरिभाऊ गिलबिले, भूम
भारतीय महिला बँकेची भविष्यातील वाटचाल.......... ३८८

निकिता भोरे, सांगली
भारतीय अन्नसुरक्षा विधेयक.............................. ३९२

दिपक शेलार, चिंचणी
ग्रामविकासात परंपरागत उद्योगांची भूमिका............... ३९९

विरेंद्र वडेर, इस्पुर्ली,
भारतीय आयुर्विमा महामंडळ:आर्थिक विश्लेषण.......... ४०५

जयराम गायकवाड, अमरावती
परामर्श- केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-१६................. ४११

हेमराज चौधरी, आर्वी
पी.एच्डी. प्रबंधाचा सारांश.............................. ४१६

सूत्रसंचालकांचा अहवाल - ३८ वे अधिवेशन
दि.व्यं.जहागिरदार, विनायक भिसे, विनायक देशपांडे..... ४२०

विषयांची रूपरेषा - ३९ वे अधिवेशन
दि.व्यं.जहागिरदार, ज.फा.पाटील, धनश्री महाजन........ ४२८

कार्यवाहांचा अहवाल
आर. बी. भांडवलकर.................................. ४३८

प्रमुख संपादकांचा अहवाल
अविनाश रामलाल निकम.............................. ४४५

अर्थ शब्दांची वाट पाहेः ज. फा. पाटील, कोल्हापूर...... ४५१

उपक्रम थोडक्यात....................................... ४५२

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ २०१४-१५**

**अध्यक्ष**

श्रीराम देविदास जोशी (जळगाव)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

आर. बी. भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
मुक्ता जहागिरदार (अमरावती)
अर्जुन महाडिक (कोल्हापूर)

**सदस्य**

रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
अशोक खाचणे (जळगाव)
राजू शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नन्नवरे (अकलुज)
सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
बालाजी शिंदे (परभणी)
विद्या पाटील (धुळे)
रामेश्वर भिसे (अकोला)



**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.


**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)


मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१३-१४ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


**टिप:** म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय संवाद....

## हिमवृष्टी, गारपीट अन् अर्थकारण...

हे सगळं काही अनपेक्षितपणे मार्च महिन्यात याच वर्षी घडलं आहे. आर्क्टिक स्फोटाच्या कारणामुळे तब्बल पाच वर्षानंतर अमेरिकेच्या काही राज्यात जोरदार हिमवृष्टी झाली आहे. हीच परिस्थिती तेथे गेले काही दिवस राहिली. न्यू इंग्लंड अन् मिड-ईस्टमध्येही तापमानाचा पारा शून्याखाली गेला. तेथील फाईव्ह ग्रेट लेकमधून तीन लेक मार्चच्या पहिल्या आठवड्यात पूर्णपणे जमले. अमेरिकेतील अनेक शहरात परिणामी विज पुरवठा खंडित झाला. औद्योगिकरणाला त्याचा फटका बसला. १४० वर्षानंतर डेट्रॉयटचे सर्वाधिक थंड दिवस अनुभवास आले. परंतु शिकागोमध्ये १८७५ नंतर गारठ्याचे सर्व रेकॉर्ड्स् पार झाले आहेत. वॉशिंग्टनमध्ये ६ मार्च रोजी झालेल्या विक्रमी हिमवृष्टीने गेल्या १४२ वर्षांचा विक्रम मोडला. अगोदर १८७३ मध्ये एवढ्या तुफानी हिमवृष्टीची नोंद झाली होती. तेथील अनेक ठिकाणी पारा उणे १० पर्यंत गेला, अल्पावधीत २ फुटापर्यंत बर्फाचा थर जमिनीवर साचला. तो हटवण्यासाठी शहरात २०० स्नो-ब्रेकर्स लागले. ४३१६ हवाई उड्डाणे रद्द झाली. शहराचा हवाई संपर्क तुटला. अमेरिकेतील हिमवृष्टी थांबायला मार्चमधील शेवटच्या आठवड्यापर्यंत वाट पहाणं भाग पडलं. दरम्यान अर्थव्यवस्थेतील व्यवहार मंदावले. नद्यांमध्ये साठलेला बर्फ न वितळल्याने मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या अमेरिकेतील शिपींग बिझिनेसवर परिणाम झाला. नदीतील बर्फ आईसकटरने कापून मार्ग पूर्ववत करण्याचा प्रयत्न जहाजांद्वारे त्यांना करावा लागला.

नॉर्वेमध्ये बर्फावरून स्कीईंग करण्यास अनुकूल मोसम मार्चमध्ये मिळाला. अशा मोसमात हजारो विदेशी पर्यटक येथे येतात. यातील बहुतांश पर्यटकांचा उद्देश क्रॉसकंट्री स्कीईंगचा आनंद घेण्याचा असतो. त्या देशात बऱ्याच ठिकाणी स्कीईंग केली जाते. तेथील अनेक ट्रॅव्हल कंपन्यांकडून उंच पठारांवर साहसाची अनुभूती देण्याचा प्रयत्न असतो. पण नॉर्वेसारखा सुखद अनुभव अफगाणिस्तानच्या वाट्याला आला नाही. अफगाणिस्तानातील पारयन भागात हिमवृष्टीने काही दिवस नागरी जीवन ठप्प झालं. रक्त गोठविणाऱ्या थंडीमुळे नागरिकांवर घरातच स्थानबध्द होण्याची वेळ आली. स्थानिक बाजारपेठा ठप्प झाल्या. सरकारकडून या प्रांतातील पीडितांना हवाई मदत पाठवावी लागली.

जम्मू-काश्मिर, हिमाचल प्रदेश अन् उत्तराखंडमध्ये हिमवृष्टी झाल्यानं मार्चच्या पहिल्या दिवसापासून थंडीचा लाट सक्रीय झाली. हिमाचलचा मंडी परिसर, काश्मिरातील गुलमर्ग-सोनमर्ग अन् उत्तराखंडात हिमवृष्टी सुरू झाली. लगेच २ मार्च रोजी काश्मिर खोऱ्यात या हंगामातील सर्वाधिक हिमवृष्टी झाली. श्रीनगरसह राज्याच्या विविध भागात प्रचंड हिमवृष्टी झाल्याने रस्ते निर्मनुष्य झाले. हवाई वाहतुक

बंद पडली. बाजारपेठा ठप्प झाल्या. या हिमवृष्टीमुळे २९४ किलोमिटर लांबीचा श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. काश्मिरात खरं नुकसान केलं ते मार्चच्या शेवटच्या आठवड्यात आलेल्या अतिवृष्टीनं. या अतिवृष्टीमुळे इमारती, शेतीपीक, व्यापाराचं मोठं नुकसान होऊन जम्मू-काश्मिरची अर्थव्यवस्था कोलमडली. त्याच वेळी हिमाचल प्रदेशात झालेल्या मार्चच्या शेवटच्या आठवड्यातील हिमवृष्टीमुळे शिमला, कुलू-मनाली, कुफरी येथे जमिनीवर बर्फाचा थर साचल्याने लाखो पर्यटक आकर्षित झाले. तेथील बाजारपेठांमध्ये चैतन्य आलं.

महाराष्ट्राला मात्र गारपिटीचा चांगलाच फटका बसला. ११ ते १४ मार्च असे सलग ४ दिवस नाशिक व धुळे जिल्ह्यातील काही भागास गारपिटीचा तडाखा बसला. निफाड-देवळा तालुक्यात तुफान गारपीट झाली. हजारो हेक्टरवरील द्राक्षं, कांदा, डाळिंब, गहू यासारख्या पिकांचे कोट्यवधीचे नुकसान झाले. परिसरातील १४४ गावांना त्याचा फटका बसला. गारपिटीनं द्राक्षबागा भुईसपाट झाल्या. नाशिक जिल्ह्यातील ३२००० हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं. नागपूर परिसरातही १५ मार्च रोजी पावसासह गारपिट झाली. नागपूर शहरात रस्त्यांवर गारांचा खच होता. मराठवाड्यातील उस्मानाबाद, लातूर व नांदेड परिसरात अवकाळी पावसासह गारपीट झाल्यानं शेतकरी धास्तावले. फळबागांचं नुकसान झालं. या वर्षी महाराष्ट्राच्या विविध भागात गारपिटीनं शेतकऱ्यांचं नुकसान केलं. त्या शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळत नसल्याचा आरोप झाला. काही मंत्र्यांना रस्ता रोकोचा सामना करावा लागला. मुंबई-मनमाड रेल्वेमार्गावर रेलरोको झालं. महाराष्ट्राच्या शेतीक्षेत्रात समाधानकारक तर सोडाच पण चिंता करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. पूर्वानुमानानुसार २०१४-१५ मध्ये गेल्या वर्षाच्या तुलनेनं उस वगळता सर्व प्रमुख पिकांच्या उत्पादनात मोठी घट अपेक्षित आहे. गारपीट-अवकाळीने त्रस्त झालेल्या कृषिक्षेत्राच्या विकासदरात १२.३ टक्के घट अपेक्षित आहे. परिणामी महाराष्ट्र राज्याचा विकासदरही ७.३ टक्क्यांवरून ५.७ टक्क्यांवर घसरला आहे.

हिमवृष्टी असेल. अथवा गारपीट असेल. हे कुठंही झालं तरी त्याचा परिणाम दूरवर दिसतो. सामान्यपणे ग्राहक बाजारपेठा, पर्यटनक्षेत्र, आर्थिक व्यवहार, उर्जाव्यवस्था, शेअरबाजार, सरकारचा निधी, देशातील उत्पादक साधन-सामुग्री, सामान्य जनजीवन, सर्व प्रकारची वाहतुक, दळणवळण, वैयक्तिक व सरकारी अंदाजपत्रक, एकंदरीत अर्थव्यवस्थेवर लगेचच अथवा कालांतराने हा परिणाम निश्चितच दृष्टिपथात येतो, हेच खरं.

या अंकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो. अर्थसंवाद अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा करतो.

- अविनाश रामलाल निकम,

प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# भारतातील आर्थिक विषमता आणि दारिद्र्य
# राज्यस्तरीय विश्लेषण

**श्रीराम देविदास जोशी, जळगाव,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
मुळजी जेठा महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२१००८७७६,
ई-मेल: sdj.jalasri@gmail.com

*(मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला यांच्या विद्यमाने अकोला शहरात नोव्हेंबर २०१४ मध्ये संपन्न झाले. या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण....)*

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३८ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष ॲड. अरूणभाऊ शेळके (अध्यक्ष-श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) अधिवेशनाचे उद्घाटक डॉ. रविप्रकाश दाणी, कुलगुरू, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे गतवर्षीचे अध्यक्ष डॉ.जगन्नाथ पाटील, परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारूदत्त गोखले, कार्यवाह खजिनदार डॉ. राजेंद्र भांडवलकर, अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम, परिषदेचे कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त, उपस्थित सर्व माजी अध्यक्ष श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक कार्याध्यक्ष डॉ. सुभाष भडांगे, स्थानिक कार्यवाह डॉ. रामेश्वर भिसे, उपस्थित सर्व मान्यवर प्रतिनिधी या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पत्रकार, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि उपस्थित बंधु-भगिनींनो, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३८ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी निवड करून माझा आपण जो सन्मान केला त्याबद्दल सर्वप्रथम मी आपला अत्यंत ऋणी आहे. मराठी अर्थशास्त्र परिषद अर्थशास्त्राचे लेखन व अध्ययन

मराठी माध्यमातून व्हावे, अर्थशास्त्रीय प्रश्नांची सैद्धांतिक व व्यावहारिक दृष्टीकोनातून चर्चा घडवून आणावी आणि सामान्यांचे प्रबोधन करावे या उद्देशाने १९७७ साली स्थापन झाली. परिषदेमार्फत प्रतिवर्षी तीन दिवसांचे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन व विविध व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात येते. अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना अर्थशास्त्रीय प्रश्नांचे लेखन करण्याची संधी मिळावी म्हणून १९७७ पासून परिषद अर्थसंवाद हे त्रैमासिक नियमितपणे प्रसिद्ध करत आहे.

परिषदेच्या आज पर्यंतच्या विकासात अनेक व्यक्तींनी मोलाचे योगदान दिले आहे. त्या सर्वांप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. माझे गुरू दिवगंत डॉ. र.पु. कुरूलकर व डॉ. कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली मी परिषदेत सहभागी होण्यास सुरू केली. या दोघांप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. अकोला ही डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची कर्मभूमी आहे. डॉ. पंजाबराव देशमुखांच्या प्रेरणेने अकोला परिसरात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक संस्थेचा विस्तार झाला आहे. तसेच याच शहरात कृषी संशोधनात अग्रेसर असणारे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठही आहे. अकोल्याच्या परिसर संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेला आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या अकोला शहरात व प्रामुख्याने याच महाविद्यालयात मराठी अर्थशास्त्र परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन दुसऱ्यांदा होत आहे. यापूर्वी १० वे अधिवेशन १९८६-८७ मध्ये येथे संपन्न झाले होते.

वार्षिक अधिवेशनात अध्यक्षांनी एखाद्या ज्वलंत प्रश्नावर भाष्य करावे अशी प्रथा परिषदेने जोपासली आहे. अध्यक्षीय भाषणात मी *भारतातील आर्थिक विषमता आणि दारिद्र्य - राज्यस्तरीय विश्लेषण* या विषयाचा उहापोह करणार आहे. आर्थिक विषमतेमुळे राहणीमानाच्या दर्जामध्ये कमालीची विषमता निदर्शनास येते. आर्थिक विषमता म्हणजे समानतेपासून दूर जाणे होय, म्हणजेच एखाद्या व्यक्तीला त्याच्या उत्पन्नातील हिश्श्यापेक्षा कमी उत्पन्न मिळणे होय. आर्थिक वंचिततेचा संबंध दारिद्र्याशी जोडला जातो. दारिद्र्यात एखाद्या व्यक्तीला जीवन जगण्यासाठी आवश्यक तेवढी साधने मिळत नाहीत. आर्थिक विषमता ही संकल्पना व्यापक आहे. यात दारिद्र्य आणि कल्याण या दोन्हींचा समावेश होतो. दारिद्र्याच्या संकल्पनेपेक्षा आर्थिक विषमता ही संकल्पना व्यापक आहे. कारण आर्थिक विषमतेत संपूर्ण विभाजनाचा विचार केला जातो. दारिद्र्यामध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या उत्पन्न वितरणाचा विचार केला जातो.

विभागा-विभागामधील आर्थिक विषमता वाढत आहे आणि गरीब राज्य आणि श्रीमंत राज्य असा भेद निर्माण होत आहे. त्यामुळे आर्थिक विषमतेकडे धोरणकर्त्यांनी ताबडतोब लक्ष देण्याची गरज आहे. वाढती आर्थिक विषमता समानतेशी निगडीत तर आहेच शिवाय त्याचे आर्थिक व राजकीय व्यवस्थेवर परिणाम होतात. भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने उत्पन्नाचे विभागीय वितरण हा मुद्दा अत्यंत योग्य आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील राज्यांमधील आर्थिक विषमतेत काळाच्या ओघात होत गेलेल्या बदलांचे विश्लेषण करणे योग्य ठरेल.

आर्थिक विषमता हा केवळ

व्यासपीठावर चर्चा करण्याचा विषय नाही. हा विषय प्रत्येक व्यक्तीशी संबंधित आहे. आर्थिक विषमतेची पातळी, कारणे आणि त्यात होणारे बदल यावर सातत्याने चर्चा घडून येत आहेत. आर्थिक विषमता आर्थिक वृद्धीला मदत करते तर आर्थिक वृद्धीमुळे आर्थिक विषमता वाढते असे म्हटले जाते. याबाबतच्या साहित्याचा परामर्श घेतला असता आर्थिक विषमतेचा भविष्यातील आर्थिक विकास व वृद्धीवर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास येते. मोठ्या प्रमाणावरील विषमता सामाजिक दृष्टीकोनातून योग्य नाही. त्याचे सामाजिक प्रगती व सामाजिक सौहार्दावर विपरीत परिणाम होत असतात.

आर्थिक विषमता मोजण्याचे कारण नियोजनकर्त्यांना मार्गदर्शन करणे हे असते. समजा आर्थिक विषमतेमध्ये वाढ होत आहे असे निदर्शनास आले तर त्यासाठी ताबडतोब काही तरी उपाय करणे आवश्यक ठरते.

आर्थिक विषमता कमी होणे अपेक्षित असते. परंतु विषमता कशी मोजायची याबाबत एकमत नाही. आर्थिक विषमता मोजण्यासाठी अनेक पद्धतींचा उपयोग केला जातो. या सर्व पद्धतीमध्ये गिनी सहगुणक ही सर्वसामान्य पद्धती आहे.

आर्थिक विषमता मोजण्यामध्ये गिनी सहगुणकाचे स्थान महत्त्वाचे आहे. गिनी सहगुणकाच्या सहाय्याने देशांतर्गत काळाच्या ओघात उत्पन्न वितरणात कसे बदल झाले याचा अभ्यास करता येतो व विषमता वाढली की कमी झाली हे पाहता येते. जितका कमी गिनी सहगुणक तितकी विषमता कमी, शून्य सहगुणक म्हणजे पूर्णपणे समानता होय. गिनी सहगुणक जितका जास्त तितकी विषमता जास्त व एक गिनी सहगुणक म्हणजे संपूर्ण विषमता होय.

### जागतिक व आशियाई देशातील विषमता :

तक्ता क्र. १ मध्ये जागतिक व आशियाई देशातील विषमता (गिनी सहगुणक) दर्शविली आहे. जागतिक पातळीवरील गिनी सहगुणक १९९३-२००५ या कालावधीत सातत्याने घटला आहे. म्हणजेच या कालावधीत जागतिक पातळीवरील विषमतेत घट झाली आहे. १९९३ मध्ये जागतिक पातळीवर गिनी सहगुणक ०.७००० होता तो २००० मध्ये ०.६९०४ पर्यंत कमी झाला त्यानंतर २००५ मध्ये गिनी सहगुणक आणखी कमी होवून तो ०.६७७३ इतका झाला. आशिया खंडातील विषमतेत झालेले बदलही या तक्त्यात वर्णन केले आहेत. १९९३ मध्ये आशियाई देशांचा गिनी सहगुणक ०.५६६५ होता तो २००५ मध्ये ०.४६०९ इतका कमी झाला. म्हणजेच जागतिक पातळीपेक्षा आशियाई देशात आर्थिक विषमता कमी आहे व ती त्यातील घट होण्याचा वेग जागतिक पातळीपेक्षा जास्त आहे.

तक्ता क्र. १

जागतिक व आशियाई देशातील विषमता (गिनी सहगुणक)

| | १९९३ | २००० | २००५ |
|---|---|---|---|
| जागतिक | ०.७००० | ०.६९०४ | ०.६७३३ |
| आशियाई | ०.५६६५ | ०.५२९३ | ०.४६०९ |

*स्त्रोत : ADBI आशियाई विकास बँक संस्था, Working Paper - 458*

तक्ता क्र. २

भारतातील विषमता आणि दारिद्रय

| भारत | १९९२ | २००० | २००५ | २०१० |
|---|---|---|---|---|
| सरासरी उत्पन्न | ४६.७७३ | ५२.६४३ | ५३.९०६ | ५९.९२९ |
| शहरी | ५५.९३४ | ५९.०५० | ६२.३२० | ७३.०६० |
| ग्रामीण | ४३.८८१ | ४८.७८७ | ४९.८५३ | ५४.६०० |
| गिनी सहगुणक | ०.३०९८ | ०.३१०३ | ०.३३३७ | ०.३२८४ |
| शहरी | ०.३४३३ | ०.३४८८ | ०.३७६२ | ०.३९२६ |
| ग्रामीण | ०.२८६३ | ०.२८१२ | ०.२९९९ | ०.२९३७ |
| दारिद्रयाचे प्रमाण | ४९.२० | ४०.३७ | ४०.९६ | ३३.१२ |
| शहरी | ४०.८८ | ३६.१० | ३६.४१ | २८.६१ |
| ग्रामीण | ५२.१५ | ४२.९५ | ४३.१२ | ३४.९६ |
| गरीबांची संख्या (दशलक्ष) | ४४२.५४१ | ४६८.५७२ | ३८९.८१० | ३७७.५६५ |
| शहरी | ९६.१९२ | १५७.४३२ | ११२.०४७ | ९४.१४८ |
| ग्रामीण | ३४६.३४९ | ३११.१३७ | २७७.७६४ | २८३.४१६ |

*स्त्रोत : ADBI आशियाई विकास बँक संस्था, Working Paper - 458*

**भारतातील आर्थिक वृद्धीदर, विषमता व दारिद्र्यः**

१२७ कोटी लोकसंख्या असणारा हा भारत हा जगातील जास्त लोकसंख्या असणारा दुसरा देश आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा विचार केला असता भारत जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक अर्थव्यवस्था आहे. २०१० मध्ये भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न ३७.७ कोटी डॉलर इतके होते. २००५ ते २०१० या कालावधीत स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा वार्षिक वृद्धीदर जास्त होता. २०१० मध्ये वार्षिक वृद्धीदर १०.५% एवढा जास्त होता तर २००८ मध्ये ३.९% एवढा कमी वार्षिक वृद्धीदर होता. भारतात १९९० मधील अरिष्टातून बाहेर येण्यासाठी व आर्थिक विकास साध्य करण्यासाठी आर्थिक सुधारणांना सुरूवात झाली. त्यात २००० मध्ये आणखी सुधारणा करण्यात आल्या. सन २००० पासून इतर क्षेत्राच्या तुलनेत सेवाक्षेत्राचा विस्तार वेगाने झाल्यामुळे अर्थव्यवस्था विकसित झाली आहे. भारतात कृषी क्षेत्र महत्त्वाचे व सर्वात मोठे आहे ते आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. या कालावधीत देशात कृषी क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे व देश अन्नधान्याची आयात करणाऱ्या स्थितीतून अन्नधान्याचा प्रमुख निर्यातदार देश झाला आहे.

तक्ता क्र. २ मध्ये भारतातील आर्थिक वृद्धी दर, विषमता आणि दारिद्र्य याबाबतचे १९९२, २०००, २००५ व २०१० चे चित्र स्पष्ट केले आहे. १९९२ व २०१० या कालावधीत भारतात सरासरी उत्पन्नात वाढ झाली

तक्ता क्र. ३

## भारतातील निवडक लोकसंख्या समुहाच्या उत्पन्नातील हिस्सा

| भारत | १९९२ | २००० | २००५ | २०१० |
|---|---|---|---|---|
| खालचे % | ०.२७ | ०.२५ | ०.२५ | ०.२६ |
| ५% | १.७० | १.६३ | १.५८ | १.६१ |
| १०% | ३.८४ | ३.७१ | ३.५८ | ३.६३ |
| २०% | ६.९० | ८.७० | ८.३५ | ८.४६ |
| वरचे २०% | ४०.०० | ४०.१८ | ४२.११ | ४१.९१ |
| १०% | २५.३२ | २५.३९ | २७.३३ | २७.१६ |
| ५% | १५.७९ | १५.७७ | १७.६० | १७.३८ |

*स्त्रोत : ADBI आशियाई विकास बँक संस्था, Working Paper - 458*

आहे. उत्पन्न वृद्धीदर या सर्व कालावधीसाठी कमी असल्याचे निदर्शनास येते. शहरी व ग्रामीण दोन्ही भागात उत्पन्न वृद्धीदर कमी आहे.

भारताचा राष्ट्रीय गिनी सहगुणक तुलनेने स्थिर आहे. त्यात १९९२ ते २०१० ह्या कालावधीत अत्यंत कमी प्रमाणता वाढ झाली आहे. त्यामुळे या कालावधीत विषमतेची पातळी स्थिर आहे असे म्हणता येईल. शहरी व ग्रामीण भागासाठीचे गिनी सहगुणक तक्त्यात दर्शविले आहेत. शहरी भागात १९९२ मध्ये ०.३४३३ एवढी विषमता होती. तर ग्रामीण भागात शहरी भागापेक्षा कमी म्हणजे ०.२८६३ एवढी विषमता होती. २०१० मध्ये शहरी भागातील विषमतेत मोठ्या प्रमाणावर वाढ होऊन ती ०.३९२६ एवढी झाली तर ग्रामीण भागातील विषमता त्या मानाचे स्थिर ०.२९३४ एवढी राहिली आहे.

या तक्त्यावरून दारिद्र्याच्या प्रमाणात कसे बदल झाले हे ही स्पष्ट होते. १९९२ मध्ये एकूण लोकसंख्येच्या ४९.२% लोक अत्यंत दारिद्र्यात राहात होते. २०१० पर्यंत या स्थितीत चांगले बदल झाले व हे प्रमाण ३३.१२% वर आले. ग्रामीण आणि शहरी भागात देखील दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले आहे. १९९२-२०१० या कालावधीत साधारणतः ते १२ ते १७% ने कमी झाले आहे. दारिद्र्यात जीवन जगत असलेल्या लोकांची संख्या विचारात घेता १९९२ मध्ये ४४२.५४१ दशलक्ष लोक दारिद्र्यात राहात होते. ती संख्या २०१० मध्ये ३७७.५६५ दशलक्ष पर्यंत कमी झाली असली तरी आणखी खूप मोठी संख्या दारिद्र्यात जीवन जगत आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागात दारिद्र्यात जीवन जगणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

तक्ता क्र. ३ मध्ये भारतातील गरीब आणि श्रीमंताच्या उत्पन्नाच्या वाटपातील बदल दर्शविला आहे. खालच्या २०% लोकांचा १९९२ मध्ये उत्पन्नातील हिस्सा ८.९०% होता तो २००५ मध्ये ८.३५% पर्यंत कमी झाला आहे. २००५ ते २०१० या कालावधीत त्यात किंचीत वाढ होऊन तो ८.४६% पर्यंत पोहोचला आहे. याच कालावधीत वरच्या ५% श्रीमंत लोकांच्या

उत्पन्नाचा वाटा १९९२ मध्ये १५.७९% होता त्यात २०१० मध्ये १७.३८% पर्यंत वाढ झाली आहे. श्रीमंताच्या उत्पन्नात १०% वाढ झाली आहे. हे निदर्शनास येते.

### भारतातील आर्थिक वृद्धी :

राहणीमानाची पातळी आणि लोकांच्या दारिद्र्याचे स्वरूप ठरविणारा महत्त्वाचा घटक, उत्पन्न पातळी व त्यातील वाढ हा आहे. देश पातळीवरील तसेच राज्याच्या स्तरावरील आर्थिक वृद्धीबाबतचे विवेचन करणे त्यादृष्टीने महत्त्वाचे ठरते. स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात सातत्यपूर्ण वाढ होत आहे. १९७५ ते १९९० या काळात आर्थिक वृद्धी वेगाने झाली. मात्र १९९१ मध्ये आलेल्या आर्थिक आरिष्टामुळे अर्थव्यवस्था नियोजनाकडून बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेकडे वळली. आर्थिक सुधारणानंतर आणि प्रामुख्याने २००० ते २००५ दरम्यान स्थूल देशांतर्गत उत्पन्नात ८% ते ९% दराने वाढ झाल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाऊ लागली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेत स्थूल देशांतर्गत उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर रचनात्मक बदल देखील झाले आहेत. अर्थव्यवस्थेमधील रचनात्मक बदलामध्ये सेवाक्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे.

क्षेत्रीय वृद्धीचा दारिद्र्याशी जवळचा संबंध आहे. शेती क्षेत्रात झालेली वृद्धी ग्रामीण भागातील दारिद्र्यावर परिणाम करते, तर औद्योगिक व सेवाक्षेत्रातील वृद्धी शहरी व एकूणच दारिद्र्य कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते. तक्ता क्र. ४ मध्ये तिन्ही क्षेत्रातील दशवार्षिक वृद्धीदर

तक्ता क्र. ४

भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील वृद्धीदर आणि त्याचे घटक

| कालावधी | स्थूल देशांतर्गत उत्पन्न | कृषी व पुरक उपक्रम | उद्योग | सेवाक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १९५१-१९६१ | ३.९०१ | ३.०२९ | ६.१३८ | ४.४७८ |
| १९६१-१९७१ | ३.७२४ | २.३१३ | ५.३९६ | ४.८७९ |
| १९५१-१९७१ | ७.७१ | ५.४११ | ११.८६५ | ९.५७५ |
| १९७१-१९८१ | ३.०८८ | १.४९५ | ४.३४ | ४.१६५ |
| १९८१-१९९१ | ५.३७५ | ३.३९५ | ६.७१६ | ६.३२७ |
| १९५१-१९९१ | ५.३२७ | ३.२५७ | ६.९४६ | ६.६१५ |
| १९९१-२००१ | ५.१२७ | २.७६६ | ५.०२३ | ६.४६३ |
| २००१-२००९ | ६.००२ | २.४२६ | ५.१८८ | ७.४९५ |
| १९९१-२००९ | ११.९१३ | ५.२३३ | ११.१५७ | १५.०७९ |
| १९५१-२००९ | ४.७६८ | २.६५४ | ५.७७१ | ५.९२८ |

*स्त्रोत : रतन घोसाल - २०१२, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आकडेवारीवर आधारित*

(१९९३-९४ च्या स्थिर किंमतीनुसार) दर्शविले आहेत.

स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचा वार्षिक वृद्धीदर १९५१-६१ ते २००१-२००९ या सहा दशकात ३.९% ते ६.०% दरम्यान होता. कृषी क्षेत्राचा वार्षिक वृद्धी दर १.५०% ते ३.४% या दरम्यान होता. उद्योग क्षेत्राचा वार्षिक वृद्धीदर याच कालावधीत ४.३४% ते ६.७२% दरम्यान होता तर सेवा क्षेत्राचा वार्षिक वृद्धी दर या सहा दशकाच्या कालावधीत ४.१६५% ते ७.५% दरम्यान होता. आपण जर आर्थिक सुधारणांपूर्वीचे व नंतरचे स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचे व क्षेत्रीय उत्पन्नाचे विश्लेषण केले तर आर्थिक सुधारणांनंतरच्या काळात (१९९१ ते २००९) आर्थिक सुधारणांपूर्वीच्या काळाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास येते. १९५१ ते १९९१ या कालावधीत घटक किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचा वार्षिक वृद्धीदर ५.३३% होता. कृषीक्षेत्राचा ३.२६%, उद्योग क्षेत्राचा ६.९५% तर सेवा क्षेत्राचा ६.६२% वार्षिक वृद्धी दर होता तर १९९१ ते २००९ या आर्थिक सुधारणांच्या कालावधीत सेवा क्षेत्राच्या वार्षिक वृद्धी दरात १५.०८% इतक्या वेगाने वाढ झाली आहे. त्यानंतर उद्योग क्षेत्राचा वार्षिक वृद्धीदर ११.१६% आणि कृषी क्षेत्राचा वार्षिक वृद्धीदर ५.२३% एवढा होता. आर्थिक सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळाली हे मान्य करावेच लागेल, आर्थिक सुधारणांच्या काळात सेवा क्षेत्रात झालेल्या वेगवान वृद्धीमुळे हे शक्य झाल्याचे स्पष्ट होते.

**निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नातील वार्षिक संयुक्त वृद्धी दर:**

सोळा प्रमुख राज्यांच्या आकडेवारीत आधारित स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नातील दशवार्षिक वृद्धीदर (घटक खर्चावर आधारित) आणि आर्थिक सुधारणापूर्व व नंतरच्या कालावधीचे दशवार्षिक संयुक्त वृद्धी दरांचा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आकडेवारीचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, जवळपास सर्व राज्यांमध्ये १९६१ नंतरच्या पाच दशकात निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नाच्या वृद्धीदरात वाढीची प्रवृत्ती दिसून येते. बिहार, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश या राज्यात आर्थिक सुधारणांच्या पहिल्या दशकात निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नाच्या वृद्धीचा दर कमी नोंदविला गेला आहे. या वरून असे लक्षात येते की, बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेचे लाभ घेण्यात ही राज्ये यशस्वी ठरली नाहीत. आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँकेच्या धोरणावर आधारित आखलेल्या आर्थिक सुधारणांमध्ये सार्वजनिक क्षेत्रात निर्गुंतवणूक केल्यामुळे या राज्यात पहिल्या दशकात निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नाच्या वृद्धीदरात घट झाल्याचे निदर्शनास येते. बहुतेक सर्व राज्यात आर्थिक सुधारणांच्या काळात सुधारणापूर्वीच्या काळापेक्षा तसेच १९६१ नंतरच्या सर्वच कालावधीपेक्षा निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नामधील वृद्धीदर जास्त होता. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, आर्थिक सुधारणानंतरच्या कालावधीत सर्वच राज्यांमध्ये आर्थिक वृद्धीला चालना मिळाली तसेच ही राज्ये आर्थिक सुधारणांचे लाभ घेण्यात यशस्वी ठरली आहे. असेही म्हणता येईल की आर्थिक सुधारणांची प्रक्रिया राज्याराज्यातील विषमता कमी करण्यास उपयुक्त ठरली आहे.

**दरडोई निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नातील वृद्धी**

## दराची प्रगती:

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आणि EPW संशोधन संस्थेच्या सन २०१२ मधील आकडेवारीचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, सोळा प्रमुख राज्यातील दरडोई निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नातील (स्थिर किंमतीनुसार) वृद्धी दराची प्रवृत्ती आढळून आली आहे. जवळपास सर्व राज्यात दरडोई निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नाच्या वृद्धीदरात पंचवार्षिक चढउतारांसह अभ्यासाच्या काळात वाढ झाली आहे. कोणत्याही राज्यात सारख्याच दराने दरडोई निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नात वाढ झालेली नाही. आर्थिक सुधारणापुर्वीच्या काळातील आर्थिक वृद्धीची प्रगती पाहिली असता आंध्रप्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, हरियाणा, पंजाब, कर्नाटक ही राज्ये वृद्धीदर उच्च ठेवू शकली. १९८५ ते ९० या पाच वर्षात फक्त गुजरात राज्यात वृद्धी दर ऋण होता. आर्थिक सुधारणांच्या काळात जवळपास सर्वच राज्ये वृद्धीदर उच्च ठेवण्यात यशस्वी ठरली आहे. प्रामुख्याने २०००-२००५ व २००५-२०१० या कालावधीत काही राज्ये आर्थिक वृद्धीचा दर अत्युच्च पातळीवर ठेवण्यात यशस्वी ठरली आहेत. २००५-२०१० या कालावधीत काही राज्यात जसे महाराष्ट्र (९.८५%), तामीळनाडू (९.२%), बिहार (८.३२%), गुजरात (८.८९%), आंध्रप्रदेश (७.५०%), ओरिसा (६.७५%), केरळ (७.८५%), राजस्थान (७.३२%) आणि पश्चिम बंगाल (६.२९%), वृद्धी दर उच्च होता. आर्थिक सुधारणांच्या पहिल्या कालखंडात काही राज्यामध्ये वृद्धीदराबाबत शिथिलता आली होती. परंतु नंतर त्या राज्यांनी आर्थिक विकासदरात वाढ साध्य केली आहे. या आर्थिक वृद्धीचा दारिद्र्यावरील सकारात्मक परिणाम होणे अपेक्षित आहे. दरडोई निव्वळ राज्यांतर्गत उत्पन्नाच्या वृद्धी दरातील प्रगती बाबत राज्यांची तौलनिक स्थिती (श्रेणी) सारखी नाही. काळाच्या ओघात त्यात बदल होत गेले आहेत. आणखी एक नोंद घेण्यासारखा मुद्दा म्हणजे राज्य पातळीवरील वृद्धी दराच्या प्रगतीबाबत १९७१ ते २०१० या कालावधीत व १९९१-२०१० या आर्थिक सुधारणांच्या कालावधीत वृद्धी दरामध्ये भिन्नता आढळते.

## राज्याराज्यांतर्गत विषमता:

NSSO च्या आकडेवारीचा (रतन घोसाल, २०१२) अभ्यास केला असता असे निदर्शनास आले की, जर आपण राज्य पातळीवरील मासिक दरडोई उपभोग खर्चावर आधारित विषमता गिनी सहगुणकाच्या सहाय्याने मोजली तसेच राज्यपातळीवरील दरडोई निव्वळ राज्य उत्पन्नातील वृद्धीदराची प्रवृत्ती अभ्यासली व त्या दोहोंची तुलना केली तर विरोधाभासाचे चित्र निदर्शनास येते.

१९९४ ते २००५ या कालावधीत हिमाचल प्रदेशचा अपवाद वगळता इतर सर्वच राज्यांमध्ये उत्पन्न वितरणातील विषमतेत वाढ झालेली आहे. आर्थिक सुधारणांच्या कालावधीत केरळ, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, पंजाब, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, तामीळनाडू या राज्यात गिनी सहगुणकाचे मूल्य जास्त आहे. परंतु २००५ ते २०१० या कालावधीत केरळ राज्या व्यतिरिक्त इतर सर्व राज्यात विषमतेत घट झाल्याचे दिसून येते.

२००५ ते १० ह्या कालावधीत केरळमध्ये मोठ्या प्रमाणावर विषमतेत वाढ झाली आहे.

केरळच्या गिनी सहगुणकाचे मूल्य २०१० मध्ये ०.४५५ एवढे होते. संपुर्ण कालावधीचा विचार केला तर जवळपास सर्वच राज्यातील गिनी सहगुणक उच्च पातळीवर राहिला आहे. जर आपण राज्यांच्या वृद्धी दरातील प्रगती व आर्थिक विषमता यांची तुलना केली तर गुजरात, तामीळनाडू, केरळ, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, ओरीसा या राज्यात १९९५ ते २०१० या काळात आर्थिक वृद्धीदर उच्च आहे. त्याच सोबत विषमतेची तीव्रता देखील जास्त आहे. याउलट कर्नाटक, पश्चिम बंगाल यासारख्या राज्यांमध्ये आर्थिक वृद्धीदर उच्च आहे व आर्थिक विषमता घटली आहे. जर आपण २००५ ते २०१० या कालखंडातील वृद्धीदर व विषमता यांची तुलना केली तर वृद्धीदरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. मात्र केरळ व हिमाचल प्रदेशचा अपवाद वगळता इतर सर्व राज्यात विषमतेत घट झाली आहे. गिनी सहगुणक घटला आहे. अशीही काही राज्ये आहेत जेथे वृद्धीदर कमी आहे आणि उत्पन्न वितरणातील विषमता जास्त आहे. यावरून आर्थिक वृद्धीदर आणि आर्थिक विषमता यात एकच एक संबंध नाही. या संबंधात विरोधाभास आहे. आर्थिक वृद्धीचा विषमतेवर परिणाम होतो की विषमतेचा आर्थिक वृद्धीवर परिणाम होतो याबाबत शंका निर्माण होते.

**राज्याराज्यांतर्गत दारिद्र्याचा प्रवृत्ती आणि त्याचे स्वरूप:**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमुळे आणि शासकीय धोरणामुळे काही प्रमाणात दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली आहे. दारिद्र्य केवळ राष्ट्रीय पातळीवर कमी झाले आहे असे नाही तर राज्यपातळीवर ग्रामीण व शहरी भागा देखील दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. दारिद्र्याच्या दरात झालेले बदल लक्षात घेतले तर असे लक्षात येते की, १९७० पर्यंत दारिद्र्याच्या दरात विशेष बदल झाले नाहीत. सत्तरच्या दशकाच्या मध्यापर्यंत जवळपास ५१% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होती. सत्तरच्या दशकाच्या मध्यानंतर दारिद्र्याचे प्रमाण राष्ट्रीय व राज्यपातळीवर वेगाने कमी होवू लागले. १९७७-७८ आणि १९८७-८८ दरम्यान राष्ट्रीय पातळीवर दारिद्र्याचे प्रमाण ३९% पर्यंत कमी झाले. राज्यपातळीवरील दारिद्र्यातील बदलाचा अभ्यास करण्यासाठी नियोजन आयोगाच्या अंदाजांचा आधार घेतला आहे. २००४-०५ आणि २००९-१० मध्ये नियोजन आयोगाने दारिद्र्य मोजण्याच्या पद्धतीत बदल केले आहेत. लकडावाला पद्धतीऐवजी तेंडुलकर पद्धती वापरली जात आहे. दारिद्र्य मोजण्याच्या पद्धतीतील बदलामुळे दारिद्र्य रेषा वरच्या बाजूला स्थानांतरीत झाली आहे. त्यामुळे १९९९-२००० ते २००४-०५ दरम्यान दारिद्र्याच्या प्रमाणात थोडीशी वाढ झाल्याचे दिसून येते.

नियोजन आयोगाचे अंदाज(रतन घोसाल, २०१२) यामधील राज्यनिहाय दारिद्र्याची प्रवृत्तीचा अभ्यास केला असता असे निदर्शनास आले की, १९७३-७४ ते १९८३-८४ या कालावधीत बिहार वगळता इतर सर्व राज्यात दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली. त्याचप्रमाणे १९८३-८४ ते १९९३-९४ या कालावधीत देखील हरियाणा व हिमाचल प्रदेशचा अपवाद वगळता इतर राज्यात दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली आहे. आर्थिक सुधारणांच्या कालावधीत म्हणजेच १९९३-९४ ते २००९-

१० या काळात देखील जवळपास सर्वच राज्यात दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली आहे. १९९९-२००० आणि २००४-२००५ या कालावधीत मापन पद्धतीत बदल झाले. या कालावधीत दारिद्र्यरेषेखालील राहणाऱ्यांच्या प्रमाणात तुलनेने वाढ झाली आहे. याच कालावधीत लकडावाला पद्धतीने काढलेल्या आकड्यांची तुलना केली तर मध्यप्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, राजस्थान आणि ओरीसा ही राज्य वगळता बाकीच्या राज्यात दारिद्र्यात घट झाल्याचे दिसून येते. २००४-०५ ते २००९-१० या कालावधीतील तेंडुलकर पद्धतीने काढलेल्या अंदाजाचे अवलोकन केले तर असे लक्षात येते की, आसाम राज्याव्यतिरिक्त इतर राज्यात दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली आहे. २००९-१० च्या कॅलरीजवर आधारित अंदाजांचे निरीक्षण केले असता दारिद्र्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत. तेंडुलकर अंदाजापेक्षा कॅलरीजवर आधारित अंदाजामध्ये दारिद्र्याच्या घटीच्या प्रवृत्तीची तीव्रता कमी आहे. राज्यांच्या दारिद्र्य कमी करण्याच्या क्षमतेबाबतची तौलनिक स्थिती पाहण्यासाठी राज्यांना श्रेणी (Rank) दिली आहे. ज्या राज्यात दारिद्र्याचे प्रमाण सर्वात कमी त्या राज्याला पहिली श्रेणी दिली आहे. असे लक्षात येते की कोणतेही राज्य आपली श्रेणी (तौलनिक स्थिती) आहे तीच कायम राखण्यात यशस्वी ठरले नाही. दारिद्र्य कमी करण्याच्या क्षमतेबाबतच्या स्थितीवरून अभ्यास कालावधीत राज्यांच्या तौलनिक स्थितीत (श्रेणीत) मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत.

## संदर्भ सूची:


1) Ravindra H. Dholi Manish B. Pandya, Payal M. Pateria, *Urban Rural Income Differential in Major States : Contribution of Structural Factors*, IIM, Ahmedabad, Working paper no. 2014-02-07, February 2014.
2) Reeva Vanneman, Amaresh Dubey (2011), *Horizontal and Vertical Inequalities in India*, India Human Development Survery, Working Paper No. 16
3) Rossking Steward (1990), *Income Inequality and Economic Growth: The case of India*, Doctoral Thesis.
4) Saibal Kar, Shrabani Saha, *Corruption, Shadow Economy and Income Inequality : Evidence from Asia*, Discussion paper no. 7106, December 2012
5) Simon Kuznats, *Economic Growth and Income Inequality*, The American Economic Review, Vol. XLV, Number one, March, 1955
6) Thomas E. Weisskopf (2011), *Why Worry about Inequality in the Booming Indian Economy*, Economic and Political Weekly, November, 10, 2011, Vol. XLVI No. 47, pp. 41-51.
7) Thomas Piketty (2014), Translated by Goldhammer, *Capital in the Twenty First Century*, the Belknap Press of Harward University Press, London, 2014

8) Thomas Piketty and Nancy Qian, *Income Inequality and Progressive Income Taxation in China and India*, 1986-2015

9) UNDP, *Income Poverty and Inequality*, Human Development in India.

10) L. Sing (2012), *Extent and Changes in Income Inequality Across Incian States*

11) Lok Sabha Secretariate (2013), *Current Economic Scenario*

12) Madhura Swaminathan, Vikas Rawal, *Is India Really a Country of Low Income Inequality? Observations from Eight Villages*, Review of Agrarian Studies.

13) Madhura Swaminathan, Vikas Rawal, *Income Inequality in Village India : The Role of Caste*, ECINEQ 2011, Working Paper Solution.

14) Maries Daumal (2010), *Impact of trade openness on regional inequlity : The Case of India and Brazil*

15) Mehtabul Azam, Abusaleh Shariff (2011), *Income Inequality in Rural India, Decomposing the Gini by Income Sources*, Economic Bulletin, Vol. 30, Issue 1, pp. 739-748.

16) Nirvikar Sing, Laveesh Bhandari, Aoyu Chen, Aarti Khare (2002), *Regional Inequality in India : A Fresh Look*

17) OCED (2011), *Special Focus : Inequality in Emerging Economics (EES)*

18) Parthapratim Pal and Jayati Ghosh (2007), *Inequality in India : A Surevy of Recent Trends*, DESA working paper no. 45

19) Pranab Bardhan, *Economic Reforms, Poverty and Inequality in Chaina and India.*

20) Preet Rustogi (2005), *Understanding Gender Inequalities in Wages and Incomes in India*, The Indian Journal of Labour Economics, Vol. 48

21) Raghbendra Jha, *Reducing Poverty and Inequality in India : Has Liberalisation Helped ?*

22) Rajesh Shukla (2011), *Income Inequality has increased after 12 years of economic reforms*

23) Rama Pal and Rupayan Pal (2012), *Income Related Inequality in Financial Inclusion and Role of Banks : Evidence of Financial Exclusion in India*, Indira Gandhi Institue of Development Reserach, Mumbai.

24) Ratan Ghosal (2012), *Growth, Poverty and Inequality Paradox in In-*

*dia.*

25) Abhijit Sen and Himanshu, *Poverty and Inequality in India, Getting Closer to the Truth.*

26) Amartya K. Sen, *From Income Inequality to Economic Inequality*, Southern Economic Journal, 1997, 64(2), PP. 384-401

27) Amitabh Kundu, K. Verghese, *Regional Inequality and Inclusive Growth in India under Globalisation*, Oxfan India working papers series, September 2010

28) Andrew D. Foster, Mark R. Rosenzweig (2013), *Agricultural Development, Industrialisation and Rural Inequality*

29) Angus Deaton, Jean Dreze, *Poverty and Inequality in India - A Re-Examination*, Economic and Political Weekly, September 7, 2002.

30) Arnab Mukharji, Divya Rajaraman, Hema Swaminathan, *Economic Development, Inequality and Malnutrition in India*, IIMB Working Paper No. 2010- 01-301.

31) Aseema Sinha, *Globalisation rising Inequality and New Insecurities in India*

32) Dr. G. Rajesh Kumar, P Meenakshisundaram, Macro Economic Concerns and Challenges Facing India in the Recession Period, Journal of Management Research, Vol. 2, Issue March 2014.

33) Duangkamon Chotikapanich, William E. Griffits, D.S.Prasad Rao and Wasana Karunaratnee, *Income Distribution, Inequality and Poverty in Asia*, 1992-2010.

34) James P. Walsh and Jiangyan Yu (2012), *Inflation and Income Inequality : Is Food Inflation Different ?*, IMF working paper.

35) K. K. Subramanian, Syam Prasad (2008), *Rising Inequalities with High Growth Isn't this Trend Worrisome ? Analysis of Kerala Experience*, Working paper 401.

36) K. S. James, T. S. Syamalya, *Income, Income Inequality and Mortality, An Imperical Investigation of the Relationship in India*, 1971-2003

37) Keith Gehring, Kishor G. Kulkarni, Economic Growth and Income Inequality in India.

# डॉ. व्यं. सु. पाटणकर- एक प्रगल्भ व्यक्तिमत्व

**यशवंत रारावीकर, कोलकाता,**
बी-८, रिझर्व्ह बँक क्वॉर्टर्स,
७, न्यु रोड, अलिपूर,
कोलकाता-७
पश्चिम बंगाल.
भ्रमणध्वनी: ०९६७४९४५१०८

---

नव्या २०१५ वर्षाच्या जानेवारीचा शेवटचा बुधवार दि. २८ जानेवारी हा दिवस माझ्या आयुष्यातला अत्यंत दुःखाचा दिवस म्हणून उगवला. सकाळी सकाळी माझा फोन खणखणला आणि माझे परम मित्र डॉ. पाटणकर गेल्याची बातमी माझ्या कानावर घालून माझ्या मस्तकावर घणाघाव केला. माझा आणि डॉ. पाटणकर यांचा एक समाजमित्र अरविंद काणे याने मला ही वार्ता कळवली. डॉ. पाटणकर अलिकडे असाध्य दुखण्याने हळू हळू खंगत चालले होते. हे मला त्यांच्या डॉक्टर मुलीकडून कळले होते. पण शेवट इतक्या झपाट्याने घाला त्यांच्यावर घालील असे वाटत नव्हते. दि. २७ ला ते कोमामध्ये गेले. मध्यरात्री घरातले सर्वजण त्यांच्या भोवती बसून लक्ष ठेवून होते. त्यांची छाती खालीवर हालतांना दिसत होती. शुद्ध नसली तरी जिवात जीव होता. अखेर पहाटे अडीच वाजता छाती स्तब्ध झाली आणि क्षणात एक ज्ञानी, सोज्वळ व्यक्तिमत्व अनंतात झेपावलं व विलीन झाले. अगदी डॉक्टर लेक जावयांची कडेकोट तटबंदी तोडुन, मर्मबंधातील सहधर्मचारिणीचे आयुष्यभराचे पाश झुगारून आणि नातवंडाची माया मागे सारून....

माझी आणि पाटणकरांची मैत्री पंचावन्न वर्षाची म्हणजे अर्धा अधिक शतकाची. १९५९ मध्ये ते धुळ्याच्या महाविद्यालयात आले. माझे आजोळ धुळ्याचं. त्यामुळे माझे मामांकडे जाणे होत असे. त्यामुळे दरवेळी आमच्या भेटी गाठी आणि गप्पा होत असत. तसेच पुणे विद्यापीठाच्या मिटींग्ज मध्येही आमच्या दोन दोन दिवस भेटी होत असत. पुढे नाशिकचे मुक्त विद्यापीठ सुरू झाल्यावर व त्यांचा त्या विद्यापीठाशी संबंध असल्याने ते माझेकडेच येत

असत. निवृत्ती नंतर थोड्याच वर्षात ते पुण्यास स्थायिक झाले. मी ही पुण्यास मुलाकडे राहायला आल्यामुळे तर आमचा सहवास खुपच वाढला. तिथुन आम्ही मुंबईस आल्यावर पाटणकर मुंबईसही येत असत. शिवाय अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातही आमच्या गाठी भेटी व्हायच्या त्या वेगळ्याच. अशा रितीने सततच्या भेटी आणि सहवास यामुळे आम्ही उभयंतातील स्नेहसंबंध अधिकाधिक घट्ट झाले.

## समृद्ध व सापेक्षी अर्थतज्ज्ञः

डॉ. पाटणकर अर्थशास्त्राचे उत्तम शिक्षक म्हणून तर नावाजलेले होते व त्याचे मूळ त्यांच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा व ज्ञानाचा सखोल आणि भक्कम पाया यात होते. त्यामुळे मॅक्रो-माइक्रोपासून ते थेट पब्लिक फायनान्स, नियोजन, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि विदेशी विनिमय इत्यादी पर्यंत अर्थशास्त्राच्या शाखा, उपशाखापर्यंत त्यांचे विश्लेषण आणि अभिव्यक्ती व शिकवणे यात ते पारंगत होते. गोखले अर्थशास्त्र संस्थेतून आणि ते ही डॉ. नी. वि. सोवनी यांच्या सारख्या समृद्ध प्राध्यापकांच्या हाताखाली अर्थशास्त्राच्या त्यांच्या अभ्यासाने ते आपल्या गुरू प्रमाणेच समृद्ध आणि साक्षेपी अर्थतज्ज्ञ म्हणून तयार झाले. अर्थशास्त्रातील डॉक्टरेट बरोबरच प्रॅक्टिकल इकोनॉमिस्ट म्हणजेच आर्थिक धोरणात्मक विश्लेषक म्हणून ते तज्ज्ञ होते.

## अर्थशास्त्र परिषदेचे आधारस्तंभ :

डॉ. पाटणकरांच्या निधनाची वार्ता कानावर आल्यानंतर एक मुख्य विचार माझ्या मनावर आघात करून गेला तो म्हणजे मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आणखी एक आधार, आणखी एक आधार स्तंभ निखळला. गेल्या दोन वर्षाचा काळ हा आपल्या परिषदेच्या दृष्टीने आघात काळ म्हटला पाहिजे. या काळातील पहिला मोठा आघात म्हणजे आपल्यातील सर्वात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ अनेकांना पितृतुल्य असलेले आणि परिषदेच्या तरूण सदस्यांनतर पितामहतुल्य असलेले नागपुरचे डॉ.श्री. आ. देशपांडे आपल्याला २०१२ च्या पहिल्या तिमाहीत पारखे झाले व पोरके करून गेले. दुःखातून आपण सावरतो न सावरतो तोच २०१४ च्या मध्याला आपले आणखी एक ज्येष्ठ आधारस्तंभ पुण्याचे डॉ. आनंद नाडकर्णी आपल्यातून उठून गेले. आता आपण ते दुःखाश्रु पुसतो न पुसतो तोच डॉ. पाटणकरांचा आधारस्तंभ निखळला आणि तोही त्यांच्या वयाच्या अवघ्या ८२ व्या वर्षी. मी मुद्दाम अवघ्या असे म्हणतो याचे कारण असे की एक तर त्यांच्या परिषदेला आधारच तेवढा मोठा होता आणि दुसरे म्हणजे आता आता पर्यंत त्यांची तब्बेत तशी चांगली होती. पण या सहा महिन्यातच तब्बेतीच्या तक्रारी सुरू होऊन त्याची परिणती असाध्य रोगात होऊन दैव त्यांना आपल्यातून उचलून घेऊन गेलं. असे क्रुर दुखणे झाले नसते तर यमाची वक्रदृष्टीची बिशाद नव्हती.

मराठी अर्थशास्त्र परिषद हे त्यांचे समर्पण (Devotion) होते. अगदी १९७७ पासून म्हणजे परिषदेच्या स्थापनेपासून ते आजीव सदस्य होते. आणि परिषदेवर त्यांच्या शब्दशः जीव होता. तिचे कार्य आजीवन घटनाबद्ध, शिस्तबद्ध चालावे यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांच्या जीवनाचा मोठा कार्यभाग परिषदेने व्यापला होता. १९७७ पासून ते त्यांच्या जीवनाच्या अखेरी पर्यंत ३७-

३८ वर्षे त्यांनी परिषदेच्या कार्यात प्रामुख्याने प्रत्यक्षपणे तर काही वर्षे अप्रत्यक्षपणे सहभाग घेतला होता. १९७७ ते २००३ या दीर्घ काळात तर त्यांनी निरनिराळे कार्यक्रम, उपक्रम व प्रथा या सुरू करून त्यात सहभाग घेतला. १९८३-८४ मध्ये त्यांनी सांगली येथे झालेल्या परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपद भुषविले होते. त्यापुर्वी १९८५ ते १९९२ या काळात त्यांनी परिषदेच्या कार्यवाह पदाची जबाबदारी सांभाळली होती. या काळातील त्यांची परिषदेच्या पैशाचे हिशेब ठेवण्याची पद्धत अगदी व्यापाऱ्यांच्या खतावणीच्या पद्धतीलाही लाजवील इतकी पद्धतशीर, शिस्तबद्ध व बारीक सारीक तपशिलवार असे. तीच गोष्ट परिषदेच्या पत्रव्यवहाराबाबत. परिषदेच्या पत्र व्यवहारांची आवक टपाल आणि जावक टपाल, पत्रोत्तरे याची तारीखवार व कार्ड, पाकीट रजिस्टर इत्यादी तपशिलासह नोंद असायची. कोणताही आणि कोणाचाही पत्रव्यवहार अनुत्तरित किंवा दुर्लक्षित राहू नये यावर त्यांचा कटाक्ष असे. तीच गोष्ट परिषदेच्या पैशांबाबत परिषदेकडून वर्गणी व इतर बाबीखाली किती पैसे जमा झाले. या सर्व आवक पैशाची तपशिलवार नोंद ते ठेवत. तसेच खर्चाची नोंद देखील तपशिलासह व पावत्यांसह लिहून आवक जावक यांचा ताळेबंद काढून ठेवत असत. अशा रितीने परिषदेच्या कार्यवाह पदाच्या कार्याचा जणू वास्तुपाठच घालून दिला असेच म्हटले पाहिजे.

त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे परिषदेच्या पैशाच्या विविध गुंतवणुकी कुठे करावयाच्या व कशा पद्धतीने करावयाच्या, परिषदेच्या हिताच्या दृष्टीने, पैशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि गुंतवणूकीवर जास्तीत जास्त व्याज उत्पन्न परिषदेस मिळावे या दृष्टीने फायद्याच्या आहेत याचा तुलनात्मक व साफल्याने विचार करून ते गुंतवणूकी बाबत सल्ला देत असत.

**परिषदेचे घटना तज्ज्ञ :**

डॉ. पाटणकर यांचा परिषदेच्या घटनेच्या अभ्यास बारकाईचा आणि परिपूर्ण असायचा. घटनेचे पालन झालेच पाहिजे यावर या बाबत ते जागरूक असायचे. घटनेच्या विविध कलमांचे पालन करून घटनेच्या चौकटीतच परिषदेचे कामकाज झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह असायचा. या घटेनतील दुरूस्त्यांच्या बाबतीत तर त्यांच्या दृष्टीकोन तर अत्यंत बुद्धिनिष्ठ (Rational) आणि दीर्घकालिन व्यापक हिताच्या दृष्टीने (Long-termview) योग्य होता. त्यांच्या ठाम मताप्रमाणे तात्पुरत्या निर्माण झालेल्या परिस्थितीतून तेवढ्यापुरता मार्ग काढण्यासाठी घटना दुरूस्ती करणे हे दीर्घकालिन हिताच्या दृष्टीने आणि परिषदेच्या कार्याच्या दृष्टीने योग्य होणार नाही. प्रत्येक घटना दुरूस्ती ही तिच्या दीर्घकालीन परिणामांच्या दृष्टीने विचार करूनच व्हायला हवी. परिषदेच्या व्यापक व दीर्घकालिन हिताच्या दृष्टीने केलेली दुरूस्ती ते स्वागतार्ह मानायचे. या त्यांच्या आग्रही दृष्टिकोनामुळे परिषदेची घटना ही एक परिपुर्ण घटना झाली असून तिचा आदरही बाळगला जात आहे.

एकंदरीत डॉ. पाटणकरांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेसाठी फार मोठे योगदान केले आहे. परिषदेच्या सुरूवातीच्या काळातील आणि वर सुरूवातीला उल्लेख केले अध्यक्ष कै.डॉ.श्री. आ. देशपांडे यांचे चिरंजीव व परिषदेचे ज्येष्ठ अध्यक्ष आणि नागपुर विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ.

विनायक देशपांडे यांनी डॉ.श्री. आ. देशपांडे यांच्या नावाचा परिषदेमार्फत द्यावयाचा एक वार्षिक पुरस्कार २०१२ पासून सुरू केला आहे. अत्यंत प्रतिष्ठेच्या या पहिल्या पुरस्काराचे मानकरी डॉ. पाटणकर झाले. त्यांना हा पुरस्कार २०१२ त भुसावळ येथे भरलेल्या परिषदेच्या अधिवेशनात त्यांनी केलेल्या कार्याबद्दलचा गौरव म्हणून बहाल करण्यात आला. एका अर्थाने त्यांचा हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या बद्दलची कृतज्ञता दर्शविणाराच तो होता असे आज म्हणावेसे वाटते.

---

## ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES

## *DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE*

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2014 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31st August 2015. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C.,*
*Jalgaon-425001.*
*(Mob.9422618410)*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# केंद्रीय अर्थसंकल्प - अपेक्षा आणि वास्तव!

**राहुल शं. म्होपरे, अर्जुननगर,**
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज,
ता. कागल, जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी ९९२३८७९०२०

केंद्रीय अर्थ व वित्तमंत्री अरूण जेटली यांनी दि.२८ फेब्रुवारी, २०१५ रोजी केंद्रात पूर्ण बहुमतात असलेल्या भाजप सरकारचा पहिला पूर्ण अर्थसंकल्प सादर केला. अर्थसंकल्प सादरीकरण अतिशय कौशल्यपूर्ण व कठीण काम असले तरी मा. अर्थमंत्री यामध्ये यशस्वी झाले आहेत. कारण अर्थसंकल्पाच्या माध्यमातून काही गोष्टी लोकांना देवून त्यांना खुष करावयाचे असते तर त्याचवेळी दुसऱ्या बाजूला लोकांकडून त्यांना त्रासाची जाणीव होवू न देता कराद्वारे उत्पन्न मिळवायचे असते. आर्य चाणक्याच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास, ज्याप्रमाणे पाण्यात राहून मासा पाणी कसा पितो? हे आपणास कळत नाही, त्याप्रमाणेच लोकांकडून कराद्वारे कपात केली जाणारी रक्कम लोकांच्या लक्षात न येता कपात केली गेली पाहिजे आणि हे अवघड काम प्रत्येक अर्थमंत्र्यांना अर्थसंकल्प सादर करताना करावयाचे असते. निवडणूकीपूर्वी भाजपा ने संपूर्ण देशाला सांगितले होते *अच्छे दिन आनेवाले है!* या पार्श्वभूमीवर देशातील सर्वच थरातील लोकांना वर्ष २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातून अनेक (भरमसाठ) अपेक्षा होत्या. बेरोजगारी, वाढती भाववाढ, औद्योगिक मंदीचे सावट, शेती उत्पन्नातील अस्थिरता, वाढती वित्तीय तूट, राष्ट्रीय उत्पन्नातील घट अशा प्रमुख अर्थव्यवस्थेतील समस्यांच्या पार्श्वभूमीवर अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचा अर्थव्यवस्थेशी संबंधित काही महत्वपूर्ण क्षेत्रांच्या आधारे उहापोह करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात लेखकाने केलेला आहे.

## अर्थसंकल्पाची धोरण रचना व सामर्थ्यशाली घटक:

अर्थमंत्र्यांनी संसदेत सादर केलेला अर्थसंकल्प तयार करण्यामध्ये ज्या प्रमुख अर्थतज्ज्ञांचा समावेश होता त्यामध्ये अरविंद सुब्रम्हण्यम (सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार), शक्तिकांता दास (सचिव, महसूल खाते), रतन पी. वट्टल

(सचिव, खर्च खाते), आराधना जोहरी (सचिव, निर्गुंतवणूक खाते), राजीव महर्षी (सचिव, आर्थिक कामकाज खाते), हसमुख अधिया (सचिव, आर्थिक सेवा खाते), अनिता कपूर (अध्यक्षा, प्रत्यक्ष करमंडळ), कौशल्य श्रीवास्तव (अध्यक्ष, अबकारी व सीमा शुल्क विभाग) व राजन भार्गव (सहसचिव, अर्थसंकल्प) इत्यादी नामवंत अर्थतज्ज्ञांचा समावेश होता. अर्थसंकल्प २०१५-१६ चा एकूण अंदाजीत खर्च रू. १७,७७,४७७ कोटी रू. (अनियोजीत खर्च १३,१२,२०० कोटी रू. व नियोजीत खर्च ४,६५,२७७ कोटी रू.) आहे.

अर्थमंत्र्यांच्या मतानुसार, या अर्थसंकल्पात रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन, जलद वृद्धी, लोकांचा अधिक सहभाग इ. उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने धोरण रचना स्वीकारण्यात आली आहे. अर्थात सर्वच अर्थमंत्र्यांना सर्वकाळ कमी जास्त प्रमाणात का होईना परंतु हीच धोरण रचना स्वीकारावी लागते. अगदीच अर्थशास्त्रीय भाषेत सांगावयाचे झाल्यास उत्पादीत वस्तु व तिचे गुण तेच असतात फक्त नावात बदल (वस्तू भेद) केला जातो. या अर्थसंकल्पाला सामर्थ्य देणारे अर्थव्यवस्थेतील घटक लक्षात घेता, त्यामध्ये नियंत्रित भाववाढ, नियंत्रित अर्थसंकल्पीय तूट, परकीय चलनाचा मोठा साठा, घटती चालू व्यापार खात्याची तूट इ. चा समावेश होतो. याबरोबरच भांडवल बाजारातील तेजी व आशावाद हे घटक देखील अर्थसंकल्पाला प्रेरक घटक होते.

**शेती आणि सहकार :**

आजही भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे. आज देशाच्या एकूण स्थूल उत्पादनात (GDP) शेतीचा हिस्सा साधारणपणे १५% आहे. परंतु हा हिस्सा कमी असताना देखील देशातील ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरित्या शेती तथा शेती आधारित उद्योग धंद्यांवरच अवलंबून आहे हे विसरून चालणार नाही. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ही शेतमालाच्या भावावर अवलंबून असते. नैसर्गिक आपत्ती, वाढता कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सिंचनाचे अपुरे प्रमाण अशा परिस्थितीत या अर्थसंकल्पातून शेती क्षेत्राला काही विशेष सवलती तथा नवसंजीवनी मिळेल ही अपेक्षा मात्र फोल ठरलेली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी जलसिंचन सोयी वाढविणे, अस्तित्वातील जलसिंचनाचा कार्यक्षम वापर करणे आणि शेतीतून उत्पादीत झालेल्या मालाची गुणवत्ता सुधारून शेतकऱ्यांना परवडेल अशा किंमतीत त्याची विक्री होणे गरजेचे असते. या अर्थसंकल्पाद्वारे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, सूक्ष्म जलसिंचन आणि पाणलोट विकास कार्यक्रमासाठी फक्त रू. ५३०० कोटींची तरतुद करण्यात आली आहे. खरे पाहता फक्त महाराष्ट्रातील अपुरे जलसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच संपूर्ण महाराष्ट्र जलसिंचनाखाली आणण्यासाठी किमान ६० हजार कोटी रू. ची आवश्यकता असताना संपूर्ण देशाच्या जलसिंचन विकासासाठी करण्यात आलेली ही तरतुद किती अपुरी आहे याची सहज कल्पना येते. शेतकरी ते ग्राहक यांच्यामध्ये असलेल्या मध्यस्थांचे प्रमाण लक्षात घेता खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा व दुसऱ्या बाजूला ग्राहकांचा देखील अतिरिक्त किंमतीला माल विकत घ्यावा लागत असल्याने तोटा होतो. त्यामुळे शेतीमालाला

योग्य भाव मिळून शेतकऱ्यांची फसवणूक व लुबाडणूक थांबावी यासाठी *नॅशनल ॲग्रीकल्चरल प्रोड्यूस मार्केट* च्या स्थापनेची घोषणा स्वागतार्ह आहे. मृदसंधारण व सिंचनासाठी आम्ही आधीपासूनच पावले उचलली असल्याचे मा. अर्थमंत्र्यांनी सांगितले. जमिनीची शाश्वत पद्धतीने उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी *मृदा हेल्थ कार्ड* जारी केले जाणार आहे. वर्ष २०१३ मध्ये संसदेत *अन्न सुरक्षितता विधेयक* मंजूर करण्यात आले आहे. त्यान्वये कार्यान्वयन होण्यासाठी (३ रू. किलो तांदूळ, २ रू. किलो गहु व १ रू. किलो कडधान्य) भविष्यात मोठ्या अन्नधान्य उत्पादनाची व साठ्याची गरज आहे. अशा परिस्थितीत माती परिक्षणासाठी ठोस तरतुद या अर्थसंकल्पात अभिप्रेत होती ती त्या प्रमाणात झालेली दिसून येत नाही. शेती कर्ज हा आजही भारतीय शेतकऱ्याचा मोठा आधार आहे. या अर्थसंकल्पात ८.५ लाख कोटी रूपयांच्या शेती कर्ज वितरणाचे लक्ष ठेवण्यात आले आहे. दीर्घ मुदतीच्या ग्रामीण पतपुरवठा नीधीसाठी १५ हजार कोटी रू. अल्प मुदतीच्या सहकारी ग्रामीण पतपुरवठा फेरकर्ज नीधीसाठी ४५ हजार कोटींची तरतुद, अल्प मुदतीच्या प्रादेशिक ग्रामीण बँक फेरकर्ज निधीसाठी १५ हजार कोटी रू. ची तरतुद, ग्रामीण पायाभूत सुविधा विकास व शेतांना सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य गाठण्यासाठी २५ हजार कोटी रू. ची तरतुद या अर्थसंकल्पात केलेली आहे. शेती उत्पादन वाहतुकीला असलेली सेवा कराची सवलत कायम ठेवण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. सहकारी क्षेत्रासाठी काही प्रमाणात जरी कर्जपुरवठ्याची तरतुद या अर्थसंकल्पात केली असली तरी सहकाराकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाल्याचेच म्हणावे लागेल. कारण या अर्थसंकल्पात सहकारी बँका सक्षम करण्यासाठी कोणतीही ठोस तरतुद नाही. सहकारामधील उद्योगांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, सहकारी साखर कारखानदारी, पतसंस्था, वस्त्रोद्योग इ. साठी या अर्थसंकल्पात भरीव तरतुदीची अपेक्षा पूर्णपणे फोल ठरलेली आहे. एकंदरीत शेती आणि सहकाराच्या अनुषंगाने अर्थसंकल्पाचा विचार करता काही अपवाद वगळता हा अर्थसंकल्प पूर्णत: निराशाजनक आहे असे वाटते.

**उद्योग आणि अर्थसंकल्प:**

देशाच्या आर्थिक विकासात उद्योगांची भूमिका अनन्यसाधारण आहे. उद्योगांना आधुनिक भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा संबोधले तर वावगे ठरणार नाही. अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पात उद्योग क्षेत्राला मोठ्या प्रमाणात झुकते माप दिल्याचे दिसून येते. सध्या कंपन्यांच्या नफ्यावर आकारला जाणारा निगम कर ३०% आहे तो पुढील चार वर्षात २५% पर्यंत म्हणजे ५% कमी केला जाईल हा उद्योगक्षेत्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा निर्णय या अर्थसंकल्पात घेतलेला आहे. कारण १ एप्रिल, २०१६ पासून जी. एस. टी. लागू होणार आहे. त्यामुळे तदनंतर इतर कोणत्याही कराचा बोजा उद्योगांवर पडणार नाही. येथून पुढील काळात एका विशेष तज्ज्ञ समितीमार्फत नविन उद्योगांना परवानगी देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. नविन उद्योगांच्या परवानग्या लाल फितीत अडकू नयेत तसेच सुलभरित्या उद्योगांना परवानगी मिळावी त्यांच्या समस्या दूर व्हाव्यात हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे. भविष्यात या प्रक्रियेचे कायद्यात रूपांतर करण्याचे ठरविले आहे.

महत्वाची बाब म्हणजे जागतिक बँकेच्या अहवालानुसार उद्योगांसाठी प्रोत्साहनपर वातावरण असणाऱ्या १८९ देशांमध्ये भारत हा १४३ व्या क्रमांकावर आहे. भारताचे हे स्थान पहिल्या ५० देशांमध्ये आणण्याचा निर्धार अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पात बोलून दाखविला आहे. उद्योगांना प्रोत्साहन म्हणून *ई-बिझ* पोर्टलची सेवा सुरू करण्यात आली असून १४ नियामक परवानग्या एक खिडकी योजनेंतर्गत देण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. *मुद्रा बँक* हे एक या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य होय. मुद्रा बँकेची स्थापना करून सरकार यामध्ये २० हजार कोटी रू. चे भागभांडवल घालणार आहे. या बँकेद्वारे लघु व कुटिरोद्योगांसाठी लागणाऱ्या कर्जाची सोय करून देण्यात येणार आहे. याबरोबरच अटल इनोव्हेशन मिशन, सेतू, व्यावसायिक कौशल्य वृद्धीसाठी नवीन संस्थांची स्थापना, परदेशी टेक्नॉलॉजीच्या रॉयल्टीवर २५% वरून १०% पर्यंत कर कपात अशा विविध घोषणांद्वारे हा अर्थसंकल्प अर्थमंत्र्यांनी भारतातील उद्योग विश्वाला *छप्पर फाडके* करून नवचैतन्य मिळवून देणारा केला आहे.

## पायाभूत सुविधा आणि आरोग्य:

अर्थसंकल्प शिक्षण क्षेत्राच्या अनुषंगाने विचारात घेता तो स्वागतार्ह आहे. या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रासाठी ६८ हजार ९८६ कोटी रू. ची तरतुद करण्यात आलेली आहे. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी व प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावे म्हणून देशातील प्रत्येक खेडेगावापासून ५ कि.मी. अंतराच्या आत उच्च माध्यमिक शाळा (Senior Secondary School) स्थापन करण्याचे मा. अर्थमंत्र्यांनी घोषीत केले आहे. *प्रधानमंत्री विद्या लक्ष्मी कार्यक्रमांतर्गत* आता शिष्यवृत्त्या व शैक्षणिक कर्जाचे कार्यान्वयन होणार आहे. या अर्थसंकल्पात दीनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत तरतुद केलेली रू. १५०० कोटींची रक्कम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची आहे. कारण ही रक्कम डिजीटल व्हाउचरच्या माध्यमातून थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोचणार आहे. शैक्षणिक कर्जाच्या अनुषंगाने सरकारने या अर्थसंकल्पात सकारात्मक पाऊल उचलले आहे. नविन *भारतीय आरोग्य शास्त्र संस्था* (AIIMS) जम्मू-काश्मिर, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश, आसाम इ. राज्यांमध्ये स्थापन करण्यात येणार आहेत. तसेच याच धर्तीवर बिहारमध्ये देखील एक नविन संस्था स्थापली जाणार आहे. फळ बागेसंदर्भातील संशोधन आणि शिक्षण सुविधा पुरविणारी पदव्युत्तर संस्था अमृतसर (पंजाब) येथे स्थापण्याची तसेच महाराष्ट्र, राजस्थान व छत्तीसगढ येथे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ३ नवीन *राष्ट्रीय फार्मास्युटिकल संस्था* स्थापण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केलेली आहे. याबरोबरच नागालँड व ओरिसा या भागात देखील प्रत्येकी एक याप्रमाणे शास्त्र आणि शिक्षण संशोधन संस्था स्थापण्यात येणार आहे. थोडक्यात, भविष्यकालीन पीढीच्या किंबहुना देशाच्या शैक्षणिक विकासाच्या अनुषंगाने या सर्व गोष्टी निश्चितच लाभदायक आहेत.

आरोग्याच्या दृष्टीकोनातून मा. अर्थमंत्र्यांनी प्रत्येक शहरात आणि खेड्यात आरोग्य सुविधा पुरविण्याचे घोषीत केले आहे. सर्वांना २४ तास वीज, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि रस्ते प्राप्त करून देण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केलेली आहे. अर्थात हे स्वप्न सत्यात उतरेल तेव्हा खरे मानता येईल. अन्न,

वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत तीन गरजा आहेत. यापैकी निवारा ही गरज लक्षात घेता या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शहरी भागात २ कोटी व ग्रामीण भागात ४ कोटी घरांची निर्मिती केली जाणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केलेली आहे. वर्ष २०२२ पर्यंत सर्वांना घर उपलब्ध करून दिले जाणार आहे. देशात २० हजार खेड्यांमध्ये ज्या ठिकाणी वीज पोहचली नाही तेथे ऑफ ग्रीड सोलर पॉवर सह वीज पोचविण्याचे उद्दिष्ट आहे. वर्ष २०५-१६ साठी नाबार्ड मध्ये २५ हजार कोटी रू. नीधी ठेवून ग्रामीण मूलभूत सुविधांच्या विकासासाठी ठोस पाऊल उचलण्यात आले आहे. थोडक्यात, पायाभूत सुविधा तथा आरोग्याच्या दृष्टीकोनातून अर्थमंत्र्यांची दृष्टी निश्चितच चांगली आहे. परंतु त्याचे कार्यान्वयन महत्त्वाचे आहे आणि याचठिकाणी प्रत्येक अर्थमंत्री पिछाडीवर पडतो असा इतिहास आहे.

**महिला, मध्यम वर्ग व जेष्ठ नागरिक:**

अर्थसंकल्प २०१५-१६ मधून महिलांच्या पदरी काय पडले हे जाणून घेता असे लक्षात येते की, *निर्भया* फंडासाठी १००० कोटी रू. ची तरतुद या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली. दुसरी बाब म्हणजे *सुकन्या समृद्धी योजने*तील गुंतवणूक करमुक्त करण्यात आली आहे. या दोन प्रमुख गोष्टी सोडल्या तर जेंडर बजेटची संकल्पना जोर धरू लागली असतानाच महिलांच्या पदरी मोठ्या प्रमाणात निराशाच पडली आहे असे म्हणावे लागेल. खरेतर या अर्थसंकल्पातून महिलांना करपात्र उत्पन्नातून वाढीव सूट अपेक्षित होती तसेच महिलांच्या उच्च शिक्षणासाठी काही नविन शिष्यवृत्त्या, प्रोत्साहनात्मक योजना तथा कर्ज योजना अपेक्षित होत्या. परंतु या सर्वच बाबतीत शक्य असून देखील मा. अर्थमंत्र्यांनी महिला वर्गाचा भ्रमनिरास केला आहे.

मध्यम वर्गीय तथा नोकरदारांचा विचार केला असता या अर्थसंकल्पातून त्यांच्या पदरी देखील निराशाच पडली आहे. कारण वर्ष २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात आयकर माफ उत्पन्न मर्यादा ३ ते ३.५ लाख रूपये होईल अशी अपेक्षा नोकरदारांच्या मनात होती. परंतु ही अपेक्षा पूर्णत: फोल ठरलेली आहे. अर्थमंत्र्यांनी उत्पन्न कराच्या रचनेत कोणताही बदल केलेला नसल्यामुळे मध्यम वर्गीयांची मोठ्या प्रमाणात निराशा झालेली आहे. अतिश्रीमंत व्यक्तींवर २% अधिकचा अधिभार या अर्थसंकल्पात लावण्यात आलेला आहे. त्यामुळे १ कोटी रू. पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या अतिश्रीमंत व्यक्तींना आता १०% ऐवजी १२% अधिभार द्यावा लागेल. प्राप्तिकराची मर्यादा न वाढवता, आर्थिक वर्षात वाढणाऱ्या उत्पन्नातून लोकांकडून जुन्या कर दरानेच का होईना परंतु अधिक उत्पन्न गोळा करणारा; तसेच अतिश्रीमतांच्या खिशाला काही प्रमाणात कातरी लावणारा हा अर्थसंकल्प आहे. मध्यमवर्गीयांच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास हा अर्थसंकल्प म्हणजे, *खाया, पिया कुछ नही; ग्लास तोडा बारा आना*, अशा स्वरूपाचा आहे.

जेष्ठ नागरिकांसाठी या अर्थसंकल्पातून काही घोषणा व तरतुदी करण्यात आल्या आहेत. दारिद्र्य रेषेखालील जेष्ठ नागरिकांना शरीरोपयोगी साधने (Physical Aids) आणि जिवनोपयोगी साहित्य (Assisted Living Devices) एका नविन योजनेद्वारे पूरविण्यात येणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केलेली आहे. जेष्ठ नागरिकांसाठी कर

माफीच्या आरोग्य विम्याची सवलत २० हजार रू. वरून ३० हजार रू. पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. ज्या जेष्ठ नागरिकांचा आरोग्य विमा नाही व ज्यांचे वय ८० वर्षापेक्षा अधिक आहे अशा जेष्ठ नागरिकांचा ३० हजार रू. पर्यंतचा आरोग्य खर्च कर माफ करण्यात आलेला आहे. विशिष्ट प्रकारच्या असाध्य रोगाने पीडीत असलेल्या जेष्ठ नागरिकांच्या आरोग्य खर्चाची करमाफ मर्यादा ६० हजार रू. ८० हजार रू. पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. असे जरी असले तरी अर्थमंत्र्यांनी जेष्ठ नागरिकांना अपेक्षित असलेल्या प्राप्ती कराच्या मर्यादेत मात्र कोणताही बदल केलेला नाही.

## इतर महत्त्वपूर्ण बाबी:

उपरोक्त सर्व क्षेत्रांबरोबरच या अर्थसंकल्पामधून इतर अनेक बाबी समोर आल्या आहेत. त्यापैकी काही प्रमुख बाबी खालीलप्रमाणे.

१. आगामी तीन वित्तीय वर्षात वित्तीय तूट ३% पर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. वर्ष २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षात वित्तीय तूट अनुक्रमे ३.९%, ३.५% आणि ३% पर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट आहे.

२. *प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेतंर्गत* वार्षिक फक्त १२ रू. प्रीमीअमच्या मोबदल्यात २ लाख रू. च्या अपघाती मृत्यूच्या विम्याची सोय पुरविण्यात येणार आहे.

३. संसदेच्या चालू अधिवेशनात परदेशातील काळ्या पैशाला चाप लावण्यासाठी कडक कायदे करणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

४. रू. १ लाख च्या वरील किंमतीच्या कोणत्याही वस्तुच्या खरेदीवर पॅन कार्ड असणे अनिवार्य करण्यात येणार आहे.

५. *मेक इन इंडिया* या मोहिमेचा परिणाम म्हणून देशात नविन १ लाख रोजगार उपलब्ध होणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले.

६. *स्वच्छ भारत अभियानाच्या* अनुषंगाने कोणत्याही स्थानिक अथवा अनिवासी भारतीय नागरीकांनी देणगी दिल्यास तसेच भारतीयांनी *गंगा स्वच्छता अभियानास* देणगी दिल्यास त्यांना उत्पन्न कर कायद्याच्या ८० जी कलमांतर्गत १००% कर सवलत मिळणार आहे.

७. संरक्षण क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पात २.४६ लाख कोटी रू. ची तरतुद करण्यात आलेली आहे. ही मागील वर्षाच्या तुलनेत १०.४५% नी अधिक आहे.

८. सेवा करात सरसकट २% नी वाढ या अर्थसंकल्पाद्वारे अर्थमंत्र्यांनी केलेली आहे. येथून पुढील काळात लॉटरी तिकीटांचे एजंट, लोकल पीसीओ बुथ, म्युच्यूअल फंड एजंट इ. सेवांवर देखील सेवाकर आकारला जाणार आहे.

९. देशात ४ हजार मेगावॅटचे पाच भव्य ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे व या प्रकल्पांची लिलाव प्रकिया पारदर्शक पद्धतीने करणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी जाहिर केले आहे.

## स्वस्त व महाग वस्तू:

सर्वसामान्य नागरिकांना अर्थसंकल्पातून अपेक्षित असते ते म्हणजे येथून पुढील काळात कोणत्या वस्तू स्वस्त होणार आणि कोणत्या वस्तू महागणार. अर्थसंकल्प २०१५-१६ चा विच करता काही प्रमुख स्वस्त व महाग वस्तुंची यादी खालीलप्रमाणे देता येईल.

### स्वस्त वस्तू:

चामड्याची १ हजार रू. पेक्षा अधिक

किंमतीची पादत्राणे, टॅब्लेट, देशी बनावटीचे मोबाईल, पेसमेकर, एलइडी लाइट, लॅम्प व टि. व्ही., सोलर वॉटर हिटर, रेफ्रिजेरटर कॉम्प्रेसर, अगरबत्ती, ॲम्बुलन्स व ॲम्बुलन्स सेवा, पॅकेट बंद फळे व भाज्या, मायक्रोवेव्ह ओव्हन, प्राणीसंग्रहालय, वस्तु संग्रहालय, व्याघ्र प्रकल्प, अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान इ. ची सफर.

**महाग वस्तू:**

सिगारेट, सिगार, चिरूट, पानमसाला, गुटखा व अन्य तंबाखूजन्य पदार्थ, हॉटेलिंग, विमान प्रवास, केबल व डीटीएच सेवा, क्रेडीट व डेबिट कार्डशी संबंधित सेवा, ब्युटिपार्लर, कुरिअर, ड्रायक्लिनिंग, शेअर दलाली, ॲसेट मॅनेजमेंट, विमा, सिमेंट, शीतपेय, बाटली बंद पाणी, प्लॅस्टीक बॅग व सॅक, ॲम्युझमेन्ट आणि थीम पार्क संगीत कार्यक्रम, मद्य, लॉटरी, चिट फंड, आयात केलेली व्यावसायिक वाहने इ.

**समारोप:**

थोडक्यात, अर्थसंकल्प २०१५-१६ चा साकल्याने विचार केला असता, *सबका साथ सबका विकास* हा नारा देत एक हाती सत्तेत आलेल्या भाजपा सरकारने *सबका साथ पण फक्त उद्योगपतींचा विकास* असा नारा या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जनतेसमोर ठेवलेला आहे असे सकृतदर्शनी वाटते. कारण शेती सहकार, महिला, मध्यम वर्गीय, जेष्ठ नागरिक इ. सर्वांच्याच वाट्याला या अर्थसंकल्पातून येणाऱ्या काही वर्षात निराशा आलेली आहे. या सर्वच लोकांना खूष करून लोकप्रिय अर्थमंत्री होण्याची तसेच शेतीला व सहकाराला नवसंजीवनी देण्याची संधी अर्थमंत्र्यांनी निश्चितच दवडली आहे. परंतु येणाऱ्या काही वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यासाठी अर्थमंत्र्यांनी उचललेली ही थोडीशी कठोर वाटणारी पावले देशाच्या दृष्टीने हितकारकच आहेत हे देखिल विसरून चालणार नाही. शिक्षण क्षेत्र, ऊर्जा क्षेत्र, रोजगार इ. बाबत अर्थसंकल्पात घेतलेल्या काही निर्णयांचे महत्त्व देशाचे भवितव्य लक्षात घेता निश्चितच नाकारता येणार नाही.

**संदर्भ ग्रंथसूची:**


१. मुडेकर, तेजस्विनी बी. (२०१५), *उद्योगांकडे लक्ष, शेतीकडे दुर्लक्ष,* प्रबोधन प्रकाशन ज्योती, मार्च, पृ. ४४ ते ४६.

२. पाटील, जे. एफ. (२०१५), *भारत अर्थसंकल्प* २०१५-१६, प्रबोधन प्रकाशन ज्योती, मार्च पृ. ४७ ते ४९.

३. दै. लोकमत, दै. सकाळ, दै. लोकसत्ता, Economic Times - Date : 01/03/2015.

४. indiabudget.nic.in/ub2015-16/bh1.pdf - Date 01/03/15.

५. www.finmin.nic.in - Budget Speech of Finance Minister, Dated 01/03/2015.

# भारतीय नियोजनाचे बदलते स्वरूप: नीती आयोग

**प्रशांत हरमकर**, अमरावती,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ७०३०८७९७६१

नियोजन आयोगाला प्रतिस्थापित करून नवीन संस्थेच्या भूमिकेबाबत सध्या विस्तृत चर्चा सुरू आहे. प्रधानमंत्री यांनी २०१४ च्या स्वातंत्र्यदिनी राष्ट्राला संबोधित करताना स्पष्ट केले की, नियोजन आयोग प्रतिस्थापित करून नवीन संस्था उभी केली जाणार आहे. कॅबिनेट मंत्रीमंडळाने याला मंजुरी देऊन ७ जानेवारी २०१५ रोजी केंद्र सरकारने या नवीन संस्थेच्या सिमा स्पष्ट केल्या आणि विस्तृत स्वरूपात मांडणी केली. नीती आयोगाची (National Institution for Transforming India - NITI) कार्य आणि त्याकडे झालेले हस्तांतरण यावरून त्याच्या भूमिकेकडे व आव्हानाचा सामना कशा प्रकारे केला जाईल याकडे बघता येते. प्रस्तुत लेखामध्ये नीती आयोगाचे विवेचन करीत असतांना नियोजन आयोगाची पार्श्वभूमी व भूमिका, नवउदारीकरण, नियोजन आयोगाकडून नीती आयोगाकडे झालेले हस्तातंरण आणि नीती आयोगाची कार्य व भूमिका यावर प्रकाश टाकणार आहोत.

### वसाहतविरूद्ध लढा आणि राष्ट्रीय नियोजन:

राष्ट्रीय नियोजनाची कल्पना ही स्वातंत्र्यापूर्वीपासूनची आहे. नियोजन आयोगाची स्थापना पं. जवाहरलाल नेहरू यांच्या काळात झाली. भारतीय नियोजन समिती स्थापन करण्याचा सल्ला मेघनाद शहा यांनी दिला तर अर्थतज्ञ के.टी. शाह यांचा याकरिता सहयोग मिळाला. के.जे. खम्बट्टा यांनी ब्रिटीश भारतामध्ये ऱ्हास कशा प्रकारे घडून आला याचे विवेचन पॉल बरन यांच्या The Political Economy of Growth या ग्रंथावरून केले होते. खम्बट्टा यांच्या विवेचनाचा जवळचा संबंध भारतीय नियोजन अंमलात येण्याशी आहे. कारण वसाहतीविरूद्ध दिलेला स्वातंत्र्य लढा आणि वसाहतीमध्ये झालेल्या शोषणावर मात करण्याकरिता

नियोजनाची संकल्पना भारतात रूजवली गेली.

नियोजन आयोग हा सोव्हिएत रशियाच्या काळाचा अवशेष आहे का? सोव्हिएत रशियाकडून उधार घेतलेली ही विचारसरणी होती का? वसाहतीमध्ये झालेले शोषण आणि वसाहती विरूद्ध लढा यामुळे आपण नियोजनावर आपला मालकी हक्क दाखवू शकतो का ? या सर्व प्रश्नाकडे बघत असताना लक्षात येते की सोव्हिएत रशियाने विशिष्ट ध्येयाने प्रेरीत होऊन नियोजनाद्वारे आपली उद्दिष्ट संपादित केली होती. सोव्हिएत रशियामध्ये नियोजन दीर्घकाळपर्यंत टिकूनही राहिले. भारतामध्ये नियोजन प्रघात म्हणून स्वीकारले नाही तर वसाहतीमधून नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांच्या संपूर्ण मर्यादेमध्ये ते बसणारे होते म्हणून नियोजनाचा स्विकार करण्यात आला.

भारत ब्रिटिशाची वसाहत असतांना या वसाहतीमधून कृषीसारख्या कच्चा मालाची निर्यात तर ज्युट आणि कापूस यावर प्रक्रिया करून पक्क्या मालाची आयात केल्या जात होती. ब्रिटिश भारतात प्रतिव्यक्ती धान्याच्या उपलब्धतेमध्ये प्रचंड (एकूण २५ प्रतिशत) घसरण झाली होती. वसाहतीमध्ये कृषी क्षेत्राची दुरावस्था, लघू व कुटीर उद्योगाचा ऱ्हास, दारिद्र्यामध्ये झालेली वाढ व खालावलेल्या जीवनमानाचा स्तर, कच्चा मालाची निर्यात व पक्क्या मालाची आयात यामुळे भारत एक परावलंबी देश बनला होता. भारत हा स्वावलंबी, संपन्न, समृद्ध आणि सुदृढ लोकशाही असणारा देश व्हावा याकरिता देशाला आर्थिक विकासाची गरज होती. विकास साध्य करण्याकरिता भांडवलशाही ही अपुरी होती. आर्थिक-सामाजिक विकास घडवून आणण्याकरिता भारतासारख्या लोकशाही देशाने नियोजनाचा मार्ग स्वीकारला. या अनुषंगाने भारतात संमिश्र अर्थव्यवस्था रूजवल्या गेली. वसाहती विरूद्धच्या लढ्यात जी आश्वासने सामान्य जनतेला दिली होती त्याची वचनपूर्तता करण्याकरिता नियोजनाचा मार्ग स्वीकारला.

### नवउदारीकरण आणि नियोजनाचा लोप:

राष्ट्रीय लोकशाही संघटन (National Democratic Alliance) यांनी भारत सरकारला अहवाल देऊन नियोजन आयोग बरखास्त करण्याची शिफारस केली. कारण नियोजन आयोग हा दुर्बल ठरतो आहे. नियोजन आयोग हा दुर्बल का ठरला? याबाबत भारत सरकारकडून उत्तर देताना ठासून सांगितल्या गेले की नियोजन आयोगाच्या संदर्भात नवउदारीकरणाची कोणतीही भूमिका नाही. नेहरू महालनोबिस प्रारूपाकडून देश आता पुढे गेलेला आहे. नियोजनाकरिता सार्वजनिक गुंतवणूक अपर्याप्त आहे. गुंतवणूकीला प्रभावी करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे. याकरिता विकास प्रकल्पामध्ये सार्वजनिक खाजगी सहभाग (Public Private Partnership) वाढवावा लागणार आहे. सार्वजनिक-खाजगी सहभागाला उत्तेजन देणे म्हणजेच नवउदारीकरणाच्या प्रक्रियेला वेग देणे आहे. नियोजन आयोगासारखी मंडळे याप्रकारची भूमिका यापुढे पार पाडू शकणार नाही. म्हणून नियोजन आयोग बरखास्त करण्यात आला.

अंतर्गत बाजूला शासनामध्ये उणीवा असतांना बाह्य बाजूला जागतिकीकरणाच्या प्रचंड दबाव आहे. त्यामुळे *इच्छा असो वा नसो* आधारभूतपणे नवउदारीकरण धोरणाचा अंगिकार करावाच लागणार आहे नवउदारीकरण

स्वीकारलेले राज्य हे त्या वसाहतेत्तर (Post-colonial) राज्यापेक्षा गुणात्मकरित्या भिन्न आहे. (दोन्हीमध्ये भांडवलशाहीला उत्तेजन वेगवेगळ्या मार्गाने दिले जाते) नवउदारीकरणाचा संबंध केवळ नियोजन आयोगाचा लोप होण्याशीच मर्यादीत नाही, तर याचा संबंध प्रत्यक्षात सोव्हिएत रशियाच्या पतनाशी जुळलेला आहे. हा सबंध आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदलाशी जुळलेला आहे. भारतासारख्या साम्राज्यशाही विरोधी, वसाहतविरोधी राज्याद्वारे नियोजनाची संकल्पना सोडून देण्याशी ही शृंखला जुळलेली आहे. सोबतच आंतरराष्ट्रीय भांडवलाची गरज आणि वित्त निगमाना (Financial Corporate) यामध्ये सामावून घेतले आहे.

मनमोहन सिंग याचे सरकार नवउदारीकरणाशी सहमत होते. मात्र पं.नेहरूच्या पंरपरांचा मार्ग सोडला तर दोषारोपण होईल याची काळजी त्यांना वाटत होती. थोडक्यात सांगायचे झाले तर मनमोहन सिंगाचे सरकार फार कोंडीत पकडले गेले होते. केवळ नियोजन आयोग शिल्लक राहिला होता. बाकी सर्व धोरणे नवउदारीकरणाशीच जोडल्या गेली होती. नरेंद्र मोदी यांच्या सरकारने एक पाऊल पुढे जाऊन नियोजन आयोग बरखास्त केला. तिसऱ्या जगातील अनेक देशांकडे बघितले तर जागतिक वित्तीय नोकरशाहीकडे अर्थव्यवस्थेची कामगिरी विश्वासाने सोपविलेली आहे. यामधूनच नियोजन आयोगाचे संक्रमण नीती आयोगाकडे झालेले आहे. याचेच प्रतिबिंब उमटून वसाहतविरूद्ध राज्याचे संक्रमण नवउदारीकरण राज्याकडे होणार आहे.

**नवउदारीकरणाची साधने:**

नियोजन आयोगाला दुर्बल करून नियोजन आयोगाची भूमिका नवउदारीकरण धोरणाच्या ताब्यात दिली जात आहे. नवउदारीकरण धोरणाशी नियोजनाला जोडणे म्हणजे नवउदारीकरणाच्या साधनाची निर्मिती करणेच आहे. १९९० च्या दशकापासूनच बाजाराला (Market) फार महत्त्व दिल्याचे दिसून येते. नव्वदच्या दशकामध्ये राज्य हे कर्ज सापळ्यामध्ये अडकले होते. या परिस्थितीचा लाभ उठवून वित्त आयोगाने नवउदारीकरण धोरणावर भर दिला. याबाबत अकराव्या वित्त आयोगाचे सदस्य अमरीश बाग्ची यांनी तीव्र मतभेद नोंदविले होते.

अत्यंत महत्वाचे कारण असे की, केंद्राने राज्यांना ऋण देताना उच्चतम व्याजदर आकारले होते. प्रत्येक राज्यासाठीचा भारांकित व्याज दर हा राज्याच्या कर-समग्र राज्य देशीय उत्पादाच्या (Tax-gross state Domestic product) पेक्षा जास्त होता. उच्चतम व्याजदरानी अडथळे निर्माण केले होते. थोडक्यात नियोजन आयोगाचा उपयोग साधन म्हणून करीत असतांना राज्याची पत घसरली होती. यासर्वांमागे नवउदारीकरणाची धोरणेच होती. नवउदारीकरणाच्या चौकटीत उलगडलेले राजकीय अर्थशास्त्र म्हणजे नियोजन आयोगाला दुर्बल ठरविले आहे. याचा संबंध हा विशिष्ट धोरणाच्या अंमलबजावणीशी जुळलेला आहे. ही धोरणे सर्वव्यापी अशा भांडवलशाहीलाच प्रस्तुत करतात.

भारत हा राष्ट्र-राज्य (Nation-State) आहे. राष्ट्र-राज्यामध्ये नियोजन आयोगाची भूमिका नेहरू-महालनोबिस व्यूहरचनेअंतर्गत उपयुक्त होती. राष्ट्र-राज्याला अभिप्रेत दृश्यता

प्रत्यक्षात घडून येईल का? या प्रश्नाचे उत्तर सकारात्मकरित्या लागू होते. याचा संबंध राज्याने स्वीकारलेल्या केन्सीयन सिद्धांताशी आहे. या सिद्धातांनुसार हे समाजवादी राज्य (Social State) आहे. यामध्ये उप-पर्याप्तता (Sub-optional) शोधल्या जातात. या मार्गाने जात असताना त्याला अधिक्याने चांगल्या करण्याचा प्रयत्न केला जातो. राज्याच्या भूमिकेमुळे उप-पर्याप्तता घडून येते. केन्सच्या दृष्टीकोनातून आर्थिक मंदी घडून आलेली असताना राज्य हस्तक्षेपाला पुढाकार घेऊन उप-पर्याप्तता घडवून आणावी लागते.

अशा प्रकारचा बदल एका पातळीपर्यंत घडू शकतो. त्याच वेळेला समाजातील एक वर्ग अत्यंत वाईट पातळीला सुद्धा जाऊ शकतो. महामंदीच्या स्थितीत राज्यहस्तक्षेपाद्वारे परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. भांडवलदार वर्गाला नफा तर श्रमिकांना रोजगार प्राप्त झाला. तरीसुद्धा भांडवलदार वर्गाचे सामाजिक वर्चस्व (Social legmony) प्राप्त झाले. याबाबत श्रीमती जोन रॉबीन्सन याचे मत महत्त्वाचे ठरते. *भांडवलशाही व्यवस्थेमधील उणीव म्हणजे भांडवलशाही ही शासनाची शक्तीच संपुष्टात आणते.* शासनाला व्यवस्थेमधील आपली शक्ती टिकवून ठेवायची असेल तर उणीवावर उपाय शोधावे लागणार आहे. खरोखरपणे यामधला संबंध लक्षात घेतला तर, भांडवलशाही व्यवस्थेमध्ये जशा उणीवा आहेत, तशाच त्या नवउदारीकरणाचेमध्ये आहे. या सर्वांचे मूल्य असे की, कोणतेही राष्ट्र-राज्य स्वायत्तता अंगीकारू शकतो. याचा उपयोग करून यामधील तरतूदी नवउदारीकरणाची जुळवल्या जाऊ शकतात. याद्वारेच जागतिक भांडवलशाहीशी वाटाघाटी केल्या जाऊ शकतात. स्वायत्ततेचा उपयोग करून व्यवस्थाबद्ध परिणाम घडवून आणले जाऊ शकतात. नियोजन आयोगाच्या तरतूदी नवउदारीकरणाशी जुळवून घेतल्या जाऊ शकतात.

**नियोजन आयोगाकडून निती आयोगाकडे:**

नीती आयोगामध्ये आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होणार आहे. आर्थिकसत्तेचे केंद्रीकरण हे नियोजन आयोगाकडून संक्रमण घेऊन नीती आयोगाकडे होत असतांना होणार आहे. नियोजन आयोगाला काही बाबतीत अपयश प्राप्त झाले. अर्थव्यवस्थेमध्ये जे उत्पादन घेतले जाते त्यामध्ये खाजगी क्षेत्राच्या उत्पादनाचा वाटा मोठा आहे. मात्र प्रत्यक्षात खाजगी क्षेत्राकरिता नियोजन नव्हते. केवळ सार्वजनिक क्षेत्राकरिता नियोजन होते. नियोजनाचे सुसूत्रीकरण घडवून आणण्यामध्ये जी प्रभावी यंत्रणा पाहिजे त्याचा अभाव होता. खाजगी क्षेत्राचा एक प्रकारे नियोजनाशी असंबधच होता. खाजगी क्षेत्राचा देखील संसाधनाचा दबाव वाढतो आहे. याकरिता संसाधनाच्या नियोजनाची आवश्यकता होती. मात्र प्रत्यक्षात खाजगी क्षेत्रात घसरण आहे, तर सार्वजनिक क्षेत्राच्या नियोजनामध्ये अवास्तविकता (Non-realisation) आहे.

परवाना धोरण,खाजगी क्षेत्राकरिता योजना इ. साधनाचा वापर नियोजनामध्ये करण्यात आला. मात्र याकरिता कार्यालयीन समिती ही परिणामकारक नव्हती. याचा परिणाम असा झाली की, भांडवलाची केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढली. यामुळे संपत्ती आणि उत्पन्नातील असमानता वाढली. यासारखी स्थिती उद्‌भवणे ही धोक्याची घंटा आहे. ही दूरदृष्टी ठेवूनच पं.

नेहरू यांनी असमानतेबाबत महालनोबीस समितीची स्थापना १९५० मध्ये केली. नियोजनाच्या आरंभापासूनच असमानतेची प्रवृत्ती कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशा प्रकारची असमानतेची प्रवृत्ती घडून येणे याला अमेय बाग्ची यांनी आंशिक नियोजन (Partial Planning) असे म्हटले आहे.

नियोजन प्रक्रियेचा प्रत्यक्ष परिणाम राष्ट्रीय आर्थिक धोरणावर होतो. केंद्र सरकारची साधने ही राज्याला प्रस्तुत करीत नाही त्यामुळे ते संघराज्य पद्धतीच्या विरूद्ध जाते. नवउदारीकरणाचा पुरस्कार करणारे अर्थशास्त्रज्ञ खाजगी क्षेत्राच्या मजबूतीवर भर देत आहे. खऱ्या अर्थाने भारतीय नियोजनामध्येच खाजगी क्षेत्राची बांधणी झाली होती. अशोक मित्रा याच्या मते नियोजन आयोगाने खूप परिश्रमाने बदल घडवून आणले होते. जे नियोजन आयोगाने काटकसर (Tightened) करून निर्माण केले ते नीती आयोग सैल (Loosened) करून करणार आहे.

नीती आयोगाचे बाह्य स्वरूप स्पष्ट करीत असतांना नीती आयोगाबाबतचे निर्देश स्पष्ट आहेत. नीती आयोगाचे अंतर्गत कार्य चालण्याकरिता तीन वाहिन्या आहेत. वित्त आयोग ही पहिली वाहिनी असून ही वाहीनी पूर्वीप्रमाणेच केंद्राकडून राज्याकडे निधी सोपविण्याचे कार्य करेल. वित्त आयोग संविधानात्मक मंडळ (Constitutional Body) असून यामार्फत दूरदर्शी बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाईल. वित्त आयोगाने वितरणाच्या सदंर्भातील अटी निश्चित केलेल्या असतात. केंद्र शासनाने जो नवउदारीकरणाचा दृष्टीकोन बाळगला आहे याच अंतर्गत संसाधनाची उपलब्धता व वितरण वित्त आयोगाला करायचे आहे.

वित्त आयोग, नियोजन मंडळ आणि वित्त मंत्रालय या तीन वाहीन्यांतर्गत नवउदारमतवादी धोरणे राबविल्या जाणार आहे. हा प्रभाव केंद्राकडून राज्याकडे पडत असताना नियोजन आयोग लोप पावेल. याचा अर्थ असा की नियोजनाच्या स्वरूपामध्ये बदल करून वित्त मंत्रालयामार्फत आवंटन केल्या जाईल. केंद्राचे राज्याच्या नियोजनावरील नियंत्रण वाढणार आहे. नियोजनाचे स्वरूप बदलत असताना नियोजनाच्या व्याप्तीमध्ये कपात केल्या जाईल.

नियोजनाच्या व्याप्तीमध्ये कपात घडून येतांना राष्ट्रीय विकास समिती (National Development Council) बरखास्त केली जाईल. या राष्ट्रीय विकास समितीमध्ये राज्याचे मुख्यमंत्री राज्याचे प्रतिनिधित्व करीत होते. हे संविधानिक मंडळ नव्हते. मात्र राज्याच्या विकासावर या समितीचा चांगला परिणाम घडून येत होता. एक प्रकारे अप्रत्यक्ष स्वरूपाचे ते सामर्थ्यच होते. केंद्र सरकार उत्पन्न वाढीवर भर देत असताना कोणत्या प्रकारचा अडथळा निर्माण झाला तर त्याला एकमताने विरोध करून मुख्यमंत्र्याच्या दृष्टीकोनातून काही निधीही कार्यक्रमाकरिता दिला जात होता. (उदा. सर्वशिक्षा अभियान) राष्ट्रीय विकास समिती ही राज्याची मुख्य शक्ती होती. या शासन समितीला (Governing Council) ला मुख्यमंत्री प्रस्तुत करीत होते. आताच्या नीती आयोगापुढे मूलभूत विकासाचे वादप्रश्न आहेत. प्रादेशिक पातळीवरच्या समित्याची बैठकी होत असताना केंद्र सरकारने राज्यांच्या अनुकूल धोरणे राबवावी अशी विनंती केली जात आहे. शिवाय केंद्र

सरकारच्या योजना आणि कार्यक्रमासंबंधी गंभीर आव्हाने आहेत.

नीती आयोगावर एक आक्षेप असा घेतला जातो की, राज्यांना जी संसाधने दिली जातात ह्यामध्ये कपात केली जाणार आहे. तसेच राज्यांच्या नियोजनावर केंद्राचे नियंत्रण वाढणार आहे. हे नियंत्रण वाढत असताना प्रकल्पामधील गुंतवणूकीमध्ये सार्वजनिक खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवावा याकरिता केंद्र सरकार राज्यावर दबाव निर्माण करू शकतो. (मनमोहन सिंग सरकारला अशा प्रकारच्या प्रयत्नामध्ये अपयश आले होते) त्याच बरोबर राज्यांनी अधिक्याने खाजगी गुंतवणूक आकर्षित करावी. सर्व राज्यांनी नवउदारीकरणाचे प्रारूप राबवावे यावर केंद्र सरकारचा भर राहणार आहे. यामुळे सर्व राज्यांना पुरेशी संसाधने उपलब्ध होतील असा केंद्र सरकारचा विश्वास आहे. नीती आयोगाद्वारे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. नीती आयोगाच्या कार्यक्षेत्रात राज्यांना स्वतंत्र मार्ग निवडता येणार नाही. नवउदारीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सर्व भर हा केंद्रीकरणावर राहणार आहे.

### नियोजन आयोगामधील विरोधाभास:

नियोजन आयोगामध्ये केवळ बदलच केले गेले नाही तर त्याला संपुष्टातच आणले आहे. यापूर्वीचे पंतप्रधान (मनमोहन सिंग) असे म्हणत होते की, बदलणाऱ्या परिस्थितीचे पुनर्स्पष्टीकरण करून त्याची नव्याने भूमिका मांडायची गरज आहे. बाजार अर्थव्यवस्थेसाठी नियोजनाची कृती लागू करण्यामध्ये अडथळे आहेत. पायाभूत सुविधामध्ये सार्वजनिक गुंतवणूक पुरेशी नाही म्हणून सार्वजनिक खाजगी सहभागाच्या गुंतवणूकीला नियोजन आयोगाने उत्तेजन दिले होते. यामुळे एक प्रकारे अवरोध निर्माण झालेले होते. नियोजन आयोगाच्या काळात विविध केंद्र पुरस्कृत योजनामध्ये वाढ झाली. नीती आयोगाच्या काळात या सर्व योजना एकत्र बसविण्याचा (One-size fit all) प्रयत्न केला आहे. यामुळे सार्वजनिक खर्चात विरूपणे (Distortions) निर्माण होणार आहे. राज्यांमध्ये बदल घडवून आणण्याबाबत नियोजन आयोगाकडे दूरदर्शीत्व होते. राज्याना जी योजनेत्तर प्राप्ती (Non-Plan Revenue) मिळत होती त्यामध्ये वित्त आयोगाच्या अटी नुसार तूट निर्माण झालेली होती. ही तुट नियोजन आयोगाद्वारे नाकारली होती.

नियोजन आयोगाच्या संदर्भात आर्थिक परिस्थिती आणि भारतीय विकास व्यूहरचना यामध्ये संस्थात्मक चौकटीच्या दबावाअंतर्गत दोन विरोधाभास दिसून आले. पहिला विरोधाभास हा नियोजनाची चौकट आणि बाजाराच्या भूमिकेबाबत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात गरजेनुसार नियोजनाची चौकट निर्माण करून न्यूनतम पातळीची बचत आवंटीत करण्यात आली. ही गुंतवणूक मूलभूत सुविधामध्ये होणे आवश्यक होते तर प्राथमिक क्षेत्राला मूलभूत सुविधा आवश्यक होत्या. पण यामध्ये तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये स्पर्धात्मक पातळीवर उणीवा निर्माण झाल्या. आर्थिक सुधारणाचा कार्यक्रम स्विकारल्यानंतर जे संक्रमण घडून आले ते स्विकारलेल्या चौकटीत अपयशी ठरू लागले. सोबतच राजकोषीय दवाव वाढू लागला. आधिक्याने बांधल्या गेल्यामुळे आणि राजकीय अर्थशास्त्राच्या घटकामुळे ऱ्हासकारी प्रभाव घडून आला. मूलभूत

संरचनेवरचा खर्च हस्तांतरीत आणि अनुदानाद्वारे करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात नियोजनाच्या कृतीमध्ये त्याचे नुकसानचे झाले.

दुसरा विरोधाभास असा की, संघराज्यीय सामव्यवस्थेमध्ये राज्याच्या विकासाची भूमिका आणि संसाधनाचे आवंटन यावर प्रभूत्व केंद्र सरकारचे राहत होते. एकपक्षीय सरकारचा अंत झाला आणि युतीच्या सरकारांचा उदय झाला. प्रादेशिक पक्ष हे केंद्रांमध्ये युती घडवून आणतात. यामुळे संघराज्यीय चौकटीच्या केंद्र पुरस्कृत नियोजनामध्ये विरोधाभास घडून येतात. वरील सर्वांचा परिणाम असा घडून येतो की, खाजगी क्षेत्र आणि राज्य दोन महत्वाचे स्त्रोत आहे जो की आर्थिक गतीशीलतेवर दवाब निर्माण करतात.

**नीती आयोगाचे स्वरूप:**

नीती आयोग या नवीन संस्थेचे पैलू म्हणजे शिल्पकार, अभियांत्रिक आणि व्यवस्थापन राहणार आहे. गतिशीलता हा या संस्थेच्या कार्याचा भाग आहे. आर्थिक उदारीकरणानंतर निर्माण झालेले खाजगी क्षेत्र आणि नीती आयोग मिळून धोरणाची मांडणी करणार आहे. या धोरणामधून खाजगी उद्यमाना सामर्थ्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पशु भावापासून (Animal spirit) खाजगी उद्यमांना मुक्त करणे आणि त्यांच्या दबाव निर्माण न करणे तसेच क्षैतिज (Horizontial) आणि लंबोत्तर (Vertical) स्वरूपाची स्पर्धा राजकोषीय व्यवस्थेमध्ये बहुपातळीवर असावी. आर्थिक गतिशीलता हे महत्वाचे स्त्रोत असून त्याचे मापन स्पर्धात्मक समानता (Competative Equality) आणि व्यय लाभ योग्यता (Cost-Benefit Appropriability) अंतर्गत व्हावे. तर परजीवभक्षी (Predatory) स्पर्धा ही अडथळे निर्माण करणारी ठरते. संघराज्य पद्धती ही नवप्रवर्तन, अनुकरण, शिकणे आणि सुविधा प्राप्त करून देण्याला महत्त्व देणारी आहे. यासोबतच सहकार्य देण्याचा व्यय हा फार मोठा आहे. युतीची सरकारे आणि प्रादेशिक पक्ष हे राज्यामध्ये शक्तीशाली आहे. त्यामुळे ती केंद्रात सुद्धा शक्तीशाली राहणार आहे. तळापासून स्पर्धा निर्माण करण्यामध्ये ज्या अडचणी निर्माण होतात त्याकरिता राज्याराज्यामध्ये स्पर्धा निर्माण करण्याची अत्यंत गरज आहे. ही सर्व गरज लक्षात घेऊन नवीन संस्था उभारण्याची गरज आहे. या संस्थेने कमी सौदाशक्तीला उत्तेजन द्यावे यामुळे सहकार्य संघराज्यवादाला उत्तेजन मिळेल तरच वादप्रश्नामध्ये निग्रहता निर्माण होईल.

**नीती आयोगाची भूमिका:**

कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या नुसार नीती आयोगाकडे १३ वेगवेगळी कामे नेमून दिलेली आहे. या कामाचे चार गटाअंतर्गत वर्गीकरण करता येते.

१) सातत्याच्या आधारावर राज्याला संरचनात्मक सहाय्याच्या तरतुदीद्वारे सहकार संघराज्यवादाचे संगोपन करणे.

२) दीर्घकालीन धोरण, व्यूहरचनात्मक दृष्टीकोन आणि कार्यक्रमाची चौकट याकरिता समष्टी अर्थव्यवस्था आणि विविध क्षेत्राचे सुसूत्रीकरण करणे.

३) जागतिक उपलब्ध संशोधनामधील प्रवेश आणि संशोधन आदानाच्या तरतूदी अंतर्गत ज्ञानाचा कृतीमध्ये वापर आणि नवप्रवर्तन कृतीचा मध्यभाग असणे.

४) आंतरविभागीय सहकार्य घडून येण्यासाठी

व्यासपीठ उपलब्ध करून देणे. यावरील चार कार्यांची विस्तृत चर्चा आपल्याला पुढील प्रमाणे करता येईल:

१) सहकार संघराज्यवाद-केंद्र आणि राज्यामध्ये संमती:

नीती आयोगाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी म्हणजे सहकार संघराज्याला प्रोत्साहन देणे होय. याकरिता रचनात्मक सहकार्य आणि यांत्र (Mechanism) निर्मितीमध्ये पुढाकार घ्यावा लागणार आहे. यामध्ये संविधानात्मक मर्यादा असून त्या राज्य आणि संघाबाबत आहे. बरेचदा राज्य आणि संघाची कार्य मिळतीजुळती आहे. तर काही कार्यांची परस्परामध्ये सरमिसळ आहे. संघराज्यीय संरचनेची बांधणी लक्षात घेता सहकार्याचे संगोपन करताना स्थिर आणि शाश्वत विकास कार्यक्रमपत्रिकेची आवश्यकता आहे.

समन्वयाची अनेक क्षेत्रामध्ये गरज आहे. गेल्या काही वर्षामध्ये सहकार्याची गरज ही प्रामुख्याने उर्जा व पर्यावरण, शिक्षण व दारिद्र्य यामध्ये दिसून आली. सहकार्य घडून येताना वेगवान निर्णय घेण्याची गरज आहे. चिंताजनक परिस्थितीचा पाठलाग हा विकास कार्यक्रम पत्रिकेला करावा लागणार आहे. संघराज्य शासन पद्धतीमध्ये राष्ट्रहिताकरिता मध्यस्थी राज्याला करावी लागणार आहे. जसे की, राज्याच्या अखत्यारित काही विषय येतात. जशा सार्वजनिक सेवा या राज्याच्या अखत्यारीतला विषय आहे. सेवाचे वितरण करण्याकरिता बाह्यत्ता (Externalalities) आणि किमान दर्जा यामध्ये सहकार्य घडून आले पाहिजे. (उदा.आरोग्य सुरक्षा, नागरी विकास व दारिद्र्य निर्मुलन) याबाबत राज्य सरकारांना समान उद्दिष्ट संपादित करण्याकरिता सहकार्य आवश्यक आहे. संघाच्या दृष्टीकोनातून विचार केला तर राज्य ही अभिकरण संस्था (Agency) म्हणून अंमलबजावणी लोकांकरिता करीत असते. नीती आयोग हा माहितीचा आणि अनुभवाचा विनिमय करणारा आहे. राज्याराज्यामधील निरोगी स्पर्धेला उत्तेजन देणार आहे. सोबतच नियमाचे पालन व या सर्वांबाबतचा अहवाल देणार आहे.

अत्यंत महत्वाचा वादप्रश्न असा की नीती आयोग करार करू शकतो. सोबतच केंद्र पुरस्कृत योजनाचे विवेकी पद्धतीने अंमलबजावणी करू शकतो. कारण केंद्र पुरस्कृत योजनाचे विवेकी पद्धतीने अंमलबजावणी करू शकतो. मात्र केंद्र पुरस्कृत योजनाची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. २०११ मध्ये १४७ योजना होत्या. त्यापैकी ६६ अशा योजना होत्या की ज्या मूल्यमापन केल्यानंतर बंद करण्यात आल्या. ज्या योजना शिल्लक होत्या त्या सहाय्यक योजनामध्ये (Sub-Scheme) नव्याने मांडण्यात आल्या. एकामध्ये सर्व योजना सामावून घेण्यात आल्या (One size fit all). या प्रकारे योजनाची रचना तयार करण्यात आली. मोठ्या प्रमाणात केंद्र पुरस्कृत योजना एकमेकांशी जोडतांना निधीची मागणी करण्यात आली. राज्याच्या प्राथमिकता लक्षात घेऊन निधीची मागणी करण्यात आली. अनुदानाचा लाभ मिळत असताना त्यावर मर्यादा अटी अंतर्गत घालण्यात आल्या. मूळ रचनेपेक्षा भिन्न प्रकारे वितरण केल्या जाणार आहे. जर योजनेमध्ये असातत्य असेल तर त्यांना राज्याच्या जबाबदारीवर बांधून घेतले जाणार आहे.

सेवाचा किमान दर्जा खात्रीशीररित्या

मिळावा व त्यामध्ये पारदर्शकता असावी हे उद्दिष्ट ठरविलेले आहे. हे उद्दिष्ट राष्ट्रीय दृष्टीकोनातून महत्वाचे आहे. योजनांना संयुक्त (Collaborative) पणे काम करायचे आहे. याकरिता सहकार संघराज्याच्या आधारावर अंमलबजावणी व रचना निर्माण केल्या जाणार आहे. योजनाचा हेतू हा शुद्ध आहे. त्यांच्या व्याप्तीमध्ये लवचिकता असून अंमलबजावणी करताना स्थानिक अटी अंतर्गत बदल घडवून आणला आला पाहिजे. योजनांच्या संख्येमध्ये मर्यादा राहणार आहे. नीती आयोग हा योजनाची रचना तयार करण्याचे व्यासपीठ राहणार आहे. त्याचबरोबर नीती आयोगाद्वारे अंमलबजावणी, व्यवस्था आणि मुल्यमापनाकरिता संयुक्त अशी चौकट पुरवल्या जाणार आहे.

नीती आयोग सहकार्याच्या भूमिकेचे संगोपन करून शक्ती प्रदान करणारा आहे. येथे आंतरराज्यीय समिती (Interstate Council) ही संविधानावरील कलम २६३ नुसार सक्षमीकरण आयोगाद्वारे घडवून आणारे आहे. ही संस्था वाटाघाटी, चर्चा, सौदा आणि करार घडवून आणणारी अभिकरण संस्था आहे. आंतर शासकीय संबंध (Inter-Governmental Relations), राजकोषीय संघराज्यवाद आणि संविधानिक कायदा याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

२) व्यूहरचनात्मक नियोजन:

नीती आयोगाकडे दुसरी महत्वाची सोपवलेली जबाबदारी म्हणजे समष्टी आणि क्षेत्रीय पातळीवर व्यूहरचनात्मक नियोजन करणे होय. समष्टचल हे प्रमाणबद्ध धोरणांची मांडणी व प्रक्षेपण तयार करण्यास मदत करतात. व्यूहरचना आणि धोरणामधून प्रेक्षपणातील लोकसंख्येचा राहणीमानाचा दर्जा उंचावणे, मानव विकासामध्ये सुधारणा घडून आणणे आणि लोकांची उत्पादकता वाढणे हे सर्व दीर्घकालीन आर्थिक कृतीशी जुळलेले आहे.

कॅबिनेट मंत्रीमंडळाच्यानुसार नियोजन हे तळापासून असले पाहिजे. यांची अंमलबजावणी करताना प्रत्यक्षातील कृती ही मध्यम कालीन नियोजनाची असावी. नियोजन हे सामाजिक आणि भौतिक संरचनेच्या समाधानकारक पातळीपर्यंत पोहचू शकले पाहिजे. अर्थव्यवस्थेमध्ये वृद्धी घडून येण्याकरिता ते आवश्यक आहे. तळापर्यंत नियोजन करीत असताना ते खेड्याच्या पातळीपर्यंत नियोजनाचा अधिकार प्राप्त झाला पाहिजे. या करिता नियोजनाची बांधणी त्या प्रकारची करावी लागणार आहे. याकरिता संसाधने उपलब्ध करून द्यावी लागतील. समग्रपणे नियोजनाचे लाभ उच्चतम पातळीपर्यंत मिळणे आवश्यक आहे. याला जोडून वर्गनिहाय गुंतवणूकीची आवश्यकता आहे. दुसऱ्या शब्दात खेड्याकडून नियोजन होत असताना ती गट आणि जिल्हापातळीपर्यंत केल्या जाईल. यावरून राज्यपातळीवर नियोजन करताना एकसंघता निर्माण होईल. संघटीतपणे राष्ट्रीय नियोजन करीत असतांना त्यामध्ये राज्य पातळीच्या नियोजनाचा समावेश राहील. संघपातळीवर कार्य पार पाडत असताना नियोजनाद्वारे मूलभूत सुविधा व सेवाही पुरवल्या जातील. नीती आयोग हा राज्याकरिता नियोजनाची चौकट निर्माण करतो व पुढेही करणार आहे. त्याला अनुसरूनच राज्याला सल्ला, मार्गदर्शन व महत्त्व केल्या जाणार आहे.

३) नवप्रवर्तन व ज्ञानाचे मध्यवर्ती केंद्र :

नीती आयोगाची भूमिका व्यूहरचनात्मक नियोजनाला सामील करून घेण्याची आहे. व्यूहरचनात्मक नियोजनामध्ये व्यूहरचनात्मक दृष्टी, धोरण आणि कार्यक्रम याचे सुसूत्रीकरण केले आहे. याकरिता नीती आयोग पुढाकार घेईल व नियंत्रण ठेवेल, तसेच त्याबाबतचा अहवालही सादर करेल.

त्याचबरोबर राज्याकरिता कला संशोधन, तंत्रज्ञानाची पातळी उंचावणे आणि क्षमताची बांधणी केल्या जाईल. शासनाचे मुख्य तज्ज्ञ मंडळ विविध विकास योजनावर काम करीत आहे. ते केवळ मुलभूत संशोधन क्षमतांवर भर देणारे नसून त्यामधील प्रवेश आणि संशोधनाचे बाह्य स्त्रोत याची जोडणी जागतिक पातळीच्या विषयवस्तूशी केल्या जाणार आहे. सबळ असा समंक अधिकोष (Data Bank) मजबूत करण्याची आवश्यकता आहे. या समंक अधिकोषाकडे असलेले समंक व माहिती ही लोकसंख्या, अर्थव्यवस्था, भौगोलिक व सामाजिक बदलासंबंधी राहील. ज्याचा संबंध संशोधन आणि धोरणाची राहील. विकासाच्या संदर्भात राज्याचे जे अनुभव आहे त्यामध्ये इतराना सामावून घेण्यासाठी नीती आयोग व्यासपीठ उपलब्ध करून देईल.

४) सहकार्य:

नीती आयोगाकडे सोपविलेले चौथे महत्वाचे काम म्हणजे आंतरशासकीय (राज्याराज्यामध्ये) आणि आंतरविभागीय (विभागाविभागामध्ये) सहकार्य असणे आवश्यक राहील. सहकार्याच्या अभावाचा भीषण परिणाम हा मुलभूत सुविधा, समाविष्ट वातावरण, आर्थिक वृद्धी आणि मंत्रालयावर होतो. यापूर्वीच्या सरकारच्या काळात सहकार्याचा अभाव हा स्पष्टपणे दिसून आला होता.

समारोप:

कॅबिनेट मंत्र्याच्या निर्णयानुसार नीती आयोगाने एक विस्तृत चौकट निर्माण केलेली आहे. नीती आयोगाची परिणामकारकता ही बदलता भारत (Transforming India) वर अवलंबून राहणार आहे. नीती आयोगाची कार्य ही स्पष्टपणे दिलेली आहे. ही संस्था योग्य दिशा देत असताना लोकांना गुणवत्तापूर्ण सुविधा देण्याची शक्ती आणि दर्जा प्राप्त करून देणार आहे. या पहिल्या निती आयोगावर फार जबाबदारी राहणार आहे. कारण नीती आयोगाला स्वतःचे स्थान निर्माण करावे लागणार आहे आणि बदलांना योग्य दिशाही द्यावी लागणार आहे.

नियोजन आयोग बरखास्त झाल्यामुळे त्याचा वारसा संपला असे म्हणता येणार नाही. नीती आयोग नियोजन आयोगाला समांतर अशीच संस्था आहे. नवीन गरजानुसार नियोजन आयोग बदलत्या स्वरूपात मिळणार आहे. संविधानात्मक आवश्यकतेनुसार जिल्हा नियोजन समिती व महानगरीय नियोजन समितीची नेमणूक केल्या जाणार आहे. नवीन वातावरणामध्ये त्याची भूमिका विशिष्ट गरजानुसार राहणार आहे. नीती आयोग तळापासून नियोजन करीत असतांना प्रत्यक्षात तो पुढे कसा जाईल हे गरजांवरून दिसून येईल.

नीती आयोगाला यश संपादन करायचे असेल तर आंतर मंत्रालय आणि आंतरविभागामध्ये सहकार्य आणि विश्वास असण्याची आवश्यकता आहे. विविध

मंत्रालयाच्या कामामध्ये नीती आयोगाला संमती घडवून आणायची आहे. एका बाजूला विविध मंत्रालय आणि औद्योगिक तंत्रज्ञ तर दुसऱ्या बाजूला नोकरशाह आणि औद्योगिक तंत्रज्ञ आहे. यांच्यामध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. आयोगाचे नोकरशाहीकरण धोकादायक सुद्धा ठरू शकते. राज्याकडून मिळणारा सहकार्य व विश्वासावरच सहकार संघराज्यवादाचे संगोपण होऊन यश प्राप्त होणार आहे. आयोगाकडे सोपवलेल्या कामाला आकार द्यायचा आहे. केवळ आकार देवून चालणार नाही तर त्याला गती सुद्धा द्यायची आहे. भारताच्या संघराज्यीय व्यवस्थेमध्ये बदलत्या भारताकरिता ही महत्त्वाची संस्था राहणार असल्याचे म्हटले आहे.

**संदर्भ सूची:**


1) Chakravarty Sukhamoy (2014): *Development Planning - The Indian experience*, Oxford University Press.
2) Patnaik Prabhat (2014), *End of Planning commission*, Economic and Political Weekly, Vol.19 July
3) Patnaik Prabhat (2015), *From the Planning Commission to the NITI Auyog*, Economic & Political Weekly Vol. L, No. 4, Jan. 24.
4) Rao M. Govinda (2015), *Role and Function of NITI Auyog*, Economic and Political Weekly, Vol -L, No. 4, Jan. 24.
5) Bagchi Amiya (1963), *Private Investment and Partial Planning in India*, Cambridge University.
6) Deborao Vivek (2014), *The Planning Commission must be replace*, 22nd August.
7) जहागिरदार दि.व्यं.(२०१५), *नीती आयोगाच्या स्वरूपावर प्रकाशझोत*, दै. हिंदुस्थान.

# ग्रामीण भारतातील शेती क्षेत्राची वाटचाल

गजानन कदम, इंदापूर,
अर्थशास्त्र विभाग,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
जिल्हा - पुणे.
भ्रमणध्वनी : ७५८८१५३४६४
ई-मेल: gajukadam@gmail.com

कृषिप्रधान अर्थव्यवस्थेचे भवितव्य आणि विकास हा शेतीच्या विकासाशी निगडीत असतो. अर्थशास्त्रात ज्याला *वाढावा* म्हणतात तो केवळ कृषी क्षेत्रातच प्राप्त होतो. एका बीजापासून अनेक पटींनी उत्पादन देण्याची किमया फक्त शेतीतच घडते. बी-बियाणे आणि कच्चा माल यापेक्षा पक्का माल अनेक पटींनी उत्पादीत होऊनही शेतकरी कायमच दारिद्र्यात व कर्जात राहतो. यांची कारणे अनेक आहेत. मोठ्या प्रमाणात अनिश्तितता आणि सर्वाधिक धोके कृषी क्षेत्रात आढळून येतात. इतर व्यवसायांच्या मानाने कमी शिक्षण असलेले, कौशल्यांचा अभाव व वैज्ञानिक दृष्टीकोन नसणाऱ्यांची या क्षेत्रात भर आहे.

ग्रामीण भागात प्राबल्य असलेल्या या कृषी व्यवसायात आणि तेथील जनतेस आधार देण्याच्या हेतूने स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी विविध विकास योजना सुरू केल्या. आजही शेती, पूरक व्यवसाय, वने, सामाजिक न्याय, शिक्षण, आरोग्य अशा विविध २५ विभागांच्या वतीने जवळ-जवळ २१० विकास योजना कार्यरत आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी व जनतेच्या विकासाच्या योजना असूनही भारतीय शेतकऱ्यांची सद्यस्थिती फारशी समाधानकारक नाही.

अभ्यासाची उद्दीष्टे:

१) *सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटी* (सीएसडीएस), दिल्ली या संस्थेने केलेल्या पाहणी अहवालाचा अभ्यास करणे.

२) शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

३) शेतकऱ्यांना जाणवणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

४) विविध कृषी विकास योजनांच्या जागरूकते बाबतचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत अभ्यास हा पूर्णपणे व्दितीय सामग्रीवर आधारीत आहे. *सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटी* (सीएसडीएस), दिल्ली यांनी केलेल्या पाहणी अहवालावर हा अभ्यास आधारीत आहे.

*सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटी* (सीएसडीएस), दिल्ली या संस्थेने डिसेंबर २०१३ ते जानेवारी २०१४ या कालावधीत शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती, शेती क्षेत्रातील समस्या व आव्हाने तसेच कृषी विकास योजनांच्या जागरुकतेबाबत व्यापक सर्व्हेक्षण केले. भारतातील १८ राज्यातील १३७ जिल्ह्यातील २७४ गावातील ८२२० कुटुंबाची नमुना म्हणून निवड केली.

(१)भारतीय शेतकरी : सामाजिक व आर्थिक स्थिती-

सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटी (सीएसडीएस), दिल्ली या संस्थेने केलेल्या व्यापक सर्वेक्षणातून भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीबाबत पुढील निष्कर्ष काढले आहेत.

१) ३६ टक्के शेतकरी झोपडी किंवा साध्या घरामध्ये राहतात. ४४ टक्के शेतकरी पडक्या घरामध्ये राहतात, तर फक्त १८ टक्के शेतकऱ्यांकडे स्वत:ची घरे आहेत.
२) एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी २८ टक्के शेतकरी हे अशिक्षीत, १४ टक्के शेतकरी दहावी पास तर ६ टक्के शेतकरी पदवीधर आढळून आले.
३) एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ८३ टक्के शेतकऱ्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय असल्याचे दिसून येते.
४) ३२ टक्के शेतकऱ्यांना शेतातील मिळणाऱ्या अपुऱ्या उत्पन्नामुळे इतर काम करावे लागते.
५) मागील वर्षात प्रत्येक दहा शेतकऱ्यांपैकी एका शेतकऱ्यास बऱ्याच वेळी उपाशी रहावे लागले.
६) एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ६१ टक्के शेतकऱ्यांना दोन वेळा जेवण मिळते, २ टक्के शेतकऱ्यांना एक वेळा तर ३४ टक्के शेतकऱ्यांना दोन वेळापेक्षा जास्त जेवण मिळते.
७) एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ६५ टक्के शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्य शेतीची कामे करण्यासाठी मदत करतात.
८) १० वर्षापेक्षा जास्त काळ शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ७५ टक्के आढळून आले.
९) एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी फक्त १० टक्के शेतकरी संघटनेचे सभासद आहेत.
१०) ८६ टक्के शेतकऱ्यांकडे स्वत:ची जमीन आहे.
११) एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी १४ टक्के शेतकरी भूमिहीन, ६० टक्के शेतकरी लहान (१-३ एकर जमीन असणारे शेतकरी), १९ टक्के शेतकरी मध्यम (४-९ एकर जमीन असणारे शेतकरी) तर ७ टक्के मोठे शेतकरी १० किंवा त्यापेक्षा जास्त जमीन असणारे शेतकरी) आढळून आले.

सीएसडीएसने केलेल्या पाहणी अहवालानुसार २२ टक्के शेतकऱ्यांना शेती करण्याची इच्छा नसल्याचे दिसून आले. जे शेतकरी शेती करतात त्यांच्यापैकी ६० टक्के

शेतकरी परंपरागत व्यवसाय म्हणून, १५ टक्के शेतकऱ्यांना शेती करण्याचा अभिमान आहे म्हणून तर १० टक्के शेतकऱ्यांना आवड म्हणून शेती करतात.

शेतकऱ्यांना शेती करणे आवडत नसण्याच्या कारणांचे वर्गीकरण केले असता ३६ टक्के शेतकऱ्यांच्या मते शेतीतून चांगले उत्पन्न मिळत नसल्यामुळे शेती करणे आवडत नाही. १६ टक्के शेतकऱ्यांच्या मते शेती व्यवसायात भविष्य नसल्यामुळे शेती करणे आवडत नाही तर दुसरा व्यवसाय करण्याची इच्छा असल्यामुळे शेती करणे आवडत नसणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ९ टक्के दिसून आले. केवळ कुटुंबाच्या इच्छेमुळे शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १८ टक्के तर ८ टक्के शेतकऱ्यांना शेती हा जास्त जोखमीचा व्यवसाय असल्यामुळे शेती करणे आवडत नाही. १३ टक्के शेतकऱ्यांना या व्यतिरिक्त इतर कारणामुळे शेती करणे आवडत नाही. दोन तृतीयांश (६६ टक्के) कुटुंबातील महिला शेती व्यवसायात कार्य करतात.

सर्वेक्षित शेतकऱ्यांच्या मालमत्तेबाबत सीएसडीएसने केलेल्या पाहणीनुसार एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ७३ टक्के शेतकऱ्यांकडे मोबाईल फोन ५९ टक्के शेतकऱ्यांकडे गाय व म्हैस ही पाळीव प्राणी, ५५ टक्के शेतकऱ्यांकडे टिव्ही, ४६ टक्के शेतकऱ्यांकडे फॅन, ३५ टक्के शेतकऱ्यांकडे स्कूटर, मोटार सायकल, ३१ टक्के शेतकऱ्यांकडे एलपीजी गॅस, १८ टक्के शेतकऱ्यांकडे फ्रिज, ९ टक्के शेतकऱ्यांकडे ट्रॅक्टर तर ६ टक्के शेतकऱ्यांकडे कार, जीप किंवा व्हॅन असल्याचे दिसते.

७४ टक्के शेतकऱ्यांकडे बँक किंवा पोस्ट ऑफिस खाते तर ५० टक्के शेतकऱ्यांकडे आधार कार्ड असल्याचे आढळून आले. एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ४२ टक्के शेतकरी दारिद्र्यरेषेवरील आहेत. (Above Poverty Line) ४५ टक्के शेतकरी दारिद्र्यरेषेखालील (Below Poverty Line), ४ टक्के शेतकऱ्याकडे अत्योंदय कार्ड, १ टक्के शेतकऱ्यांकडे अन्नपुर्णा कार्ड तर ८ टक्के शेतकऱ्यांकडे कोणतेही कार्ड नसल्याचे आढळून आले.

(२) प्रचलित शेती:

सीएसडीएसने केलेल्या पाहणीनुसार पाण्याच्या दुर्भिक्षामुळे २६ टक्के शेतकरी एकच पीक घेतात, ४६ टक्के शेतकरी दोन पीके, २४ टक्के शेतकरी ३ पिके, तर ४ टक्के शेतकरी ३ पेक्षा जास्त पिके घेतात.

अ) बियाणे -

एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ७० टक्के शेतकरी स्थानिक किंवा परंपरागत बियाणे वापरतात तर केवळ ४ टक्के शेतकरी संकरित बियाण्यांचा वापर करतात.

ब) खते -

एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी रासायनिक खताचा वापर ३५ टक्के शेतकरी शेतीसाठी करतात. सेंद्रिय खतांचा वापर १६ टक्के शेतकरी करतात तर रासायनिक व सेंद्रिय अशा दोन्ही खतांचा एकत्रित वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४० टक्के दिसून आले.

क) एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी १८ टक्के शेतकरी शेतात नियमीत किटकनाशकांचा वापर करतात. २८ टक्के शेतकरी आवश्यकता असेल तर किटकनाशकांचा वापर करतात तर १३ टक्के शेतकरी किटकनाशकांचा वापर करीत नाहीत.

ड) सिंचन -

एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ४० टक्के शेतकऱ्यांकडे सिंचन सुविधा उपलब्ध आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे सिंचन सुविधा उपलब्ध आहेत, त्या मध्ये ४५ टक्के शेतकऱ्यांकडे बोअरवेल, ३८ टक्के शेतकऱ्यांकडे कॅनॉल, ३४ टक्के शेतकऱ्यांकडे विहीर, ३० टक्के शेतकऱ्यांकडे तळे, १९ टक्के नदीमार्फत सिंचन सुविधा आहेत तर ८ टक्के शेतकऱ्यांकडे ठिबक पध्दतीची सिंचन सुविधा आढळून येते.

(इ) वीज -

सिंचन सुविधा मोठ्या प्रमाणावर विजेच्या उपलब्धतेवर अवलंबून असते, परंतु ५१ टक्के शेतकऱ्यांनी शेतीसाठी वीज मिळत नसल्याचे पाहणी अहवालात नमुद केले. ३१ टक्के शेतकऱ्यांनी वीज पुरवठा नियमित होणार असेल तर सद्या देत असलेल्या वीज दरापेक्षा जास्त वीज दर देण्यास होकार दिला.

(३)भारतीय शेतकरी : समस्या व आव्हाने

सीएसडीएसने केलेल्या पाहणीनुसार एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ४७ टक्के शेतकऱ्यांच्या मते भारतातील शेतकऱ्यांची स्थिती बिकट झाली आहे तर १५ टक्के शेतकऱ्यांच्या मते भारतातील शेतकऱ्यांची स्थिती सुधारली आहे. ६७ टक्के महिला शेतकऱ्यांच्या मते शेतीतून मिळणारे उत्पन्न दैनंदिन गरजा भागविण्यासाठी अपुरे पडते तर शेतीतून मिळणारे उत्पन्न दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पुरेसे असल्याचे २० टक्के महिला शेतकऱ्यांना वाटते.

भारतीय शेतकऱ्यांना ज्या समस्या जाणवतात त्यामध्ये पूर किंवा दुष्काळ ही समस्या जाणवणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १३ टक्के, कमी उत्पादकता ही समस्या जाणवणारे ११ टक्के, ९ टक्के शेतकऱ्यांना सिंचनाचा अभाव, अल्प उत्पन्न, संस्थात्मक अडचणी, उत्पादीत मालास अपुरी किंमत या समस्या जाणवणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सारखेच असून ते ८ टक्के असे आढळून आले. मजूरांची समस्या व भाववाढीची समस्या जाणवणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सारखेच असून ते ५ टक्के असे दिसून आले.

एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ७० टक्के शेतकऱ्यांच्या मते मागील वर्षात शेतातील पिकांचे नुकसान झाले. पिकांचे नुकसान प्रामुख्याने अवेळी पाऊस, दुष्काळ, पुर तसेच पिकावर पडणारे रोग या कारणामुळे जास्त प्रमाणात नुकसान होते.

कृषि क्षेत्राची स्थिती वाईट असल्यामुळे व शेती क्षेत्रातील कमी उत्पन्न, कमी उत्पादकता, अनियमित पाऊस तसेच कमी शासकीय सहाय्य इत्यादीमुळे शेतकरी आपल्या मुलाला शेती व्यवसाय करण्यापासून परावृत्त करीत आहोत. सीएसडीएसने केलेल्या पाहणीनुसार एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ५० टक्के शेतकरी आपल्या मागील ५ वर्षाच्या तुलनेत सध्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत समाधानी आहेत तर ४० टक्के शेतकरी आपल्या आर्थिक परिस्थितीबाबत असमाधानी असल्याचे दिसून आले. ६९ टक्के शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील जीवनापेक्षा शहरातील जीवन चांगले वाटते तर १९ टक्के शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील जीवन चांगले वाटते. ज्या शेतकऱ्यांना शहरी जीवन आवडते त्या शेतकऱ्यांना आपली मुले शहरात स्थित व्हावी असे वाटते, कारण शहरात शिक्षणाची सुविधा, रोजगार संधी जास्त उपलब्ध आहेत.

जरा दुसरा व्यवसाय मिळाला तर शेती सोडून देण्याची इच्छा ६२ टक्के शेतकऱ्यांनी व्यक्त केली. २६ टक्के शेतकऱ्यांनी शेती न सोडण्याची इच्छा व्यक्त केली. ३६ टक्के युवकांनी शेतीव्यतिरीक्त इतर व्यवसायात आवड असल्यामुळे शेती व्यवसाय करण्यास असहमती दर्शविली. २२ टक्के युवकांच्या मते शेतीतून मिळणारे उत्पन्न पुरेसे नसते. ७ टक्के युवकांनी शेती व्यवसायात जास्त धोके असल्यामुळे तर ५ टक्के युवकांनी शेती हा पावसावर आधारित व्यवसाय असल्याने शेती करण्यास नकार दिला.

**(४)शेतकऱ्यांना शासकीय योजनेबाबत माहिती:**

स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य शासनांनी अनेक योजना सुरू केल्या. सीएसडीएसने केलेल्या पाहणीनुसार ५१ टक्के शेतकऱ्यांच्या मते या सर्व योजनांचा लाभ बहुतांश श्रीमंत शेतकऱ्यांनाच झाला. गरीब व लहान शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ झाल्याचे केवळ १० टक्के शेतकऱ्यांनी नमुद केले. ८५ टक्के शेतकऱ्यांनी ग्रमीण रोजगार हमी योजनेबद्दल ऐकले, मात्र ४४ टक्के शेतकऱ्यांच्या कुटूंबांनी या योजनेचा लाभ घेतला. ७० टक्के शेतकऱ्यांनी रोख हस्तांतरण योजनेबाबत (Direct Transfer Scheme) ऐकले नाही, त्यापैकी केवळ २७ टक्के शेतकऱ्यांनी जमीन अधिग्रहण कायद्याबद्दल (Load Acquisition Law) ऐकले आहे, त्यापैकी केवळ २१ टक्के शेतकऱ्यांना या कायद्याचा फायदा मिळाला. एकूण निवडलेल्या शेतकऱ्यांपैकी ८३ टक्के शेतकऱ्यांनी परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीबाबत (Foreign Direct Investment) ऐकले नाही.

सीएसडीएसने केलेल्या पाहणीनुसार कर्ज माफी योजनेबाबत ५३ टक्के शेतकऱ्यांनी ऐकले, मात्र प्रत्यक्ष लाभधारक शेतकऱ्यांचे प्रमाण १० टक्के आढळून आले. किसान क्रेडिट कार्ड योजना ५२ टक्के शेतकऱ्यांनी ऐकले आहे तर १५ टक्के शेतकऱ्यांनीच या योजनेचा लाभ घेतला आहे. राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना ३० टक्के शेतकऱ्यांनी ऐकले आहे तर योजनेचे ७ टक्के प्रत्यक्ष लाभार्थी दिसून आले.

ग्रामीण बीज योजनाबाबत ३० टक्के शेतकऱ्यांनी ऐकले तर या योजनेचे लाभधारक १० टक्के शेतकरी आहेत. ग्रामीण भांडार योजना ११ टक्के शेतकऱ्यांना माहित आहे, मात्र या योजनेचा लाभ केवळ ५ टक्के शेतकऱ्यांनी घेतला. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापनाबाबत १३ टक्के शेतकऱ्यांनी ऐकले तर याचा लाभ केवळ २ टक्के शेतकऱ्यांनी घेतला. थोडक्यात, कृषी योजनाबाबत माहिती बऱ्याच शेतकऱ्यांना आहे, मात्र योजनेचे लाभधारक फारच थोडे शेतकरी असल्याचे सीएसडीएसने केलेल्या पाहणीवरून दिसते.

सारांश, सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटी (सीएसडीएस), दिल्ली या संस्थेने केलेल्या पाहणीवरून असे दिसून येते की, ग्रामीण अर्थव्यवस्था ज्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे त्या कृषी क्षेत्राची व शेतकऱ्यांची सद्यस्थिती फारशी समाधानकारक नाही तसेच कृषी क्षेत्रात अनेक समस्या व आव्हाने आहेत.

**संदर्भ सूची :**


१) State of India Farmers : *A Report , Centre for the Study of Developing Societies (CSDS)*, Delhi, March - 2014

२) डॉ. बवले कैलास, *योजनांचा सुकाळ : बळीराजाची आबाळ* , दैनिक प्रभात, दि. ७ मे २०१४ पृ.६

# भारतीय महिला बँकेची भविष्यातील वाटचाल

**गिलबिले हरिभाऊ नरसिंग, भूम,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय, जि.उस्मानाबाद.
भ्रमणध्वनी: ७३५०५३१९७२

भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात फेब्रुवारी २०१३ मध्ये भारतीय महिला बँकेची स्थापना करण्याची घोषणा केली. महिला बँकेच्या पहिल्या अध्यक्ष म्हणून *उषा अनंत सुब्रमण्णम* यांची नेमणूक करण्यात आली. या बँकेसाठी सरकार थेट आर्थिक मदत करणार आहे. या बँकेच्या आठही संचालक महिला आहेत. त्यात छावी राजावत (सरपंच राजस्थान), नपूर मित्रा (माजी अध्यक्ष देना बँक), रेणुका रामनाथ दुभाष (अध्यक्ष विपणन गोदरेज समूह), कल्पना सरोज (सीईओ), प्रिया कुमार (सरकारी नामनिर्देशित) अशा प्रकारे सर्व स्तरातील नेतृत्व या संचालक मंडळात आहे. नोव्हेंबर २०१३ मध्ये भारतीय महिला बँकेची स्थापना करण्यात आली. सध्या देशात २८ राष्ट्रीयीकृत बँका आहेत त्यात या एका राष्ट्रीयकृत बँकेची भर पडलेली आहे. सध्या देशातील २६% महिलाच बँकींग सेवेचा लाभ घेतात. तर केवळ ८% महिलाच कर्ज घेतात. महिला बँकेच्या स्थापनेमुळे यात नक्कीच वाढ होईल. सध्या मुंबई (महाराष्ट्र), आगरताळा (त्रिपुरा), शिलाँग(मेघालय), गंगटोक(सिक्किम) आणि इटानगर (अरूणाचल प्रदेश) येथे शाखा सुरू झालेल्या आहेत. तसेच हैद्राबाद, चंदीगड, शिमला, भुवनेश्वर, जयपूर, डेहराडून, पाटणा, नवीन जयपूर, पणजी, श्रीनगर, थिरूवनंतपुरम व रांची येथेही महिला बँकेच्या शाखा सुरू केल्या जातील. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात देखील या बँकेच्या शाखा सुरू करण्यात येतील.

व्याख्या:

*महिला बँक म्हणजे महिलांनी महिलांसाठी चालवलेली बँक होय.* या बँकेमध्ये सर्व कर्मचारी महिला असतील तसेच बँकेतील सर्व ठेवीदार व कर्जदार हे ही महिलाच असतील किंवा त्यांनाच जास्त प्राधान्य दिले जाईल; असे

असले तरी इतरांना देखील या बँकेत खाते उघडता येईल पण कर्ज मात्र महिलांनाच दिले जाईल. कारण महिला कर्जाचा वापर योग्य प्रकारे करतात. थोडक्यात महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येत महिलांची संख्या निम्मी असल्यामुळे त्यांच्यासाठी स्वतंत्र अशा या बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे.

**महिला बँकेचे महत्त्व (कामकाजाचे स्वरूप):**

महिलांनी महिलांसाठी चालवलेल्या देशातील पहिल्याच भारतीय महिला बँकेचे कामकाज सुरू झाले आहे. मुंबईतील नरीमन पॉंईट येथे ही बँक सुरू झालेली आहे. तिच्या उद्घाटनाच्या वेळी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग व कॉंग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी उपस्थित होत्या. त्यांनी या बँकेसाठी एक हजार कोटी रू. निधी मंजूर केला. या शाखेच्या प्रमुख म्हणून अनिता खांडेकर या पहिल्या मराठी महिलेला मान मिळालेला आहे. त्यांच्या मते देशातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी किंवा त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी या बँकेची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. या बँकेमुळे महिला बचत गटांना कर्ज मिळण्याची सोय निर्माण झालेली आहे. तसेच महिला बचत गटाच्या ठेवीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास मदत होईल. महिलांना रोजगार मिळेल व त्यांचे दारिद्र्य दूर होईल. इतर बँकांमध्ये महिला जाऊन आपले आर्थिक व्यवहार करण्यास तयार होत नाही किंवा त्यांची तेथे कुचंबना होते. म्हणून जर बँकेतील सर्व कर्मचारी व अधिकारी महिला असतील तर महिला ज्याप्रमाणे आपल्या माहेरी बिनधास्त जातात. त्याच प्रमाणे न बिचकता आपल्या माहेरी आल्याप्रमाणे बँकेत येऊन आपले आर्थिक व्यवहार करतील असे मत उषा अनंत सुब्रमण्यम यांनी मांडलेले आहे. सध्या या बँकेच्या बंगळुर, अहमदाबाद, लखनऊ, गुवाहाटी, कोलकत्ता, चेन्नई येथेही शाखा सुरू करण्यात आलेल्या आहेत. देशातील प्रमुख शहरासह खेड्यापाड्यात व ग्रामीण भागात शाखा सुरू केल्यास तळागाळातील महिलांपर्यंत पोहचणे शक्य होणार आहे. सध्या असलेल्या बँकांमधून महिलांचे कर्ज घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे; महिला बँकेमुळे महिला कर्ज घेण्यास पुढे येतील. महिलांना १ कोटी पर्यंतच कर्ज कोणतेही तारण नसताना दिले जाईल. भविष्यात भोपाळ, इंदोर, उज्जैन, सुरत, विजयवाडा, जमशेटपूर, नागपूर, येथेही शाखा उघडल्या जातील. या बँकेत एक मोबाईल ॲप सुरू करण्याची देखील योजना आहे.

महिला कोणत्याही व्यवसाय सचोटीने व चिकाटीने करतात. त्यामुळे महिलांना वेगवेगळ्या उद्योगासाठी उदा. गृहउद्योग, दवाखाना, ब्युटी पार्लर, डे-केअर सेंटर, केंटरिंग उद्योग, घर दुरूस्ती, मुलामुलींचे शिक्षण, दुग्धव्यवसाय, ऑईल मिल इ. व्यवसायासाठी कर्ज दिले जाईल, महिला घेतलेले कर्ज, मुद्दल व व्याजासह नियमितपणे परत फेड करतील अशी अपेक्षा आहे. तसेच त्यांना ठेवीवर पण इतर बँका पेक्षा अर्धा टक्का व्याजदर जास्त देण्यात येईल. बचतखात्यातील ठेवीवर ५% व्याजदर देण्यात येईल असे निश्चित करण्यात आले. त्यामुळे ठेवीचे प्रमाण वाढण्यास मदत होईल. मुंबईत

शाखा सुरू झाल्याबरोबर पहिल्या आठवड्यात १,१०० महिलांनी खाते उघडण्यासाठी अर्ज केलेले होते. म्हणजेच याचा अर्थ असा की, महिलांना या बँकेविषयी आपलेपणा आहे. मार्च २०१४ अखेर देशात २५ शाखा सुरू करण्याचा निर्धार सरकारने व्यक्त केलेला आहे. त्यापैकी महाराष्ट्रात पुणे, अहमदनगर व मुंबईतील वांद्रे कुर्ला संकुल येथे शाखा सुरू करण्यात येतील. या बँकेकडून स्वयंसहाय्यता बचत गट, छोटे उद्योजक आणि नोकरदार महिलांना कर्ज दिले जाईल. तसेच अनेक सेवाभावी/ स्वयंसेवी संस्थांमार्फत खेडेगावातील महिलांपर्यंत बँकीग सेवा पोहचविण्यात येईल; त्यासाठी मोबाईल व्हॅन कार्यान्वित करण्यात येईल. महिलांना आर्थिक व्यवहार आत्मविश्वासाने करता यावेत व नि:संकोचपणे बँकेत येता यावे यासाठी या बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे. बँकेमधील कर्मचारी व अधिकारी वर्ग हे संबंधित भागात जी भाषा बोलली जाते त्याच भाषेत आर्थिक व्यवहार करणारे नेमले जातील. तसेच इ-बँकींग, कोअर बँकींगद्वारे बँकींग सेवा ऑनलाईन देखील करण्यात येईल.

## महिला बँकेची भविष्यातील वाटचाल:

भारतीय महिला बँकेच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालक उषा आनंत सुब्रमण्णम् आणि लॅक्मे लीव्हरचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुष्कराज शेनाई यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात एका करारावर सह्या केलेल्या आहेत. त्यामुळे महिला बँकेने महिला मार्फत चालवल्या जाणाऱ्या लॅक्मे सलूनला अर्थसाहाय्य केले जाणार आहे. हिंदुस्थान युनीलिव्हरच्या समुहातील लॅक्मे लीव्हरमार्फत देशभरातील ५० शहरामध्ये २३० लॅक्मे सलून चालवली जातात. महिला बँकेने मार्च २०१५ पर्यंत ८० शाखा उघडण्याचा मानस आहे. त्यापैकी २० शाखा ग्रामीण भागात असतील. तसेच ८०० कोटी रूपयापर्यंत कर्ज तर १००० कोटी रूपयापर्यंतच्या ठेवींचे लक्ष ठेवलेले आहे. या शाखांमार्फत बँकेच्या विविध योजना व उत्पादने याबाबत ग्राहक खातेदारांना माहिती देऊन अशा उत्पादनांची विक्री करू शकणाऱ्या प्रतिनिधींची लवकरच नियुक्ती करण्यात येणार आहे. समाजातील दुर्बल गटातल्या महिलांना अल्प व्याज दराने कर्ज देऊन त्यांना स्वावलंबी बनविणे हा या बँकेचा प्रमुख उद्देश आहे. अशिक्षित व खेड्यातील महिलांना खाते उघडण्यासाठी व कर्ज मिळविण्यासाठी साहाय्य करण्यात येईल. बँकेत पैसे जमा करण्यासाठीही मदत करण्यात येईल. सारे काम विना विलंब केले जाईल. आर्थिक विषयाबाबत महिलांना सल्ला देण्यात येईल. आर्थिक व्यवहाराविषयी महिलांना प्रशिक्षण देणारा अभ्यासक्रमसुध्दा ही बँक राबवणार आहे. २०२० पर्यंत या बँकेच्या ७७० शाखा स्थापन केल्या जातील. तसेच पुढील सात वर्षात साठ हजार कोटीची उलाढाल (ठेवी व कर्ज) करण्यात येईल असे महत्त्वाकांक्षी लक्ष्य या बँकेने ठेवलेले आहे.

थोडक्यात महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी व सक्षमीकरणासाठी ही बँक सर्व प्रकारचे सहाय्य व मार्गदर्शन करेल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे.

## मूल्यमापन:

महिला बँक स्थापन होऊन एक वर्ष देखील पूर्ण झालेले नाही. तोपर्यंत या बँकेचे

मूल्यमापन करणे योग्य होणार नाही; तरी पण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ही बँक निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. तसेच यामुळे महिलांचा बँकींग क्षेत्रातील हिस्सा वाढण्यास मदत होणार आहे. महिलांना कर्ज सहज व सुलभ मिळेल. महिला कर्ज घेवून विविध उद्योग सुरू करू शकतील. त्यामुळे दारिद्र्य, बेकारी कमी होण्यास मदत होईल. महिलांना बँकेमध्ये नोकरीपण सहजा सहजी मिळू शकेल, ग्रामीण भागातील महिलांना बँकींग सेवाचा लाभ घेता येईल इ. गुण/फायदे या बँकेचे आपणास सांगता येतील. असे असले तरी महिला बँकेच्या यशस्वितेसाठी अनेक समस्या पण निर्माण होतील. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. बँकेची सुरक्षितता सांभाळणे अवघड होईल. कारण अलिकडे दिवसाढवळ्या बँका, ए.टी.एम. लुटण्याचे प्रकार सुरू आहेत. महिलासाठी स्वतंत्र बँक काढण्याची आवश्यकताच नाही. कारण आजही भारतीय महिला आपले आर्थिक निर्णय स्वत: घेत नाहीत तर; ते कुटुंबातील पुरूष मंडळीच्या सहकार्याने घेतात आपले वडील, पती किंवा मुलगा यांच्या नावानेच ठेवी ठेवतात किंवा कर्ज घेतात. स्वत: कर्ज काढून उद्योगधंदा करणाऱ्या महिलांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. ग्रामीण भागात महिला बँकेच्या शाखा काढल्या तरी त्यात ठेवी जमा होणे कठीण आहे. कारण ग्रामीण भागातील लोकांकडे आपल्या उदरनिर्वाहाएवढाच पैसा असतो. बँकेमध्ये ठेवण्यासाठी त्यांच्या कडे जादा शिल्लक पैसा नसतो. तसेच बँकेला त्या भागातील भाषा अवगत असणारा तज्ज्ञ व प्रशिक्षित कर्मचारी मिळणे अवघड होणार आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात जाऊन काम करण्याची प्रवृत्तीपण कर्मचाऱ्यांमध्ये नसते. आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या जगात महिला बँकेला आपले स्थान निर्माण करण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागणार आहे. एकंदरीत अशा जरी शंका उपस्थित केल्या तरी भारतातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी या बँकेचे कार्य महत्त्वाचे आहे.

संदर्भ सूची:

१) दै.लोकमत, ७ जून, २३ नोव्हेंबर, ५,२५,२६ डिसेंबर २०१३. पुण्यनगरी ११, १३ , १७ जानेवारी २०१५.

२) संकेतस्थळ, गुगल, महिला बँक

३) दूरदर्शन बातम्या.

# भारतीय अन्न सुरक्षा विधेयक

**भोरे निकिता निलेश, सांगली,**
जी.ए. कॉलेज ऑफ कॉमर्स.
भ्रमणध्वनी: ८२७५३७६९९७
ई-मेल: nikitabhore@gmail.com

देशातील नागरिकांना दैनंदिन जीवन जगण्यासाठी आणि आपली कार्ये करण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, आरोग्य, शिक्षण या सुविधा अत्यावश्यक असतात यांना सामाजिक सुविधा म्हटले जाते. या सुविधा जिथे उपलब्ध असतात तो देश प्रदेश प्रगत मानला जातो. अशा सुविधा मिळत असल्या तर नागरिकांची व पर्यायाने देशाची कार्यक्षमता वाढते. कोणत्याही विकसित राष्ट्राने या सुविधा समावेशक पध्दतीने सर्वांना उपलब्ध करुन द्याव्यात असे मानले जाते जर कायदा करुन शासनाने या सुविधा हमीने व माफक किंमतींना पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन दिल्या तर त्याला सामाजिक सुरक्षा असे म्हटले जाते. जस जसा समाज अधिक संघटित पध्दतीने आर्थिक राजकीय जीवन जगू लागतो तस तशी सामाजिक सुविधांची उपलब्धता व्यक्ती किंवा कुटुंबाच्या क्षमतेवर अवलंबून न ठेवता शासनाने ती जबाबदारी स्वीकारावी अशी अपेक्षा असते. अशा सामाजिक सुरक्षेत अन्न सुरक्षा ही सर्वात महत्त्वाची असते. भारत सरकारने २०१३ मध्ये अन्न सुरक्षा विधेयक सम्मंत करुन कल्याणकारी राज्याच्या निर्मितीच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या योजनेच्या अंतर्गत देशाच्या सुमारे दोन तृतीयांश जनतेला म्हणजे सुमारे ८० कोटी लोकांना महिन्याला ३३ किलो धान्य मिळेल. त्यात २ रु. प्रतिकिलो तांदूळ, गहू २ रु. किलो व भरड धान्य १ रु. किलो ने मिळेल अशी तरतूद केली आहे. किंमतीमधील ही अनुदाने देण्यासाठी केंद्र सरकारला वार्षिक ९ लाख ३० हजार कोटी इतका खर्च येईल असा अंदाज आहे.

देश म्हणजे केवळ देशातील भूप्रदेश, नद्या, पर्वत, इमारती, चिलखती लष्कर, डोंगरदऱ्या नसून या सर्वांबरोबर सक्षम, सुदृढ, आरोग्यसंपन्न आणि बौध्दिकदृष्ट्या हुशार व कल्पक जनता असते. लोकांच्या आरोग्याचे नाणे खणखणीत असण्यासाठी मन आणि शरीर या दोन गोष्टी ठणठणीत असायला

हव्यात. *द वे टू द मॅन्स हार्ट इस थ्रु हिज स्टमक* हृदयाकडे जाण्याचा मार्ग उदरातून सुरु होतो. यासाठी पोटात भूक, ताटात अन्न आणि मनात भाव यातून परब्रम्हाच्या उपासनेचा उत्सव घरोघरी साजरा व्हावा. जसे घराच्या उंबरठ्यावर प्रकाश असेल तरच मनही प्रकाशाने भरुन जाते. तसे चौरस आणि पुरेशा आहारानेच मानवाच्या भविष्यकालीन प्रकाशाची पाऊले पुढे पुढे पडू लागतात याची जाणीव व भान राज्यकर्त्यांना आली असल्यामुळे जागतिक अन्न समस्येच्या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यासाठी जागतिक पातळीवर अन्न सुरक्षेबाबत गंभीरपणे चर्चा करण्यात येत आहे व त्यावर उपाययोजना करण्यास सुरुवात झाली आहे.

या पार्श्वभूमीवर अन्न सुरक्षितता म्हणजे काय? अन्न व्यवस्थापन म्हणजे काय? अन्न राखीव साठा म्हणजे काय? अन्नसुरक्षितते संदर्भातील शासकीय धोरण काय? इ. अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. या सर्व प्रश्नांचे थोडक्यात निवारण करण्याच्या उद्देशाने दुय्यम साधन सामग्रीच्या आधारे या सर्व घटकांचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकाने केलेला आहे.

**अन्न सुरक्षेची संकल्पना :ह्ल**

अन्नसुरक्षा म्हणजे लोकांना अन्नधान्याचा पुरेसा संख्यात्मक पुरवठा उपलब्ध होण्याबरोबरच गुणात्मकदृष्ट्या सकस व पौष्टीक आहार वेळेवर उपलब्ध होईल याची हमी मिळणे होय.

Food & Agricultural Organization (1983) *Ensuring that all people at all time have both physical & economic accesses to basic food they need.*

World Development Report (1986) - Access by all people at all times to enough food for an active healthy life.

**अन्न सुरक्षितता अर्थ व व्याख्या:ह्ल**

सोप्या शब्दात सर्व लोकांना पुरेशा प्रमाणात गरज असेल त्यावेळी आणि परवडणाऱ्या किंमतीला योग्य अन्न मिळणे यालाच अन्न सुरक्षितता असे म्हणतात.

अन्न आणि शेती संघटनेच्या मतानुसार सर्व लोकांनी सर्व वेळी भौतिक स्वरुपात त्यांच्या गरजेइतके अन्न खरेदी करण्याची शक्ती त्यांच्यात खात्रीने निर्माण करणे म्हणजे अन्न सुरक्षा होय.

जागतिक विकास अहवालानुसार (१९८६) कार्यशील व आरोग्यदायी जीवनासाठी सर्व लोकांना सर्व वेळी पुरेसे अन्न उपलब्ध असणे अन्न सुरक्षितता होय.

**भारतातील अन्नसुरक्षिततेचे वास्तव:ह्ल**

१) विश्व भूकबळी निर्देशांक २००६ नुसार एकूण ११९ देशांच्या अभ्यासात भारताचा ९३ वा क्रमांक लागतो. दक्षिण आशियात भारताच्या खाली फक्त बांगला देश आहे.
२) World Food Programme नुसार जगातील ५०% उपाशी लोक भारतात आहेत.
३) भारतात ३५% लोकसंख्या अन्न असुरक्षित आहे.
४) भारतात १५ ते ४९ वर्ष वयोगटातील १० गर्भवती स्त्रियात ३ स्त्रिया कुपोषित किंवा रक्ताची कमी असलेल्या असतात.
५) ५ वर्षापेक्षा कमी वयाची ५०% मुले अल्प पोषित आहेत.
६) National Family Health Survey II नुसार २००५-०६ या काळात अल्पपोषित

मुलांची संख्या ८२.८%, रक्तक्षिणतेने प्रभावित मुले ७०% आहे. याचा अर्थ भारतात ४ मुलात ३ मुले हे रक्तक्षिणतेचे शिकार आहेत तर ३ पैकी मुलांचा विकास खुंटलेला आहे. ही आकडेवारी निश्चितच अन्न सुरक्षेसाठी सर्व स्तरातून गांभीर्याने विचार करायला लावणारी आहे. याबाबतीत सरकारने आतापर्यंत अनेक योजना राबविल्या आहेत.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याची गरज:ह्न**

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने देशातील अन्नधान्य उत्पादनाची प्रसिध्दी केलेली आकडेवारी विचारात घेता देशात अन्नधान्याचा तुटवडा नाही. अन्नधान्याची गोदामे भरलेली आहेत असे चित्र एकीकडे तर दुसरीकडे देशातील १५० जिल्ह्यांमध्ये अन्न द्या असा आक्रोश करुन अन्नासाठी दाही दिशा फिरणाऱ्यांची संख्या वाढते असे चित्र आहे. अशा वेळी देशातील सरकारची नैतिक जबाबदारी आहे की, देशातील प्रत्येक नागरिकाला जिवंत राहण्यासाठी त्यांना अन्नधान्य पुरवठा करणेसाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.

जागतिक विकास अहवाल २०१० नुसार जगातील विविध देशामध्ये अन्नधान्य उत्पादनात घट होत असून भूकग्रस्त लोकांची संख्या वाढत आहे. त्याचप्रमाणे अन्नधान्याच्या किंमती वाढत असल्यामुळे अनेक लोकांना अन्नधान्याची खरेदी करता येत नाही. जागतिक भूक निर्देशांकामध्ये ६७ वा क्रमांक आहे. भूक निर्देशंकाच्या निकषानुसार भारताची भूकग्रस्तता अधिक आहे हे निश्चित.

जागतिक मानवी हक्क विषयक जाहीरनामा कलम ११ अन्न व कृषी संघटना अहवाल १९८३ जागतिक विकास अहवाल १९८६ पहिली जागतिक अन्न सुरक्षा परिषद १९७४ आणि जागतिक अन्न सुरक्षा परिषद २००९ नुसार प्रत्येक भूकग्रस्तांना भूकेपासून मुक्त होण्याचा मुलभूत अधिकार आहे. सन २०१५ पर्यंत जगाला भुकेपासून मुक्त करण्यासाठी जगातील प्रत्येक देशाने राज्य घटनेमध्ये घटनात्मक दुरुस्ती करुन अन्न सुरक्षा कायदा संमत करावा असा निर्णय जागतिक अन्न सुरक्षा परिषदेत घेण्यात आला.

**राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा २०१३:ह्न**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा, २०१३ (अन्नसुरक्षा अधिकार) १२ सप्टेंबर २०१३ रोजी संमत करण्यात आला. देशभरात विविध भागांमध्ये असलेली परिस्थिती लक्षात घेवून सध्या असलेली असुरक्षितता व तफावत दूर करणे हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. या कायद्यामुळे कल्याणकारी दृष्टिकोन ही संकल्पना बदलून अधिकार प्रदान करण्यात येणार आहे. १०२ कोटी लोकसंख्येपैकी दोन तृतीयांश लोकांना अन्नधान्य स्वस्त दराने उपलब्ध करुन देणे, हे प्रमुख उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यातील तरतूदींनुसार प्रत्येक पात्र लाभार्थ्याला ५ किलोंपर्यंत पुढील अन्नधान्य मिळणार आहे. तांदूळ ३ रु.प्रतिकिलो, गहू २ रु. प्रतिकिलो आणि इतर अन्नधान्य १ रु.प्रतिकिलो दराने मिळणार आहे. तसेच गर्भवती महिला, स्तनदा माता आणि बालके (निश्चित प्रमाणात) यांना दररोज मोफत जेवण असेल.

अन्नसुरक्षा विधेयकावर संसदेत बरीच खडाजंगी झाली. डिसेंबर २०१२ मध्ये संसदेसमोर सादर करण्यात आलेले हे विधेयक ऑगस्ट २०१३ मध्ये संमत झाले. त्यापूर्वी ५ जुलै रोजी राष्ट्रपतींनी यासंबंधीचा अध्यादेश काढला होता. (राष्ट्रीय अन्नसुरक्षा अध्यादेश २०१३) लोकसभा

समितीच्या २७ व्या अहवालात राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याचा प्रमुख उद्देश नमूद केला आहे तो असा *अन्नसुरक्षा म्हणजे देशांतर्गत अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेशी उपलब्धता असणे, तसेच वैयक्तिक पातळीवर पुरेशा प्रमाणात व माफक किंमतीत अन्नधान्य मिळणे.* तसेच *प्रस्तावित कायद्यानंतर अन्नसुरक्षा हा मुद्दा कल्याणकारी पातळीवर न राहता तो अधिकार आहे तसेच दोन तृतीयांश* जनता सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत माफक दरात अन्नधान्य प्राप्त करु शकेल.

गुलाटी यांनी अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करणे हे मोठे आव्हान आहे असे नमूद केले आहे. अर्थव्यवस्थेतील वाढते तुटीचे प्रमाण देशाच्या कृषीवर मोठा परिणाम करणार आहे. तर ठराविक अटींवर रोख निधी हस्तांतरण आणि दुर्गम भागात अन्नधान्य पुरवठा करणे यावर या कायद्याचे यश अवलंबून आहे. सध्या असलेल्या तुटीच्या अर्थव्यवस्थेवर यामुळे आणखी बोजा वाढणार आहे. तर प्रामुख्याने सार्वजनिक व्यवस्थेकडे पुरेशा प्रमाणात अन्नधान्याची उपलब्धता यावर याचे यश अवलंबून आहे.

**राष्ट्रीय अन्नसुरक्षा विधेयकातील तरतूदी :ह्न**

१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधयेकामध्ये अन्न सुरक्षेची अंमलबजावणी करताना पहिल्या वर्षी देशातील एकूण लोकसंख्येपैकी अधिक दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण असलेला ११४ जिल्ह्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा लागू होईल.

२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकामध्ये एकूण लोकसंख्येचे दोन गट तयार केले. १) प्राधान्य गटातील कुटुंब, २) साधारण गटातील कुटुंब.

३) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकामध्ये अन्नसुरक्षेची अंमलबजावणी करताना पहिल्या वर्षी देशातील ग्रामीण व शहरी भागातील उच्च उत्पन्न गटातील लोकांना वगळण्यात येईल.

४) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकातील तरतूदींनुसार ग्रामीण भागातील एकूण कुटुंबापैकी ५०% कुटुंब आणि शहरी भागातील कुटुंबापैकी ५०% कुटुंब राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याचे लाभधारक होणार आहेत.

५) राष्ट्रीय सल्लागार समितीने नेमलेल्या तेंडूलकर समितीचे निकष लक्षात घेवून प्राधान्य गटातील कुटुंब निश्चित करताना ग्रामीण भागातील एकूण कुटुंबापैकी ४६% ग्रामीण कुटुंब आणि शहरी भागातील एकूण कुटुंबापैकी २८% शहरी कुटुंब प्राधान्य गटासाठी निश्चित करताना ग्रामीण भागातील एकूण कुटुंबापैकी ४४%, ग्रामीण कुटुंब आणि शहरी भागातील एकूण कुटुंबापैकी २२% शहरी कुटुंब साधारण गटासाठी निश्चित केले.

६) राष्ट्रीय सल्लागार समितीच्या मते प्राधान्य गटातील शहरी आणि ग्रामीण कुटुंबाला दरमहा ८५ किलो अन्नधान्य (१ रु.किलो ज्वारी, २ रु. किलो गहू आणि ३ रु. किलो तांदूळ) पुरवठा केला जाईल. त्याचप्रमाणे साधारण गटातील शहरी आणि ग्रामीण कुटुंबांना दरमहा २० किलो अन्नधान्य किमान आधार किंमतीच्या ५०% अधिक किंमतीला पुरवठा करण्याची व्यवस्था केली जाईल.

७) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेबद्दल विकेंद्रित धान्य वसूली, विकेंद्रित धान्यसाठा, स्वयं सहाय्यता गटाचा वापर सर्वाजनिक वितरण व्यवस्थेतील खासगी दुकानदारांचे प्रश्न कमी करणे, पंचायत राज्यव्यवस्थेचा वापर करणे, सहकारी संस्थांचा वापर करणे, संगणकीकरण वापरणे, उघड लेखाजोखा करणे, स्मार्टकार्ड वापरणे, बायोमॅट्रीक तंत्राचा वापर करणे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेपर्यंत धान्य पोहचवणे, त्यांचे कमिशन देणे इ. योजना अन्न सुरक्षा देताना राबविणेसाठी गरज प्रतिपादन केली आहे.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यासाठी धोरण :ह्न**

केंद्र सरकारने २०११-१२ चे अंदाज पत्रकामध्ये देशातील शेतीची उत्पादकता आणि विकासाची महत्त्वाची धोरणे आणि योजना कार्यक्रम खालीलप्रमाणे राबवण्याचे ठरलेले आहे.

१) अत्यल्प, अल्प व लहान शेतकऱ्यांना सरळ कर्जाचे वितरण करणे.

२) सर्व शेतकऱ्यांना ४% व्याजदराने कर्जपुरवठा करणे.

३) पूर्ण भागातील राज्यात शेती उत्पादनात वाढ करणे.

४) शेती उत्पादनाला योग्य व किफायतशीर भाव देणे.

५) अन्नधान्य सुरक्षिततेसाठी शेतकऱ्यांची इच्छाशक्ती व उत्साह टिकवून ठेवणाऱ्या विविध योजना राबविणे.

६) शेती हे देशातील ७०% लोकसंख्येचे उपजीविकेचे साधन म्हणून शेती विकास धोरणाला अग्रक्रम देणे.

७) अन्नधान्य उत्पादन धोरणाबरोबर अन्नधान्य साठवणूक सुविधा वाढविणे.

८) अन्नधान्य उत्पादनासाठी येणाऱ्या उत्पादन खर्चात कपात करणे. त्यासाठी उच्च अद्ययावत व प्रगत ज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करणे त्यासाठी उच्च अद्ययावत व प्रगत ज्ञान तंत्रज्ञानाचा वापर करणे.

९) शेतकऱ्यांना शेती विकासासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांवर सबसिडी देणे.

१०) शेती शिक्षण व प्रशिक्षण, ज्ञान व तंत्रज्ञान विकास व संशोधन इ. वर विशेष भर देणे व कृती कार्यक्रम.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकावरील आक्षेप:ह्न**

१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा विधेयकानुसार केंद्र सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे व्यवस्थापन करणार असल्यामुळे राज्य सरकारला ते अडचणीचे होणार आहे.

२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकानुसार अन्न सुरक्षेबाबत राज्यापेक्षा केंद्रसरकारचे अधिकार वाढणार आहेत.

३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा विधेयकानुसार केंद्राचा अन्न सुरक्षा आयोग आणि राज्यांना राज्य अन्न सुरक्षा आयोग स्थापन करावा लागणार आहे. मानवी हक्क आयोग आणि अनुसूचित जाती जमाती आयोग याचा अनुभव विचारात घेता केंद्र आणि राज्यातील प्रश्न सुटण्याऐवजी अधिक क्लिष्ट व गुंतागुंतीचे झाले आहेत. हे सत्य विचारात घेता केंद्र आणि राज्य पातळीवरील स्वतंत्र दोन आयोगामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न सुटेल याबद्दल खात्री देता येत नाही.

४) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार यांना अधिक पैसा खर्च करावा लागेल. त्यामुळे दोन्ही सरकारच्या तिजोरीवर ताण पडेल आणि दोन्ही सरकारला विकास योजनेसाठी निधीची कमतरता निर्माण होण्याची शक्यता आहे.

५) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकानुसार सरकार गरीबांसाठी अन्नधान्य मुक्त करणार आहे. अर्थशास्त्रीय दृष्टया हा निर्णय योग्य आहे का? राजकीय अर्थशास्त्राचा निर्णय म्हणून आणि संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून निर्णय योग्य असला तरी युपीए सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयक मांडण्यासाठी घाई केलेली आहे असे म्हणावे लागेल.

६) सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकाची अंमलबजावणी केली तर सरकार जवळजवळ मोफत दराने अन्नपुरवठा करणार आहे. त्याचा परिणाम बाजारपेठेवर होणार आहे. एकदा का बाजारपेठ कोलमडली की अर्थव्यवस्था कोलमडायला वेळ लागत नाही. सरकारला बाजारपेठेत समतोल राखता आला पाहिजे. अर्थव्यवस्था कोसळणार नाही आणि गरीबांना अन्नधान्य पुरवठा करता येईल याचा सुवर्णमध्ये सरकारला साधता आलेला नाही.

७) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकात सरकारने अन्न सुरक्षिततेचीहमी दिलेली असेल असे वाटत असले तरी राष्ट्रीय सल्लागार समितीने विधेयक तयार करताना दारिद्र्य रेषा हा निकष वगळला. पूर्वी सरकारने गरीबी हटाव योजना जाहीर केली होती. आजपर्यंत तरी गरीबी हटली नाही. उलट विकासाचे कायदे मिळण्याऱ्या गरीबांना हटविण्यात आले. तोच अनुभव यात येणार आहे का?

८) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकाची अंमलबजावणी करताना अन्नधान्याचे वितरण पारदर्शी व कार्यक्षम करण्याचे आव्हान आहे. त्याबरोबर लोकांची क्रयशक्ती वाढविण्याचे आव्हान आहे. ही दोन्ही आव्हाने सरकार पेलू शकेल की नाही? याबाबत शंका वाटते.

९) अन्नधान्याचे साठे सडत राहण्यापेक्षा अन्नधान्याचे वाटप करणे आवश्यक असताना सरकार याकडे लक्षपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.

१०) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकामध्ये साठवणूक करताना नासाडी होणाऱ्या धान्यांची बचत करण्याची योजना नाही.

११) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकानुसार अन्नधान्य किंमती संबंधीचा अधिकार सरकारने राखून ठेवला आहे. त्याचप्रमाणे प्राधान्य गट आणि साधारण गटाला स्थिर किंतीला अन्नधान्य पुरवठा करण्याची कोणतीही ठोस हमी सरकारने दिलेली नाही.

१२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकामध्ये वास्तव दारिद्र्याचे प्रमाण लक्षात न घेतल्यामुळे गरजू लोकांना अन्नधान्याची सुरक्षा मिळेल याची हमी देता येत नाही.

**समारोप :ह्न**

भारताच्या बाबतीत अन्न सुरक्षिततेचा विचार करता ती अन्नधान्याची उपलब्धता असूनही पुरेशा खरेदीशक्तीच्या अभावी लोकांना ते खरेदी करता येत नाही. म्हणजे पुरेशी क्रयशक्ती त्यांच्याकडे नाही. त्यामुळे भूकेलेल्यांची संख्या,

कुपोषणग्रस्तांची संख्या जास्त आहे. अन्नधान्य समस्येतील असा विचित्र विरोधाभास निर्माण झाला आहे.

शाश्वत अन्न सुरक्षा प्राप्त करणे हे देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते हे नियोजनाचे उद्दिष्ट असले पाहिजे आणि आपण अद्यापही शाश्वत अन्नसुरक्षितता प्राप्त करण्यात यशस्वी झालेलो नाही. त्यासाठी भावीकाळात भारताला शाश्वत अन्न सुरक्षेसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. जागतिक पातळीवर तापमानवाढीमुळे कृषी व्यवसायावर त्याचा प्रतिकूल परिणाम होवून शेती धोक्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शेती वाचविणे आत्यंतिक गरजेचे आहे. पिकावरील रोगराईचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी पीक पध्दतीचे नियोजन व व्यवस्थापन गरजेचे बनले आहे. उत्पादकता व उत्पादन वाढीच्या दृष्टीने अत्याधुनिक तंत्र व यंत्रांचा वापर गरजेचे आहे.

देशातील लोकांना अन्न सुरक्षेततेची हमी देण्यासाठी सरकारने कृषीक्षेत्राची योग्य व्यूहरचना करणे, हस्तक्षेपी धोरणांचा वापर करणे, सर्वसमावेशक वृध्दी धोरण राबविणे, पूरक अन्न घटक उत्पादनात वाढ करणे, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, शिक्षण प्रशिक्षण आणि संशोधन इत्यादी घटकांचा कृषी क्षेत्राच्या विकासासाठी वापर करुन भूमीपुत्रापर्यंत सर्व बाबी पोहचविणे आवश्यक आहे तेव्हाच अन्नधान्य सुरक्षिततेची हमी देता येईल. तसेच भूकेलेल्या प्रत्येक व्यक्तीस पुरेसे दर्जेदार अन्न मिळवून देणे व देशातील प्रत्येक नागरिकांना अन्नाची सुरक्षा मिळवून देणे हे भारत सरकारचा अन्न सुरक्षा विधेयकाचे उद्दिष्ट असून सातत्यपूर्ण अन्नसुरक्षा मिळविण्यासाठी कृषी क्षेत्रासमोरील आव्हानांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

**संदर्भ सूची:**


१) जे. एफ. पाटील, *अन्नसुरक्षा संकल्पना, व्यवस्था व आव्हाने,* दै. सकाळ दि. १३ नोव्हेंबर २०११.

२) एम. एस. स्वामीनाथन, *देशाची अन्नसुरक्षा मजबूत व्हावी,* दै. लोकमत दि. २३ मार्च २०११.

३) *योजना मासिक,* जानेवारी-२०११.

४) *योजना मासिक,* डिसेंबर-२०१३.

५) *भारत सरकार आर्थिक पाहणी अहवाल २०१०-११.*

६) *महाराष्ट्र सरकार आर्थिक पाहणी अहवाल २०१०-११.*

७) *केंद्र सरकार / महाराष्ट्र सरकार,* वेबसाईट.

# ग्रामविकासात परंपरागत उद्योगांची भूमिका

## डहाणू तालुक्यातील *डायमेकिंग* उद्योगाचा अभ्यास


**दिपक डी. शेलार, चिंचणी,**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

पी.एल. श्रॉफ महाविद्यालय,

ता. डहाणू, जि. पालघर.

ई-मेल: deepakdshelar@gmail.com

भ्रमणध्वनी-९८९००७९०४


भारत देश हा जवळजवळ ४ लाख खेड्यांचा देश आहे. देशाचा सर्वांगिण विकास हा खेड्यांच्या व ग्रामीण क्षेत्राच्या विकासावरच अवलंबून आहे. ग्रामीण क्षेत्राचे हे महत्व लक्षात घेऊनच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी *चलो गाव की ओर* असा संदेश देशाला दिला होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरकार आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या योजना राबवित आहे, पण अजूनही ग्रामीण क्षेत्राचा फारसा विकास झालेला दिसून येत नाही. ग्रामीण भागात वेगवेगळ्या सामाजिक आर्थिक समस्या ग्रामीण क्षेत्राला भेडसावत आहेत. ग्रामीण क्षेत्राचा खरा विकास करावयाचा असेल स्थानिक भागातील साधनसंपत्ती व परंपरागत उद्योगांचे जतन करणे व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. डहाणू तालुक्यातील चिंचणी गाव हे महाराष्ट्राच्या नकाशावरील पालघर जिल्ह्यातील एक छोटेसे गाव असून या गावामध्ये *डायमेकिंग* उद्योगाचा ब्रिटीशपूर्व काळात उदय झाला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये *डायमेकिंग* व्यवसायाचा सूक्ष्म अभ्यास करून या उद्योगाच्या समस्यांची माहिती घेतली आहे. तसेच या समस्या सोडविण्यासाठी काही उपाय सुचविले आहेत.

ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन १ ऑगस्ट २०१४ रोजी पालघर जिल्हा उदयास आला. डहाणू तालुका हा पालघर जिल्ह्यातील एक महत्वपूर्ण तालुका आहे. पालघर जिल्ह्याच्या पश्चिम उत्तर दिशेला अरबी समुद्र किनाऱ्यावर डहाणू हा आदिवासी तालुका वसलेला आहे. डहाणू तालुक्याच्या उत्तर दिशेला तलासरी तालुका आणि गुजरात राज्य, पश्मिला अरबी समुद्र आणि पूर्वेला जव्हार तालुका आहे. डहाणू तालुक्यात दारिद्र्याचे प्रमाण ९७.७० टक्के इतके प्रचंड असल्यामुळे

डहाणू तालुक्यातील आदिवासी परिसरात अंधश्रद्धा, अशिक्षितपणा, अनारोग्य आणि कुपोषण इ. समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

डहाणू तालुक्याच्या पश्चिमेकडील विभागाला *किनारपट्टी विभाग* असे संबोधले जाते. समुद्र किनाऱ्यालगतच्या या विभागात मांगेला, वाडवळ, कुणीबी, पांचाळ व भंडारी समाजाचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य दिसून येते. डहाणू परिसरात माच्छी, बारी, वंजारी, कुंभार, नवबौद्ध, वाणी, कंसारा, भरवाड, मुस्लिम, उत्तर भारतीय अशा विविध समाजांची कमी अधिक प्रमाणात लोकवस्ती दिसून येते.

डहाणू तालुक्याच्या पूर्वेकडील विभागात व सह्याद्री पर्वताच्या डोंगराळ भागात वसलेल्या लोकवस्तीच्या भागाला *जंगलपट्टी विभाग* असे संबोधले जाते. डोंगराळ परिसरात आदिवासी समाजाचा वारली, कातकरी, मल्हार, कोळी, महादेव कोळी, धोडी, दुबळा, कोकणी अशा विविध पोटजाती दिसून येतात. डहाणू तालुक्यातील 'किनारपट्टी विभाग' व 'जंगलपट्टी विभाग' हे तालुक्यातील परस्पर विरोधी आर्थिक विकासाची स्थिती म्हणजेच 'आर्थिक द्वैतावस्था' दर्शवितात. जंगलपट्टीमध्ये आदिम व परंपरागत पद्धतीने कार्य करणारी मुल्य व्यवस्था तर दुसरीकडे किनारपट्टी भागातील आधुनिक व परिवर्तनीय मुल्यव्यवस्था डहाणू तालुक्यात पाहावयास मिळते. दोन्ही भागातील लोकवस्तीचे आचारधर्म भिन्न स्वरूपाचे आहेत असे विषम वास्तव हे डहाणू तालुक्याचे वेगळेपण आहे.

**डहाणू तालुक्यातील डायमेकिंग व्यवसाय:**

भारतातील सोन्याचे दागदागिने, रत्न आणि आभुषण व्यवसायाचा आधारस्तंभ म्हणजे चिंचणी येथील 'डायमेकिंग' व्यवसाय होय. ब्रिटीशांच्या काळात हा व्यवसाय डहाणू तालुक्यात सुरू करण्यात आला. चिंचणी येथिल रहिवासी स्व. श्री. पुरूषोत्तम सहामते यांनी या व्यवसायाची मुहुर्तमेढ चिंचणी मध्ये रोवली. प्रारंभी फक्त सहामते कुटंबापुरता हा व्यवसाय केंद्रित होता परंतु कालपरत्वे इतरांनाही या व्यवसायाचे महत्त्व पटले. आज डहाणू तालुक्यातील प्रत्येक घरामध्ये हा व्यवसाय परंपरागतरित्या सुरू असल्याचे दिसते. शेती आणि डायमेकिंग या दोन क्षेत्रावरच डहाणू तालुक्याची अर्थव्यवस्था कार्यरत आहे. शेती हे डहाणू तालुक्याचे उपजिविकेचे मुख्य साधन आहे. डहाणू तालुक्यातील आदिवासी समाजाची लोकसंख्या ६६ टक्के असून आदिवासींचा पारंपरिक व्यवसाय शेती आहे. आदिवासींची शेती ही पारंपरिक स्वरूपाची असल्यामुळे शेतीतून समाधानकारक उत्पादन मिळत नाही.

'डायमेकिंग' व्यवसाय हा या परिसरातील मुख्य आणि पंरपरागत व्यवसाय असून घरोघरी चालणारा व्यवसाय आहे. डहाणू तालुक्याच्या किनारपट्टी भागात चिंचणी, वाढवण, वरोर, धाकटी, डहाणू, बाडापोखरण, आसार, वासगाव अशा अनेक गावात जवळजवळ प्रत्येक घरामध्ये 'डायमेकिंग' उद्योग अस्तित्वात आहे. 'डायमेकिंग' म्हणजेच सोन्याचांदीचे दागिने बनविण्यासाठी लागणारे लोखंडी साचे तयार करणारा व्यसाय होय. डायमेकिंग हा व्यवसाय प्रामुख्याने हाताच्या सहाय्याने व कौशल्याने केला जाणारा व्यवसाय आहे. 'डायमेकिंग' व्यवसाय हा संपूर्ण भारतात

डहाणू तालुक्यात केंद्रित झालेला असून येथून तयार करण्यात येणाऱ्या डाय म्हणजेच दागदागिन्यांच्या लोखंडी साच्यांना खरेदी करण्यासाठी दिल्ली, पंजाब, हरियाणा, आंध्रप्रदेश, मुंबई, कोलकात्ता, चेन्नई या मोठ्या शहरांमधील ग्राहक या भागात येत असतात. पांचाळ समाज हा डहाणू तालुक्यातील लोकवस्तीच्या दृष्टीकोनातून एक महत्त्वपूर्ण समाज असून *डायमेकिंग* हा या समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. *डायमेकिंग* या पारंपारिक कलेचा वारसा या समाजाने जपला असून या व्यवसायाबरोबरच सुतारी काम करणे तसेच लोखंडापासून विविध प्रकारची अवजारे व यंत्राचे लहान मोठे भाग बनविण्याचे कामही पांचाळ समाज करतांना दिसतो. *डायमेकिंगच्या* व्यवसायामुळे डहाणू तालुक्यातील चिंचणी हे गाव संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे.

**समस्या विधान:** *डायमेकिंग* व्यवसायाला लघु उद्योगाचा दर्जा मिळावा अशी मागणी या व्यावसायिकांकडून सातत्याने करण्यात येते. *डायमेकिंग* या व्यवसायाला कुटीरोद्योग किंवा लघु उद्योग म्हणून मान्यता नसल्यामुळे या व्यवसायातील कारागिरांना कोणत्याही प्रकारच्या सवलती मिळत नाहीत किंवा सवलतीच्या दराने कर्जाचा पुरवठा होत नाही. या व्यवसायामुळे देशाला परकीय चलनही मिळत असते. परंतु या व्यवसायाच्या विकासासाठी सरकारकडून पुरेशी मदत या व्यावसायिकांना मिळत नाही. या व्यवसायाला विजेची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. परंतु सतत लोडशेडींगचा त्रास परिसराला होत असतो.

**संशोधनाचे महत्त्व:**

डायमेकिंग व्यवसाय हा डहाणू तालुक्यातील एक प्रमुख व्यवसाय असून देशातील रत्न व आभुषण हा व्यवसाय पुर्णपणे *डायमेकिंग* व्यवसायावर अवलंबून असणारा व्यवसाय आहे. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये रत्न व आभुषणांची निर्यात लक्षणिय आहे.

तक्ता क्र. १ वरून २००९ ते २०१४ दरम्यान रत्न आणि आभुषणांच्या निर्यातीत होणारी वाढ दर्शविली आहे. सन २०१४ मध्ये या व्यवसायामुळे २,४८,४६५ कोटी रू. इतकी मोठ्या प्रमाणात निर्यात करण्यात आली. डहाणू तालुक्याचा आर्थिक विकास आणि देशाच्या निर्यातीमधील या व्यवसायाचे महत्व लक्षात घेऊन संशोधनासाठी *डायमेकिंग* व्यवसायाची निवड केली आहे.

**संशोधनाच्या मर्यादा:**

*डायमेकिंग* व्यवसाय हा डहाणू तालुक्यातील घरोघरी असेलला व्यवसाय आहे. तालुक्याचे व्यापक स्वरूप आणि वेळेचे मर्यादा लक्षात घेऊन सर्वेक्षणासाठी डहाणू तालुक्यातील चिंचणी गावाची निवड केली आहे. चिंचणी गावातील १०० *डायमेकर* कुटुंबांचे सर्वेक्षण

तक्ता क्र. १

रत्न आणि आभुषणांची भारतातून केली जाणारी निर्यात:

| वर्ष | २००९-१० | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|
| निर्यात: कोटी रू. | १,३७,५६८ | २,३६,१६२ | २,४८,४६५ |

*संदर्भ : आर्थिक सर्वेक्षण २०१३-१४*

करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) रोजगार निर्मिती या दृष्टीकोनातून *डायमेकिंग* व्यवसायाचा अभ्यास करणे.

२) डहाणू तालुक्यातील *डायमेकिंग* व्यवसायाचे महत्व विषद करणे.

३) *डायमेकिंग* व्यवसायाच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.

४) *डायमेकिंग* व्यवसायाच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधनाची गृहिते:**

१) *डायमेकिंग* व्यवसाय डहाणू तालुक्याच्या विकासाला मदत करणारा प्रमुख व्यवसाय आहे.

२) *डायमेकिंग* व्यवसाय हा डहाणू तालुक्यातील रोजगार पुरवठा करणारा प्रमुख व्यवसाय आहे.

३) *डायमेकिंग* व्यवसायाला विविध समस्या भेडसावत आहेत.

**संशोधन पद्धती:**

*डायमेकिंग* व्यवसायाची माहिती गोळा करण्यासाठी विविध ग्रंथसंपदा, शासकीय गॅझेटियर, संशोधन संस्थांचे अहवाल, ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे आणि विविध प्रकारचे शासकीय अहवाल यांचा उपयोग केला आहे. संशोधन क्षेत्रातील १०० *डायमेकर* उद्योजकांचे नमुना पद्धतीने सर्वेक्षण केले असून त्याद्वारे प्राथमिक माहिती गोळा केली आहे. माहिती गोळा करण्यासाठी *साधा यादृच्छिक नमुना* पद्धतीचा वापर करण्यात आला. सारणी पद्धतीचा वापर करून मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

**स्वयं-संशोधनातून प्राप्त झालेली माहिती:**

१) नमुना क्षेत्रातील एकूण *डायमेकर* व्यावसायिकांची शैक्षणिक परिस्थिती बाबत पुढील माहिती मिळाली:

५ टक्के अशिक्षित, ७४ % प्राथमिक शिक्षण घेतलेले, १५ टक्के माध्यमिक शिक्षण घेतलेले, ४ % हे उच्च माध्यमिक शिक्षण पुर्ण करणारे आणि फक्त २ % पदवीधर होते.

२) *डायमेकिंग* व्यवसायातील कामगाराची वयोगटानुसार विभागणी केली असता पुढील माहिती मिळाली:

१८ ते २५ वर्ष वयोगट : १२ %, २६ ते ४० वर्ष : ४६%, ४० वर्षावरिल : ४२%

३) या व्यवसायामध्ये किती वर्षापासून आहेत, याबाबत पुढील माहित मिळाली :

परंपरागत व्यवसाय: ८५ %, ५ वर्षापेक्षा जास्त काळ : १२%, पाच वर्षापेक्षा कमी ६ %.

४) या व्यवसायातील कारागिरांना मिळणारे सरासरी मासिक वेतन :

१० हजार : ५६ %, १० ते १५ हजार : २८ %, १६ ते २० हजार १० %, २० हजार पेक्षा जास्त : ०६ %.

५) उद्योग सुरू करण्यासाठी भांडवल उभारणी कशी केली याबाबत पुढील माहिती मिळाली:

बँकेचे कर्ज : १२ %, सावकार : ०५%, स्वतःचे भांडवल : ८३ %

**निष्कर्ष:** वरिल सर्व माहितीच्या आधारे *डायमेकिंग* व्यवसायाविषयी पुढील निष्कर्ष मांडले आहेत.

१) शेती क्षेत्रानंतर *डायमेकिंग* व्यवसाय हा डहाणू तालुक्यातील रोजगार पुरवठा करणारा एक

महत्वाचा व्यवसाय आहे.

२) या व्यवसयातील मोठा वर्ग कमी शिक्षित आहे. म्हणून या उद्योजकांकडे व्यावसायिक दृष्टिकोनाची आणि आधुनिक तंत्रज्ञानाची कमतरता आहे.

३) या व्यवसायाच्या समस्या लक्षात घेऊन आजची तरूण पिढी या परंपरागत व्यवसायाकडे दुर्लक्ष करीत असून इतर क्षेत्राकडे आकर्षित होत आहे.

४) या व्यवसायाला आवश्यक असलेला सर्व कच्चामाल स्थानिक बाजारात उपलब्ध आहे. त्यांचा पुरवठा करणारी अनेक दुकाने गावामध्ये आहे. म्हणजे पुरोगामी रोजगार पुरविण्याचे कार्य डायमेकिंग व्यवसाय करतो.

५) 'डायमेकिंग' व्यवसाय हा वडिलोपार्जित व्यवसाय असून घरातील सदस्यांना परंपरेने ही कला अवगत असते.

६) सर्वेक्षण केलेल्या व्यावसायिकांपैकी ८३ टक्के व्यावसायिकांनी स्वतःचे भांडवल वापरले आहे.

**डायमेकिंग व्यवसायिकांच्या समस्या:**

१) परिसरात 'डायमेकिंग' व्यवसायाविषयी कोणत्याही प्रशिक्षण सुविधा उपलब्ध नाहीत.

२) 'डायमेकिंग' व्यावसायिकांच्या कोणत्याही संघटना अस्तित्वात नाहीत म्हणून या व्यावसायिकांची सौदाशक्ती कमी आहे.

३) लघु उद्योग म्हणून मान्यता नसल्यामुळे सरकार कडून कोणत्याही सोयीसुविधा मिळत नाही.

४) संघटनेचा अभाव असल्यामुळे खरेदीदार कमी किंमत देऊन फसवणूक करतात.

५) ५६ टक्के व्यावसायिकांना महिना रू. १०००० सुद्धा उत्पन्न मिळत नाही. अल्प उत्पन्नामुळे तरूण पिढी या व्यवसायाकडून दूर होत आहे.

६) डहाणू तालुका हा एक आदिवासी तालुका असल्यामुळे या परिसरात दिवसातून ५ ते ६ तास लोडशेडिंग असते. त्यामूळे या व्यावसायिकांचे मोठे नुकसान होते.

७) या उद्योगाला कुटीरोद्योग किंवा लघु उद्योग म्हणून मान्यता नसल्यामुळे बँकेकडून कर्ज मिळण्यात अनेक अडचणी निर्माण होतात.

**डायमेकिंग व्यवसायाच्या विकासासाठी उपाययोजना:**

१) सरकारने या परिसरातील डायमेकिंग व्यावसायिकांची गरज लक्षात घेऊन लोडशेडिंग कमी करावे.

२) 'डायमेकिंग' व्यवसायाला लवकरात लवकर कुटीरोद्योग किंवा लघु उद्योग म्हणून मान्यता मिळावी.

३) या उद्योगातील कारागीर व इतर कामगारांना संघटित क्षेत्राप्रमाणे निवृत्तीवेतन, आरोग्य विमा व इतर सामाजिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

४) डहाणू परिसरात 'डायमेकिंग' व्यवसायाशी संबंधित आधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

५) बँकेकडून सवलतीच्या दरामध्ये कर्ज पुरवठा करण्यात यावा.

**सारांश:**

'डायमेकिंग' व्यवसाय हा डहाणू तालुक्यातील एक परंपरागत व्यवसाय असून रोजगाराच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण व्यवसाय आहे. सरकारने या व्यावसायिकांच्या समस्या दूर केल्यास डहाणू तालुक्याचा व पर्यायाने ग्रामीण क्षेत्राचा विकास साधला जाईल. या व्यवसायात

सर्वच जाती धर्माचे लोक गुंतलेले असल्यामुळे राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे कार्यही हा व्यवसाय करतो. काळाची गरज लक्षात घेऊन वेळीच योग्य पावले उचलली नाहीत तर 'डायमेकिंग' व्यवसायाचा अस्त होण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भ सूची:**


१) आर्थिक सर्वेक्षण, २०१२-१४ ऑक्सफर्ड विद्यापीठ, जुलै २०१४.

२) देशपांडे श्रीधर, मार्च २०१० *'भारतीय अर्थव्यवस्था'* हिमालया पब्लिशिंग हाऊस.

३) ठाणे जिल्हा वार्षिक अहवाल २०१२-१३.

४) *'ठाणे जिल्हा वार्षिक रोजगार अहवाल'* २००६-०७.

५) मिननाथ अंबादास, १९९५, *'निसर्ग आणि निसर्गपुत्र'* ठाणे, शब्दांगण प्रकाशन.

६) शर्मा. के. के., २००४, *'इंटलेक्च्युअल्स संदर्भ महाराष्ट्र'* भोपाळ, इंटेलेक्च्युअल्स बुक ब्युरो प्रकाशन, भाग दोन.


---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यानमाला

ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रतिवर्षी एक नामांकित अर्थशास्त्रज्ञाचे व्याख्यान परिषदेच्या ३४ व्या वार्षिक अधिवेशनापासून अधिवेशन काळात आयोजित केले जाते. परिषदेची स्थापना, जडणघडण व कार्यविस्तार या प्रत्येक पातळीवर प्रा. नी. वि. सोवनी यांचे योगदान अपूर्व आहे. मराठी या प्रादेशिक भाषेतून कार्य करणारे परिषदेला राष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या मानमान्यतेचे मोठे श्रेय प्रा. नी. वि. सोवनी यांनाच द्यायला हवे. व्याख्यानाच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी निधी देणाऱ्या ४० देणगीदारांची नावे अर्थसंवादच्या जुलै-सप्टेंबर २०१० खंड ३४, अंक २ मध्ये पृ.२१०-२११ वर प्रसिध्द झालेली आहेत. तर अर्थसंवादच्या जुलै-सप्टेंबर २०१४ खंड-३८, अंक २ मध्ये पृष्ठ १६३ वर १४ देणगीदारांची नावे प्रसिध्द केली आहेत. त्यानंतर २०१४-१५ या आर्थिक वर्षात सदर उपक्रमासाठी निधी देणाऱ्या देणगीदारांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

प्रा. नी. वि. सोवनी यांच्या स्मृती व्याख्यानासाठी निधी देणाऱ्यांची नावे

| | |
|---|---|
| १. प्रा. चारुदत्त गोखले, जळगाव | रु.५,०००/- |
| २. प्रा.श्रीमती भोगावडे एन. के., पुणे | रु.१,०००/- |

# भारतीय आयुर्विमा महामंडळ: आर्थिक विश्लेषण

विरेंद्र बाळकृष्ण वडेर, इस्पुर्ली,
जय हनुमान हायस्कुल व बा.वि.वडेर ज्युनिअर कॉलेज,
ता. करवीर, जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी: ९९२१०२७५५५, ९४०४९७३६९३

सन १९५६ पासून आयुर्विमा क्षेत्रात एल.आय.सी. ची मक्तेदारी होती. दि. १ सप्टेंबर १९५६ ला भारतीय जीवन विमा प्राधिकरण (एल.आय.सी. ऑफ इंडिया) ची स्थापना झाली. यामध्ये भारतातील सन १८१८ पासून १९५६ पर्यंत कार्यरत असणाऱ्या विमा कंपन्या व प्रॉव्हीडंड फंड कंपन्यांचा समावेश एल.आय.सी. मध्ये करण्यात आला. यामध्ये भारतातील १७० विमा कंपन्यांचा अंतर्भाव होता व १६ विदेशी कंपन्या व ७४ प्रॉव्हीडंट कंपन्यांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले व भारत सरकारच्या नियंत्रणाखाली एल.आय.सी. कार्यरत झाली. सन १९५६ पासून सन १९९९ अखेर आयुर्विमा क्षेत्रात एल.आय.सी. व जीवनविरहित विमा क्षेत्रात चार सरकारी नियंत्रणाखालील जनरल इन्शुरन्स कंपन्या कार्यरत झाल्या.

सन १९९९ मध्ये आय.आर.डी.ए. ॲक्ट १९९९ भारतीय संसदेने पास केला. भारत सरकारच्या १९९१ मध्ये स्विकारलेल्या मुक्त व उदारीकरण धोरणाचा एक भाग म्हणून सन १९९९ पासून आय.आर.डी.ए. ॲक्टमुळे भारतीय विमा उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुला करण्यात आला.

आय.आर.डी.ए. ॲक्ट १९९९ मुळे भारतातील विमा उद्योगामध्ये खाजगी व विदेशी गुंतवणुकीस मुभा मिळाली. यामुळे आयुर्विमा क्षेत्रातील १९५६ पासून असणारी एल.आय.सी. च्या मक्तेदारीस आव्हान प्राप्त झाले. सन २०११ अखेर भारतामध्ये एल.आय.सी.सह २४ आयुर्विमा कंपन्या जीवन विमा विक्री करत आहेत. यामुळे व्यावसायिक स्पर्धा निर्माण झाली. विदेशी कंपन्यांचे आगमनामुळे व खाजगी विमा क्षेत्राच्या स्पर्धेमुळे एल.आय.सी. च्या कार्यपध्दतीत बदल झाला का? ग्राहक सार्वभौम ठरला की ग्राहकांना आकर्षित करणे अत्यावश्यक बनले हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधनामध्ये सन २००० नंतरचा

कालावधी अभ्यासण्यात आला आहे. एल.आय.सी. व खाजगी आयुर्विमा कंपन्यांचा तुलनात्मक अभ्यास करताना ग्राहकांवर खाजगीकरणाचा प्रभाव अधिक झाला की विदेशी कंपन्यांचे आकर्षण अधिक झाले की विश्वासार्हता महत्त्वपूर्ण ठरली याचे अवलोकन आवश्यक आहे. याकरिता सन २००० ते २०१० या कालखंडातील भारतीय विमा उद्योगाचे विश्लेषण करीत असताना सार्वजनिक व खाजगी आयुर्विमा कंपनींचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

सन २००० नंतर भारतीय आयुर्विमा उद्योगात खाजगी आयुर्विमा कंपन्यांचा प्रवेश झाला. त्यामुळे एल.आय.सी. च्या मक्तेदारीस आव्हान प्राप्त झाले. यामुळे ग्रामीण भागातील विमेदारांवर याचा प्रभाव अभ्यासणेसाठी प्रस्तुत शोधपत्रिकेमध्ये पुढील उद्देशांना धरून संशोधन करण्यात आले आहे.

१. सार्वजनिक व खाजगी आयुर्विमा कंपनीचा ग्रामीण व शहरी भागातील आयुर्विमा व्यवसायाचा अभ्यास करणे.

२. विविध कंपन्यांच्या विमेदाराचे आयुर्विमा खरेदी मागील भूमिका तपासणे.

३. विविध आयुर्विमा कंपन्यांचे विमा प्रतिनिधी ग्राहकांच्या पॉलिसीबाबत व विमा विक्री पश्चात सेवेत तत्पर आहेत का, हे अभ्यासणे.

**तथ्यसंकलन :**

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम तथ्यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. प्राथमिक तथ्य प्रत्यक्ष मुलाखती व प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित करणेत आले आहेत. दुय्यम तथ्य आय.आर.डी.ए. च्या वार्षिक अहवालाच्या आधाराने व आयुर्विमा कंपन्यांचे वार्षिक अहवालातील सांख्यिकी द्वारे गोळा करण्यात आली आहेत. विविध वेबसाईटवरील माहितीचा वापर करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये एल.आय.सी. व इतर तीन खाजगी विमा कंपन्यांच्या दुय्यम तथ्यांची माहिती घेण्यात आली आहे. खाजगी विमा कंपन्यांचे कार्यामध्ये आय.सी.आय.सी.आय. प्रुडेन्शिअल लाईफ, रिलायन्स लाईफ व एच.डी.एफ.सी. लाईफ या कंपन्यांच्या भारतातील विमा व्यवसायाचा एल.आय.सी. च्या विमा व्यवसायाशी तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. आय.आर.डी.ए. ॲक्ट १९९९ नंतरचा म्हणजेच सन २००१-०२ ते सन २००९-१० या दहा वर्षांचा कालावधी संशोधनाकरिता निवडण्यात आला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

भारतीय आयुर्विमा महामंडळाचे आर्थिक विश्लेषण करीत असताना एल.आय.सी. च्या कोल्हापूर विभागाची निवड करण्यात आली आहे. एल.आय.सी. च्या कोल्हापूर विभागामध्ये कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग असे तीन जिल्हे आहेत. या तीनही जिल्ह्यातील खाजगी आयुर्विमा कंपनींचा अभ्यास करण्यात आला आहे. एल.आय.सी. च्या १८ शाखा या तीन जिल्ह्यात कार्यरत आहेत. आय.सी.आय.सी.आय. प्रुडेन्शिअल लाईफच्या चार शाखा व रिलायन्स लाईफच्या तीन व एच.डी.एफ.सी. स्टॅन्डर्ड लाईफच्या दोन विमा शाखा या विभागात कार्यरत आहेत.

**भारतातील विमा उद्योग :**

भारत विमा व्यवसायामध्ये जागतिक

तक्ता क्र. १

भारतातील जीवन विमा कंपन्या व त्यांचे विदेशी भागीदार

| विमा कंपनी | विदेशी भागीदार | रजि. दिनांक |
|---|---|---|
| १.भारतीय आयुर्विमा महामंडळ | -- | १/९/१९५६ |
| २.एच.डी.एफ.सी. स्टॅन्डर्ड | स्टॅन्डर्ड लाईफ अॅश्युरन्स, यु.के. | २३/१०/२००० |
| ३.मॅक्स न्यूयार्क | न्यूयार्क लाईफ यु.एस.ए. | १५/११/२००० |
| ४.आयसीआयसीआय प्रुडे. | प्रुडेन्शिअल प्ली.यु.के. | २४/११/२००० |
| ५.कोटक महिंद्रा ओल्ड म्युच्यु. | ओल्ड म्युच्युअल साऊथ आफ्रिका | १०/०१/२००१ |
| ६.बिर्ला सन लाईफ | सन लाईफ कॅनडा | ३१/०१/२००१ |
| ७.टाटा ए.आय.जी. | अमेरिकन इं.अॅश्यु.कं.यु.एस.ए. | १२/०२/२००१ |
| ८.एस.बी.आय.लाईफ | बीएनपी परिबास अॅश्यु.फ्रान्स | २९/०३/२००१ |
| ९.आय.एन.जी.व्यास | आय.एन.जी.इं.बी.व्ही.नेदरलँडस् | ०२/०८/२००१ |
| १०.बजाज अलाएन्झ | अलाएन्झ जर्मनी | ०३/०८/२००१ |
| ११.मेटलाईफ | मेटलाईफ इंटरनॅशनल होल्डींग्स लि. यु.एस.ए. | ०६/०८/२००१ |
| १२.रिलायन्स | -- | ०३/०१/२००२ |
| १३.अव्हिवा | अव्हिवा इं.होल्डींग्ज लि. यु.के. | १४/०५/२००२ |
| १४.सहारा | -- | ०६/०२/२००४ |
| १५.श्रीराम | सनप्लाय साऊथ आफ्रिका | १७/११/२००५ |
| १६.भारती ए. एक्स ए. | द एक्स ए होल्डींग्ज फ्रान्स | १४/०७/२००६ |
| १७.फ्युचर जनराली | जनराली इटली | ०४/०९/२००७ |
| १८.आय.डी.बी.आय. फेडरल | अगेस युरोप | १९/१२/२००७ |
| १९.कॅनरा एच.एस.बी.सी. | एच.एस.बी.सी.यु.के. | ०८/०५/२००८ |
| २०.अेगॉन रेलीगरे | अेगॉन नेदरलॅन्डस | २७/०६/२००८ |
| २१.डीएलएफ प्रामेरिका | प्रुडेन्शिअल ऑफ अमेरिका | २७/०६/२००८ |
| २२.स्टार युनियन दाय ईचि | दायईचि म्युच्य.लाईफ इन्शु.जपान | २६/१२/२००८ |
| २३.इंडिया फर्स्ट | लिगल अॅन्ड जन.मिडलइस्ट यु.के. | ०५/११/२००९ |

*स्त्रोत : इर्डा रिपोर्ट - २०११-१२*

स्तरावर २० व्या स्थानावर होता. मुक्त धोरणानंतर सन २००० मध्ये खासगी विमा कंपन्यांचा भारतीय विमा व्यवसायात प्रवेश झाला. सन २०१२ पर्यंत २४ विमा कंपन्यांनी भारतात केलेल्या विमा व्यवसायामुळे जागतिक विमा व्यवसायामध्ये भारताची ११ व्या स्थानापर्यंत वृध्दी झाली.

भारतात एलआयसी च्या एकूण २०४८ शाखा कार्यरत आहेत. ७ झोनल ऑफिसेस व १०० विभागीय कार्यालये आहेत. ३१ मार्च २०११ पर्यंत १३,३७,०६४ एजंट एलआयसी कडे विमा व्यवसायाचे कार्य करतात. संशोधनाकरिता निवडलेल्या देशातील खाजगी प्रातिनिधिक विमा संस्थांमध्ये आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल च्या ३० सप्टेंबर २०१० अखेर १५०० शाखा आहेत. यामध्ये १,९०,४०७ एजंट कार्यरत आहेत. एचडीएफसी लाईफ च्या ५६८ शाखा आहेत. यामध्ये १,३६,००९ एजंट कार्यरत आहेत व रिलायन्स लाईफ इन्शुरन्स च्या १२३० शाखा असून १,८९,४८३ एजंट कार्यरत आहेत.

आय.आर.डी.ए. च्या सन २००९-१० च्या भारतातील विमा उद्योगाच्या मार्केट शेअर अहवालानुसार आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल ५.३ टक्के, एस.बी.आय. लाईफ ५.१ टक्के, एचडीएफसी लाईफ २.८ टक्के, बजाज अलाइन्झ २.६ टक्के व रिलायन्स लाईफ इन्शुरन्स २.३ टक्के व इतर खाजगी कंपन्यांचा मार्केट शेअर ९.८ टक्के आहे. तर एलआयसी चा मार्केट शेअर ७२.१ टक्के इतका अधिक आहे.

एचडीएफसी स्टॅन्डर्ड लाईफच्या कोल्हापूर शाखेतील १० व रत्नागिरी मधील १० विमेदारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एचडीएफसी लाईफ ची शाखा नाही. त्यामुळे सिंधुदुर्गमध्ये एचडीएफसी चे ग्राहक नाहीत. रिलायन्स लाईफच्या कोल्हापूरमधील ३ शाखांमधून ३० व रत्नागिरी येथील एका शाखेतील १० विमेदारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. रिलायन्स लाईफच्या एकूण ४० विमेदारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. सिंधुदुर्गमध्ये रिलायन्स लाईफ कार्यरत नाही. एकाच विमेदाराने एलआयसी व आयसीआयसीआय अशा दोन्ही कंपन्यांच्या विमा पॉलिसी खरेदी केल्या आहेत. अशा १४ विमेदारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. यामध्ये कोल्हापूरमधील ५ रत्नागिरी ४ व सिंधुदुर्गमध्ये ५ विमेदारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. एकाच विमेदाराने एलआयसी व

**तक्ता क्र. २**

**निवडलेल्या विमेदार प्रतिसादकांची जिल्हावार संख्या**

| विमा कंपनी | कोल्हापूर | रत्नागिरी | सिंधुदुर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|
| एल.आय.सी. | ११० | ४० | ३५ | १८५ |
| आयसीआयसीआय प्रुडे.लाईफ | १० | २० | १० | ४० |
| रिलायन्स लाईफ | २० | १० | ० | ३० |
| एचडीएफसी स्टॅन्डर्ड लाईफ | १० | १० | ० | २० |
| इतर | २० | १० | ० | ३० |
| एलआयसी, आयसीआयसीआय | ०५ | ०४ | ०५ | १४ |
| एलआयसी आणि रिलायन्स | ११ | ०७ | ० | १८ |
| एकूण | १८६ | १०१ | ५० | ३३७ |

*स्त्रोत : संकलित प्राथमिक तथ्यांचे आधारे.*

रिलायन्स लाईफ या दोन्ही कंपन्यांमध्ये विमा खरेदी केला. अशा १८ ग्राहकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. यामध्ये कोल्हापूर ११ व रत्नागिरी येथील ७ विमेदारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. एकाच ग्राहकाने दोन वेगवेगळ्या विमा कंपनीकडे विमापत्र खरेदी करताना त्यांना आलेला अनुभव भिन्न असल्याचे दिसून येते.

बजाज अलाएन्झ, टाटा.ए.आय.जी. व मॅक्स लाईफ अशा तीन इतर विमा कंपन्यांच्या एकूण ३० ग्राहकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. यामध्ये कोल्हापूर २० व रत्नागिरीमधील १० ग्राहकांच्या प्रश्नावलीद्वारे मुलाखती घेतल्या आहेत.

सारणी क्र.३ नुसार ३३७ प्रतिसादकांमधील ९५ (२८.१९%) विमेदार ग्रामीण भागात राहतात व २४२ (७१.८१%) विमेदारांचे शहरी भागात वास्तव्य आहे. कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग तीनही जिल्हयांमध्ये ग्रामीण भागातील नागरिकांपेक्षा शहरी भागातील विमेदार संख्येने अधिक असल्याचे दिसून येते.

कोल्हापूर जिल्हयामधील १८६ प्रतिसादकांपैकी ५१ (२७.४२%) प्रतिसादक ग्रामिण भागातील असून १३५ ७२.५८%) प्रतिसादक शहरी भागातील आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील १०१ पैकी २९ (२८.७१%) प्रतिसादक ग्रामिण भागातील असून ७२(७१.२९%) प्रतिसादक शहरी भागातील आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १५(३०%) प्रतिसादक ग्रामिण भागातील असून ३५(७०%) विमेदार शहरी भागात वास्तव्यास आहेत.

एल.आय.सी.ची एकूण ३२ टक्के ग्राहक ग्रामीण भागातील असून आय.सी.आय.सी.आय., एच.डी.एफ.सी. व रिलायन्स लाईफ ची प्रत्येकी ३० टक्के ग्राहक ग्रामीण भागातील रहिवाशी आहेत.

## विमेदारांना विमा खरेदीमागील भूमिकेचे अवलोकन

विमेदारांनी विमा खरेदीमागील भूमिकेचे अवलोकन करता येईल. यामध्ये विमेदारांच्या विमा खरेदीमागील पैशाची सुरक्षितता, बचत, विमा संरक्षण कवच, इन्कम टॅक्समधून सूट मिळणेसाठी गृहकर्ज, कर्जासाठी तारण इ. कारकांचे अवलोकन करता येईल. एकूण ३३७ पैकी १४२ विमेदारांनी विमा संरक्षण कवच म्हणून विमा पत्र खरेदी केले आहे. ७६ विमेदारांनी बचतीसाठी तर ४० विमेदारांनी बचत व विमा संरक्षण मिळणेकरिता विमा पत्र खरेदी केली आहेत. सर्वच कारणाकरिता १७ विमेदारांनी विमा खरेदी

तक्ता क्र. ३

निवडलेल्या प्रतिसादकांचे त्यांचे राहणेचे कार्यक्षेत्रानुसार वर्गीकरण

| क्षेत्र | कोल्हापूर | रत्नागिरी | सिंधुदुर्ग | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ५१ | २९ | १५ | ९५ | २८.१९ |
| शहरी | १३५ | ७२ | ३५ | २४२ | ७१.८१ |
| एकूण | १८६ | १०१ | ५० | ३३७ | १००.०० |

*स्त्रोत : संकलित प्राथमिक तथ्यांचे आधारे.*

केला आहे. विमा कंपनी मधील इतर विमा कंपनीमध्ये बजाज अलाएन्झ, टाटा एआयजी व मॅक्स लाईफ या खाजगी विमा कंपनीचे प्रतिसादकांचे विमा खरेदी बाबतचे भूमिका मांडण्यात आली आहे. गृहकर्जासाठी तारण म्हणून ५ व प्राप्तीकरातून सूट मिळणेसाठी २० प्रतिसादकांनी विमापत्र खरेदी केले आहे. कर्ज तारण म्हणून ७ विमेदारांनी विमापत्र खरेदी केले.

एल.आय.सी. च्या ८३ विमेदारांनी विमा संरक्षण कवच म्हणून विमा खरेदी केला आहे. याच कारणासाठी एच.डी.एफ.सी. च्या ६ आयसीआयसीआय ९, रिलायन्स लाईफच्या ८ विमेदारांनी विमापत्र खरेदी केले आहे. विमेदाराला कोणत्या पध्दतीने विमा विषयक माहिती प्राप्त झाली याबद्दल प्रतिसादक विमेदारांचे माहितीचे वर्गीकरण करता येईल. विमेदारांनी स्वतः माहिती प्राप्त केली की, विमा एजंट, विकास अधिकारी, ब्रॅंच मॅनेजर मित्र सहकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली अथवा जाहिरातीने प्रभावित होऊन विमापत्र खरेदी केले यांचे वर्गीकरण केले. ३३७ पैकी २५५ विमेदारांना विमा प्रतिनिधीकडून माहिती विमा विषयक माहिती प्राप्त झाली आणि २२ विमेदारांना विकास अधिकाऱ्यांकडून विमा विषयक माहिती ज्ञात झाली. १७ विमेदारांनी स्वतः व २ विमेदारांनी जाहिरातीने प्रभावित होऊन विमा खरेदी केला. बंद पडलेल्या विमा पॉलिसी पुन्हा सुरू करणेसाठी विमा एजंट मदत करतात हा प्रश्न विचारला असता, २४२ पैकी १७९ (७४%) विमेदारांनी होकारार्थी उत्तर दिले. ६३(२६%) विमेदारांनी नकार दर्शविला.यात सर्वाधिक १३८ पैकी १२८ (९२.८%) एलआयसी चे ग्राहकांनी होकार दर्शविला. सर्वच प्रतिसादकांनी या प्रश्नाचे उत्तर दिले नसल्याने टक्केवारी ही त्या त्या कंपनीच्या उत्तरदात्यांच्या एकूण संख्येची टक्केवारी मांडण्यात आली. आयसीआयसीआय च्या ६८ (२२.२%) रिलायन्स लाईफच्या १२ (६३.२%) एचडीएफसीच्या ५ (३५.७%), मॅक्स लाईफच्या ३(३०%) व इतर कंपन्यांच्या ९(८१.८%) विमेदारांनी होकारार्थी उत्तर दिले.

**निष्कर्ष :**

ग्रामीण भागामध्ये एल.आय.सीचा प्रसार अधिक असल्याचे दिसून येते. तूलनेने खाजगी आयुर्विमा कंपनी शहरी भागात आपले लक्ष केंद्रीत केले आहे. सार्वजनिक व खाजगी आयुर्विमा कंपनीतील विमेदाराचा विमा खरेदी करण्याचा हेतूमध्ये समानता आढळते. विमा संरक्षण व बचत हा विमा खरेदीवरील प्रमुख हेतू दिसून येतो. वेगवेगळ्या आयुर्विमा कंपनी द्वारे आयुर्विमा खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या विमा खरेदीमागील हेतू वेगवेगळा आहे. खाजगी आयुर्विमा कंपनीमध्ये व्यवसायीकांनी विमा खरेदी अधिक प्रमाणात केला असल्याने गुंतवणूक व कर बचत हा त्यांचा हेतू दिसून येतो. एल.आय.सी.मध्ये नोकरदार वर्गाचा विमा खरेदीचा कल अधिक दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

१. *हॅन्डबुक ऑन इंडियन इन्शुरन्स स्टॅटीस्टीकल : २०१०-११ आय.आर.डी.ए. इंडिया.*
२. *आय.आर.डी.ए. अहवाल सन २०१०-११*
३. गिरीश कुलकर्णी, *एफ.डी. आय. वुईल रि. इन्शु.,आऊटलुक मनी*,ऑगस्ट२०१४,पृ. २६.
४. www.irda.org
५. www.licindia.com
६. www.indiainsurance/businessindia.com

# परामर्श-केंद्रिय अर्थसंकल्प २०१५-१६

जयराम विठ्ठल गायकवाड, अमरावती,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय,
मोबाईल नं. : ९८५०१६३६९७

राजकीय लोकप्रिय घोषणांच्या मोहात न पडता अर्थमंत्री अरूण जेटली यांनी पहिल्यांदाच संपूर्ण भारत देश डोळ्यासमोर ठेवून सर्वसमावेशक आणि दूरदृष्टी असणारा अर्थसंकल्प सादर केला. केवळ एका वर्षापुरता अर्थव्यवस्थेचा विचार न करता पुढील ५ वर्षात कोणते परिवर्तन घडवायचे आहे याचा स्पष्ट आराखडा म्हणजेच रोडमॅप मांडला आहे. ज्याप्रमाणे रेल्वे अर्थसंकल्पावर मोदी यांचा प्रभाव दिसून आला तसाच तो अर्थसंकल्पावरही दिसून येतो. पायाभूत सुविधाचे सक्षमीकरण, मेक इन इंडिया आणि रोजगार निर्मिती या तीन बिंदूबरोबरच स्वच्छ भारत निर्मितीवर भर दिलेला आढळतो. देशांतर्गत उत्पादन वाढीसाठी आणि संपत्ती निर्माण व्हावी यासाठी लहान, आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने मुद्रा बँकेची निर्मिती करून त्याद्वारे कर्जपुरवठा केला जाणार असून त्यासाठी २० हजार कोटी रूपये धनराशीची तरतुद केली आहे. मेक इन इंडियाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उद्योगांना परदेशातून जो कच्चा माल आयात करावा लागतो. त्यापैकी २२ वस्तुंवरील सिमा शुल्कात सवलत देण्यात येणार आहे. उद्योगांना विविध सवलती दिल्या गेल्या असून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती व्हावी आणि सुशिक्षीत बेकाराच्या संख्येला आळा बसावा हाच खरा उद्देश असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगीतले. स्वच्छ भारत अभियान हा पंतप्रधानाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून त्याद्वारे सहा कोटी स्वच्छतागृहाची निर्मिती करण्याचा संकल्प सोडण्यात आला. इंडिया विरूद्ध भारत असा आपल्या देशात भेद केल्या जातो. तो नाहीसा करण्यासाठी खेड्यामध्ये चोवीस तास वीज आणि स्वच्छ पाणी, प्रत्येकाला घर, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा या बरोबरच रस्त्यांची निर्मिती यावर भर देवून भेद नाहीसा करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. २०१५-१६ मधील अर्थसंकल्पातील महत्त्वपूर्ण बाबींचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

### कृषी वित्तपुरवठ्यात वाढ:

अर्थमंत्री अरूण जेटली यांनी २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा करतांना कृषी कर्जाचे लक्ष्य ५० हजार कोटी रूपयांनी वाढवून ८.५ लाख कोटी रूपये केले. तसेच शेतकऱ्यांप्रती आमची बांधिलकी असल्याचे नमुद केले. २०१५-२०१६ या वर्षांमध्ये ८.५ लाख कोटी रूपयांचे कृषी कर्ज वितरणाचे महत्वाकांक्षी कार्य बँका पूर्ण करतील अशा विश्वास व्यक्त करून शेतकऱ्यांना पीक कर्ज ३ लाख रुपयापर्यंत ७ टक्के व्याजदराने मिळेल. शेतकऱ्याने कर्जाची परतफेड वेळेवर केल्यास त्याच्याकडून केवळ ४ टक्के व्याज आकारले जाईल. चालू वर्षामध्ये ८ लाख कोटी रूपये कृषी कर्ज वितरणाचे उद्दिष्ट ठरविले होते. सप्टेंबर २०१४ पर्यंत ३.७ लाख कोटी रूपये कृषी कर्ज म्हणून शेतकऱ्यांना वितरीत केले याचा अर्थ केंद्र सरकारच्या बजेट मधील बाबींना बँका पूर्णपणे सहकार्य देतांना आढळत नाहीत तसेच मृदसंधारण व सिंचनाला प्रोत्साहन असे धडक कार्यक्रम हाती घेतल्याचे नमुद केले असून कृषी मंत्रालयाद्वारा सेंद्रिय शेती पंतप्रधान ग्राम सिंचन योजनेला सहाय्य सुक्ष्म सिंचन, पाणलोट योजनेसाठी ५३०० कोटी रूपयाची तरतुद घोषित केली आहे.

छोटे व अल्पभूधारक शेतकरी केंद्रस्थानी ठेवून परिणामकारक आणि अडथळ्याशिवाय कृषी पतुपरवठा करून शेती क्षेत्राला चालना देण्यासाठी विविध घोषणा केल्यात. यामध्ये नाबार्ड अंर्गतच्या ग्राम पायाभूत सुविधांचा विकास निधीसाठी २५ हजार कोटी रूपये, दीर्घ मुदतीच्या ग्रामीण पतपुरवठा निधीसाठी १५ हजार कोटी, अल्प मुदतीच्या सहकारी ग्रामीण पतपुरवठा फेरकर्ज निधीसाठी ४५ हजार कोटी आणि अल्प मुदती अंतर्गत प्रादेशिक ग्रामीण बँक फेर कर्ज निधीसाठी १५ हजार कोटी रूपयांच्या तरतुदीची घोषणा केली. शेतकऱ्यांच्या शेतात सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे, पाण्याच्या वापरात सजगता निर्माण करणे, जमिनीची शाश्वत पद्धतीने उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी त्यांनी 'मृदा हेल्थ कार्ड' जारी करून एक्रिकृत राष्ट्रीय कृषी बाजारपेठ निर्मितीसाठी निती आयोगाच्या माध्यमातून राज्यासोबत केंद्र सरकार काम करणार आहे असे सांगितले.

### सहकारी क्षेत्राला अर्थसंकल्पात ठेंगा:

केंद्रिय अर्थसंकल्पात सहकारी बँकींगकडे दूर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. कृषी पतपुरवठा विना अडथळ्याचा आणि प्रभावी व्हावा यासाठी २०१५-१६ मध्ये नाबार्ड अंतर्गत २५ हजार कोटी रूपयाची ग्रामीण पायाभूत विकासासाठी तरतुद करून सहकारी साखर कारखानदारी, पतसंस्था, सहकारी वस्त्रउद्योग याकरिता अर्थ संकल्पात काहीतरी तरतुद अपेक्षित असतांना त्याकडे दुर्लक्ष केल्याचे सहजपणे दिसून येते.

### संरक्षण क्षेत्राबाबत अपेक्षापूर्ती नाही:

भारताच्या भूमिच्या प्रत्येक इंचाचे संरक्षण करणे हे दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक महत्वाचे आहे. असे आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात स्पष्ट करून संरक्षण क्षेत्रासाठी मागील वर्षीच्या तुलनेत निधीमध्ये ७.९ टक्क्यांनी म्हणजेच १७ हजार कोटी रूपयांच्या वाढीव निधीची तरतुद केली. चीनच्या तुलनेत भारत संरक्षण क्षेत्रामध्ये अद्याप बराच मागे आहे. हिन्दी महासागरात चीनचा वाढता वापर लक्षात

घेता भारताच्या संरक्षण क्षेत्रासाठी अधिक तरतुद होईल अशी अपेक्षा होती. गेल्या वर्षी तिन्ही दलासाठी २ लाख २९ हजार कोटी रूपये निधी देण्यात आला होता. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये तो वाढवून २ लाख ४६ हजार ७२७ कोटी रूपयाची भरीव तरतुद केली. अत्याधुनिक पाणबुडी तसेच आर्टिलरी गन्स खरेदी, संरक्षण सामुग्री नव्याने खरेदी करावयाची आहे. वन रँक वन पेन्शन साठी ८,५०० कोटी रूपयाच्या निधीला मान्यता मिळाली असून डिआरडीओ साठी ६५७० कोटी रूपये, भूदलासाठी १ लाख ४ हजार १५८ कोटी रूपये, नौदलासाठी १५ हजार ५२५ कोटी रूपये तर हवाई दलासाठी २३ हजार कोटी रूपये निधी मिळणार असून या क्षेत्राच्या वाढीसाठी तो पुरेसा नाही. असे राष्ट्रीय संरक्षण विषयक अभ्यासक म्हणतात.

### पायाभूत सुविधांवर भरघोस तरतुद:

पायाभूत सोयी सुविधा वाढीसाठी ७० हजार कोटींच्या तरतुदीसह रेल्वे, आणि रस्ते विकासासाठी करमुक्त (बाँडस) कर्जरोखे उभारणार आहेत. २० हजार गावापर्यंत वीज पोहचविण्याचे उद्दिष्टे असल्यामुळे पाच मोठे मेगा वीज प्रकल्प उभारले जाणार आहेत.

स्वच्छ भारत योजने अंतर्गत २०१४-१५ मध्ये ५० लाख शौचालये उभारली जाणार असून सहा कोटी शौचालये उभारणीचे उद्दिष्ट निर्धारीत केले आहे. प्रत्येक गावापर्यंत रस्ता निर्माण करणे, २०२२ पर्यंत म्हणजेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षापर्यंत सर्वांना घर, वीज, स्वच्छ पाणी, शैक्षणिक व आराग्य सुविधा देता याव्या यासाठी पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर देऊन त्यामध्ये भरघोस तरतूद केलेली आढळते. शहरी विकासाबरोबर ग्रामीण विकासार लक्ष केंद्रित करून विकास कामासाठी वाढीव तरतुद केलेली आढळते.

### मनरेगासाठी विक्रमी तरतुद:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अर्थात 'मनरेगा' साठी आतापर्यंतची सर्वाधिक तरतुद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. असे अर्थमंत्र्यांनी सांगीतले. २०१५-१६ या वर्षासाठी मनरेगामध्ये ५००० कोटी रूपयाची अतिरिक्त तरतुद केली. सरकारने ही योजना आगामी काळात सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. या याजनेच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना रोजगार मिळणार असून सर्वांना रोजगार मिळेल याची काळजी घेतली जाणार असून त्यासाठी ३४,६९९ कोटी रूपये निधी सरकारने उभारलेला आहे. मनरेगामार्फत होणाऱ्या कामाची गुणवत्ता आणी प्रभाव (परिणामकारकता) यामध्ये सुधारणा करण्यावर भर दिला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### सबसिडीची कपात व गळती रोखण्यावर भर:

वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पात वित्तीय तुट नियंत्रित करण्यासाठी विविध क्षेत्रांना दिली जाणार सबसिडी कमी केली आहे. मागील वर्षीच्या (२०१४-१५) संशोधित अर्थसंकल्पात सकल राष्ट्रीय उत्पादनाचा २ टक्के भाग सबसिडीच्या खात्यात ठेवण्यात आला होता. परंतु २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात सबसिडीच्या खात्यात सकल राष्ट्रीय उत्पादनाचा १.६ टक्के भाग ठेवण्यात येणार असल्याचे घोषित केले. सबसिडीचा लाभ थेट लाभार्थी म्हणजे गरीब आणि वंचित घटकापर्यंत पोहचविण्यासाठी सबसिडी त्यांच्या

बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. स्वयंपाक गॅस सिलेंडर धारक ग्राहकांच्या (११.२ कोटी ग्राहक) बँक खात्यावर ६३३५ कोटी रूपये देण्यात येणार असल्याने त्यामधील भ्रष्टाचार कमी होईल. याचबरोबर पेट्रोल, डिझेल, केरोसिन खाद्यान्न यावर दिल्या जाणाऱ्या सबसिडीतील गळती कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न केली जातील.

## शिक्षणासाठीच्या तरतुदी निराशजनक:

केंद्रिय अर्थसंकल्पामध्ये शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टिने कोणतेही ठोस पाऊल अथवा कार्यक्रम सादर केला नसून फक्त काही राज्यात आयआयटी आणि आयआयएमए संस्था उभारल्या जाणार असल्याचे सांगीतले या संस्थाचा फायदा कोणाला होणार हा फार मोठा प्रश्न आहे. कारण आपल्या देशात ८५ टक्के विद्यार्थी बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी. हे मूलभूत शिक्षण घेत आहेत. यातील किती विद्यार्थी आयआयटी व आयआयएम मध्ये जातील हा प्रश्न आहे. सध्या रोजगारीचा प्रश्न गंभीर असून विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षण देणे आवश्यक आहे. सर्वसमावेशक रोजगार वाढीचे धोरण निश्चित करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सोबतच गरीबातील गरीब कुटूंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे अशी अपेक्षा असली तरी अर्थसंकल्पात यादृष्टिने काहीही नाही. शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने एकविसावे शतक ज्ञानाधारित आहे. पण केंद्र सरकार त्याबाबत गंभीर नसल्याचे अर्थसंकल्पातील आकडेवारीवरून दिसून येते.

## २०१५-१६ अर्थसंकल्पातील नविन योजना:

१) पंतप्रधान जीवन सुरक्षा विमा योजना- अपघाती मृत्यूनंतर विमा संरक्षण देणारी पंतप्रधान यांची महत्वाकांक्षी योजना केवळ १२ रूपये वार्षिक हप्त्यामध्ये २ लाख रूपये विमा संरक्षण.

२) अटल पेन्शन योजना :- ज्येष्ठ नागरीकांसाठी अटल पेन्शन योजना राबवून यामधील हप्त्याच्या रकमेत ५०टक्के हिस्सा केंद्र सरकार उचलणार आहे आणि निश्चित दराने पेन्शन मिळणार आहे.

३) पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना :- नैसर्गिक आपत्ती अपघात मृत्यूनंतर विमा संरक्षण देणारी योजना यामध्ये वार्षिक प्रिमियम ३३० रू. भरावा लागेल.

४) करमुक्त पायाभूत रोखे: रेल्वे, रस्ते आणि कृषी क्षेत्रासाठी करमुक्त पायाभुत कर्ज रोखे उभारली जाणार आहेत.

५) जनधन, आधार आणि मोबाईल :- १ एप्रिल २०१६ पासून जनधन आधार आणि मोबाईल ह्याचा अधिक वापर करून आर्थिक परिस्थिती सुधारणा हा नविन कार्यक्रम राबविला जाणार आहे.

६) नई मंजिल योजना : अल्पसंख्यांक युवकांना सक्षम बनविण्यासाठी व रोजगार पुरविण्यासाठी ह्या नवीन योजनेची घोषणा केली.

७) दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना: ग्रामीण भागातील युवकांचे कौशल्य विकसीत करणे त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे युवकांना प्रोत्साहन देणे याकरिता या योजनेची सुरूवात.

८) पंतप्रधान विद्या लक्ष्मी योजना: सर्वांना उच्च शिक्षण आणि त्यासाठी शिष्यवृत्ती आणि

कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी ह्या योजनेची घोषणा.

९) पंतप्रधान ग्रामसिंचन योजनाः मातीची प्रत आणि पाणी यासाठी 'मृदा स्वास्थ कार्ड' योजना सुरू करून त्याद्वारे जलविकास आणि सुक्ष्म सिंचन योजनेला मदत पुरविली जाणार आहे.

१०) स्वच्छ भारत कोष: स्वच्छता मोहिमे अंतर्गत आवश्यक निधी संकलनासाठी वित्तमंत्र्यांनी स्वच्छ भारत कोष निर्माण करून देणगी देणाऱ्या लोकांना प्राप्तीकर कायदा कलम ८० अंतर्गत १०० टक्के करसवलत दिली जाणार आहे.

## सारांश:

अर्थसंकल्पामध्ये देशांतर्गत उत्पादन वाढीसाठी आणि संपत्ती निर्माण व्हावी यासाठी विशेष तरतुदी केलेल्या आहेत. उद्योग धंद्यांचा विकास होण्यासाठी विविध सवलतीचा वर्षाव असून पायाभूत सुविधा वाढविण्यावर विशेष भर, मेक इन इंडिया आणि रोजगार वाढीवर भर देतांना स्वच्छ भारत निर्माणतेला प्राधान्य दिले आहे. २०२२ पर्यंत सर्वांना घर, वीज, पाणी, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची घोषणा केलेली आहे. मनरेगा निधीमध्ये वाढ, वंचित व दूर्बल घटकांना अनुदान, वीमा संरक्षण, वीजनिर्मितीवर भर, यासारख्या अनेक बाबींचा अंतर्भाव अर्थसंकल्पात आहे. १ एप्रिल २०१६ पासून जीएसटी लागू होणार असून अप्रत्यक्ष करापासून मिळणारे उत्पन्न कसे वाढविता येईल याकडे लक्ष दिले आहे. अर्थमंत्र्यांनी पगारदाराची करदेयता कमी करण्यासाठी आरोग्य विम्यातील करमुक्त गुंतवणुकीची मर्यादा वाढवून तसेच वाहतुक भत्ता वाढवून पायाभूत सुविधामधील गुंतवणुकीचा मार्ग मोकळा केला आहे. काळ्या पैसा संदर्भात कठोर उपाय, कर चुकविणाऱ्यांना १० वर्षापर्यंत कारावास अथवा तीनशे टक्के दंड आकारण्याची तरतुद अशा घोषणा केल्यात. 'सबका साथ सबका विकास' या घोषणेचे प्रतिबिंब या अर्थ संकल्पात दिसून येते. भविष्यात 'सबका साथ सबका विकास' होईलच असे नाही. कारण सर्व क्षेत्रांना सारखे प्राधान्य दिले नसुन संकल्प आणि सिध्दी यामध्ये नेहमीच अंतर असते हे अंतर कमी झाल्यास फायदा सर्वांना मिळेल. अन्यथा मागील काळात जे झाले याचीच पुनरावृत्ती होईल.

## संदर्भ सूची:


१) वित्तमंत्री अरूण जेटली यांचे भाषण दि. २८/०२/२०१५ रोजीचे
२) दै.लोकमत, नागपूर, दि. १ मार्च २०१५
३) दै.हितवाद, नागपूर, दि. १ मार्च २०१५
४) दै.लोकसत्ता, नागपूर, दि. १ मार्च २०१५

पीएच.डी. प्रबंधाचा सारांश

# वर्धा जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्राचे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात योगदान

**चौधरी हेमराज, आर्वी,**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जिल्हा वर्धा.
भ्रमणध्वनी: ९४०३१९५०९०

कोणत्याही देशाच्या समग्र व संतुलीत विकासासाठी महिलांचा सक्रीय व प्रभावी सहभाग आवश्यक असते. भारतीय स्त्रियांचा विचार करतांना विविध संस्कृती, रुढी, प्रथा-परंपरा यांनी नटलेल्या या समाजात स्त्रियांचे स्थान पुजनीय होते. स्त्री शिवाय पुरुषांचे जीवन अपुर्ण आहे अशीच धारणा होती. सिंधु संस्कृती पासूनच्या काळाचा विचार करता या संस्कृतीत मातृप्रधान कुटुंबव्यवस्था असल्यामुळे स्त्रियांचा दर्जा उच्च होता. परंतु पुढे वैदिक काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत तो खालावत गेला. नंतरच्या काळात औद्योगिक विकास, शिक्षणाचा विस्तार व काही प्रबुध्द नेत्यांनी चालविलेले सामाजिक आंदोलन यामुळे महिलांची स्थिती सुधारली. अनंत काळापासून महिलांचे होत असलेले शोषण, अत्याचार आणि त्यांना मिळणारी अपमानास्पद वागणूक रोखण्यासाठी महिला सक्षमीकरण किंवा महिला सबलीकरण असा महिला विकासाचा धोरणात्मक कार्यक्रम स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विकास आराखडयात मांडण्यात आला.

भारतीय संविधानात महिलांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी विशेष प्रावधान करण्यात आले. महिला व पुरुषांना कायद्यासमोर समानता उपलब्ध करुन देण्यात आली. विभिन्न पंचवार्षिक योजनांमध्ये महिलांशी संबंधित विविध कार्यक्रम समाविष्ट करण्यात आले.

आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आघाडी घेतली आहे. अनेक स्त्रिया स्वयंरोजगार आणि लघुउद्योग क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी उत्सुक आहे. जिल्हा उद्योग केंद्राकडून महिला उद्योजकांना अनेक प्रकारच्या सोयी सवलती उपलब्ध करुन दिल्या जात आहे. त्याचाच परिणाम म्हणून आज अनेक महिला उद्योजिका समोर येत आहे.

**महिला सक्षमीकरणाची संकल्पना:**

महिला सक्षमीकरणाचा साधा-सरळ अर्थ असा आहे की, स्त्री ने स्वतःच्या क्षमतांची ओळख करुन घेवून आपल्या जवळील क्षमतांचा विकास करावयाचा आणि स्वतःवर परिणाम करणाऱ्या घरगुती व सामाजिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करावयाचा. थोडक्यात महिला सक्षमीकरण एक अविरत व गतीशील प्रक्रिया आहे, जिचा मुलभूत उद्देश महिलांची योग्यता, कौशल्य व सृजनात्मक शक्ती ओळखून त्यांचा पूर्ण व कुशल उपयोग सुनिश्चित करणे हा आहे.

भारतात उद्योजकतेच्या युगाचा प्रारंभ आता होवू लागला आहे. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत महिलांचे योगदान अजून आवश्यक आहे. ही उद्योजकता निर्माण करुन महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याचे कार्य जिल्हा उद्योग केंद्र करीत आहे.

**जिल्हा उद्योग केंद्राची भूमिका:**

१९७७ च्या औद्योगिक धोरणांतर्गत ग्रामीण व लघुउद्योगांना आवश्यक सुविधा व सहाय्यता उपलब्ध करुन देण्यासाठी १९७८ मध्ये जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना करण्यात आली. या उद्योग केंद्रांनी उद्योगांच्या विकासासाठी आर्थिक सर्वेक्षण, कर्ज, विपणन, कच्चा माल, मशिनरी, अनुसंधान, विस्तार व प्रशिक्षण इ. गोष्टी उद्योजकांना उपलब्ध करुन दिल्या आहे. यात महिला सुध्दा उद्योजिका म्हणून पुढे येत आहे. त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे कार्य जिल्हा उद्योग केंद्र करीत आहे. अशाप्रकारे महिला उद्योजकांनी स्वतःचे उद्योग काढून सक्षमीकरण घडवून आणले. त्याबरोबरच काही महिलांना आपल्या उद्योगात रोजगार देवून त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणास हातभार लावला. एकूणच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात जिल्हा उद्योग केंद्र महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.

**संशोधनाची उद्दीष्ट्ये:**

वर्धा जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्राचे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात योगदान या विषयाच्या प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे उद्दीष्ट्ये निश्चित करण्यात आली.

१. जिल्हा उद्योग केंद्राद्वारे महिला उद्योजिकांना मिळणाऱ्या सोयीसुविधांचा अभ्यास करणे.
२. महिलांना किंवा महिला उद्योजिकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासंदर्भात उद्योग केंद्राचे कार्य जाणून घेणे.
३. जिल्हा उद्योग केंद्राने केलेल्या कामगिरीचे विश्लेषण करणे.
४. महिलांच्या बदललेल्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
५. महिलांमधील सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक व राजकीय बदलांचा अभ्यास करणे.
६. जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

संशोधनाशी संबंधित माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे. नमुना निवड करतांना वर्धा जिल्हा उद्योग केंद्रात नोंदणीकृत ५३ महिला उद्योजिकांपैकी १० उद्योगप्रकारांमधून ४३ उत्तरदात्यांची निवड कोटा पध्दतीने करण्यात आली. शिवाय प्रत्येक उद्योग प्रकारांमधून ५०% प्रमाणे २२७ महिला कामगारांमधून ११४ महिला

कामगारांची निवड उत्तरदाते म्हणून केली. त्याचबरोबर जिल्हा उद्योग केंद्राचे महानिदेशक यांचेकडून मुलाखत अनुसूची भरुन घेतली.

दुय्यम साधनाअंतर्गत जिल्हा उद्योग केंद्राचे विविध अहवाल, जिल्हा उद्योग केंद्राशी संबंधित व महिलांशी संबंधित साहित्य यांचा वापर करण्यात आला. याशिवाय संशोधनपर लेख, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे आणि संकेत स्थळावरील माहितीचा वापर केला.

**निष्कर्ष:**

अ) महिला उद्योजकांकडून मिळालेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाद्वारे प्राप्त निष्कर्ष :

१. भांडवल उभारणीकरीता उद्योग केंद्राची मदत घेणाऱ्या महिला उद्योजिकांची संख्या सर्वाधिक आहे. मात्र उद्योग केंद्राकडून होत असलेली मदत पुरेशी नाही असे सर्वच उत्तरदात्यांचे मत आहे.

२. उद्योग सुरु केल्यामुळे उत्तरदात्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाली आहे व आर्थिक अडचणींचे निराकरण पुर्णतः झाले आहे, असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

३. उद्योग उभारणीनंतर वाढीव उत्पन्नामुळे उपभोग खर्चात वाढ होवून बहुसंख्य उत्तर दात्यांचे राहणीमान उंचावले आहे.

४. प्राप्त माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषण वरुन महिला उद्योजकांसाठी उद्योग केंद्राकडून प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते.

५. उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी उद्योग केंद्राच्या अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे आयोजन केले जाते.

६. उद्योग उभारणीमुळे बँकींग व्यवहारात वाढ होऊन बहुसंख्य उत्तरदात्यांना आर्थिक व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य आहे.

७. बहुसंख्य उत्तरदात्यांच्या मते कुटुंबाचा वैचारिक दर्जा उंचावला आहे. कुटुंबाकडून त्यांना प्रोत्साहन मिळत आहे. शिवाय कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत त्यांचे मत विचारात घेतले जात आहे.

८. उद्योग उभारणीमुळे सामाजिक प्रतिष्ठा आणि सामाजिक कार्यातील व सामाजिक निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढला आहे.

९. बहुसंख्य महिला उद्योजिकांनी राजकीय पक्षाचे सदस्यत्व स्विकारले आहे.

१०. खुल्या वर्गवारीतील उद्योजिकांची संख्या सर्वाधिक आहे.

ब)महिला कामगारांकडून मिळालेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाद्वारे प्राप्त निष्कर्ष:

१. प्राप्त माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणावरुन अशिक्षीत महिला कामगारांची संख्या अधिक असून सर्वाधिक कामगार हिंदुधर्मीय आहे.

२. बहुसंख्य महिला कामगार उद्योगात कामाला येण्यापुर्वी मोलकरीण म्हणून कार्य करीत होत्या.

३. बहुसंख्य महिला कामगार उत्तरदात्यांची पूर्वीची आर्थिक स्थिती हलाखीची होती.

४. उद्योगातील नोकरीमुळे राहणीमान उंचावले असे बहुसंख्य उत्तरदात्यांचे मत आहे.

५. उद्योगातील नोकरीमुळे बहुसंख्य महिलांच्या बँकींग व्यवहारात वाढ झाली आहे.

६. नोकरीमुळे बहुसंख्य महिलांना कुटुंबात आदराचे स्थान मिळत आहे. शिवाय त्यांना आर्थिक व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य आहे.

७. कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत बहुसंख्य महिला

कामगारांचे मत विचारात घेतले जाते. शिवाय कौटुंबिक आरोग्याबाबत बहुसंख्य महिला कामगार जागरुक आहेत.

८. बहुसंख्य महिला कामगार राजकीय पक्षाच्या सदस्य नाहीत, मात्र मतदानाच्या हक्काची अंमलबजावणी सर्वच उत्तरदाते करतात.

शिफारसी:

१. बहुजन वर्गातील महिला उद्योजिका म्हणून सामोरे याव्यात म्हणून सरकारकडून उद्योजकता विकास कार्यक्रमाचा विस्तार करण्यात यावा.

२. महिला उद्योगांवर घरातील पुरुषांचे नियंत्रण आहे, म्हणून निर्णय प्रक्रियेत महिला सामोरे येतील. यासाठी जिल्हा उद्योग केंद्राकडून महिलांची जागृती करायला पाहिजे.

३. दुर्मिळ कच्चा माल मिळवून देण्यास उद्योग केंद्राने मदत करावी.

४. जिल्हा उद्योग केंद्र पुरस्कृत भांडवल उभारणीच्या विविध योजनांचा विस्तार करण्यात यावा.

५. महिला उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्रीय यंत्रणा कार्यान्वित केली जावी.

६. घेतलेल्या कर्जाच्या वापरावर देखरेख ठेवण्यात यावी.

७. परवाना आणि कर्ज मिळविण्याची प्रक्रिया सरळ व सोपी करण्यात यावी.

८. निवडणुकांमध्ये उमेदवार म्हणून सहभागीत्व वाढविण्यासाठी महिलांची राजकीय जाणीवजागृती करण्यात यावी.

९. महिला कामगारांसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात यावी.

१०. महिला कामगारांना किमान आवश्यक वेतन मिळते किंवा नाही याची पाहणी करावी.

संदर्भ सूची:

१. मोदी अनिता, *महिला सशक्तीकरण-विविध आयाम*, वायकिंग बुक्स, जयपूर.

२. आगलावे प्रदिप, *भारतीय समाज - प्रश्न आणि समस्या*, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. पाण्डेय संगिता व पाण्डेय तेजस्कर, *भारत मे सामाजिक समस्याऐ*, टाटा मॅकग्रा हिल पब्लिशिंग कंपनी, नवी दिल्ली.

४. भुवनेश्वरी रिचा, *महिला विकास कार्यक्रम एवं योजनाऐ*, रितु पब्लिकेशन्स, जयपुर.

५. महाम्बरे गंगाधर, *महिलांसाठी उद्योग व्यवसाय*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

६. जोशी श्रीनिवास, *महिलांची उद्योजकता - अडथळे दूर करण्याची गरज*, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, उद्योजकता मासिक, ऑगस्ट २००९.

७. जैन अमरचंद, *औद्योगिक विकास एवं जिल्हा उद्योग केंद्र*, आदित्य पब्लिशर्स, बिना.

(संशोधकाने वर्धा जिल्हयात जिल्हा उद्योग केंद्राचे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात योगदान या विषयावर डॉ. संजय धनवटे कारंजा (घाडगे) यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाच्या पीएच.डी. पदवीसाठी प्रस्तुत प्रबंध सादर केला आहे.)

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकाचा अहवाल - चर्चासत्र पहिले
## मौद्रिक व वास्तव क्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैद्धांतिक विवेचन

सूत्रसंचालक : दि. व्यं. जहागिरदार, अमरावती,
वृत्त संकलकः अरूण पिसे, धुळे

१) डॉ. आर. के. शेख व डॉ. उमेश घोडेस्वार : डॉ. घोडेस्वार यांनी निबंध सादर केला. मौद्रिक व वास्तव क्षेत्रातील तफावत आणि त्या क्षेत्रांचा अर्थ स्पष्ट केला. पैशाची मागणी, फिशरचा सिद्धांत, केन्सचा सिद्धांत यांचा संदर्भ दिला. केन्सच्या सिद्धांतात परिकल्पना हेतूवर भर दिलेला दिसून येतो. पैशाच्या पुरवठ्याची संकल्पना आणि त्यातील घटक यांचे विश्लेषण केले. पैशाच्या पुरवठ्याचे निर्धारक घटक विचारात घेतले. वास्तव्य क्षेत्र व त्यातील बचन, गुंतवणूक उपभोग, भांडवलाची सीमांत कार्यक्षमता, व्याजदर यांचे विश्लेषण केले. विसंगतीच्या कारणांचा विचार केला.

२) प्रा.डॉ. अर्पणा कुलकर्णी, नाशिकः या उपस्थित नव्हत्या त्यांनी शोधनिंबंधात पॅटीनकीन यांच्या सार्वत्रिक समतोल विश्लेषणाचा विचार मांडलेला आहे.

३) डॉ. मृणालीनी तापस, नागपुरः यांनी हिक्स आणि हॅक्सन यांचा सैद्धांतिक विवेचन मांडले, व्याज उत्पन्नाचा विचार, बचत, गुंतवणूक, पैश्याची मागणी, पैश्याचा पुरवठा, तसेच बचत, गुंतवणूक समतोल पैश्याची मागणी पुरवठ्याचा समतोल व व्याज दर यांचे विवेचन केले. एका क्षेत्रातील बदल दुसऱ्या क्षेत्रावर प्रभाव टाकतात बचतीवर गुंतवणूक अवलंबून असते.

४) प्रा. विश्वजित कदम, नाशिकः पैसा विनीमयाचे माध्यम मुल्य संचयाचे माध्यम या पैश्याचा कार्यावर प्रकाश टाकला. तसेच बाजार समाशोधत गृहीत आहे का? पैश्याची मागणी अतिरिक्त आहे का ? याचे विवेचन केले. नियमानुसार पैश्याची मागणी कायम स्वरूपी अतिरिक्त असु शकत नाही यावर प्रकाश टाकला. पैश्याची मागणी किंमत पातळी बरोबर एकाच दिशेने बदलते. केन्सच्या परिकल्पना हेतुचा विचार केला फिलीप्स वक, फ्रिडमनचा नियम यांचा संदर्भ दिला. विवेकी अपेक्षा परिकल्पना याचा विचार केला.

५) प्रा. मंजुषा मुसमाडे, पुणे: यांनी आपल्या शोधनिबंधात सैद्धांतिक आढावा घेतला १९७० च्या दशकातील अनार्कीक भाववाढ २००८ चे आर्थिक अरिष्ठ, १९८७ ते २००८ काळातील स्थैर्य, २००८ ते २०१३ या काळातील मंद कपात आणि अमेरिकन फेडरल सिस्टीम यांचा उल्लेख केला, अमेरिकन फेडरल सिस्टीमचा धोरणानुसार विकसनशील देशन, चलन विषयक धोरण स्विकारतात परंतु मुद्रा क्षेत्र व वास्तव क्षेत्र यातील विसंगती या देशांना जड जातील असे प्रतिपादन केले.

६) डॉ. प्रशांत हरमकर, अमरावती: वास्तव क्षेत्राची प्रभाव मुद्रा क्षेत्रावर असतो असे से यांचे म्हणणे मांडले वॉलरसच्या सिद्धांताचा उल्लेख केला, नफा हेतुने गुंतवणूक होते असे नव अभिमन पंथी मानतात. वास्तव क्षेत्र वित्तीय क्षेत्राने प्रभावित होते. नवअभिमन पंथानुसार बचतीचे रूपांतर गुंतवणूकीत होते.

७) प्रा.डॉ. युगंधरा देशपांडे-टोपरे, औरंगाबाद: मिलर आणि बोटींग यांच्या शोधनिबंधाचा आधार घेऊन निबंधाची मांडणी केली. वास्तव क्षेत्राचा जास्त विकास होतो. मौलीक क्षेत्राकडून वास्तव क्षेत्राकडे पेक्षा जेव्हा कार्यान्वित होतो. तेव्हा अर्थव्यवस्थेची चाके गतिमान होतात. मौलीक आणि वास्तव क्षेत्रातील तफावत मांडली वास्तविक क्षेत्राच्या विस्तारासाठी जे महत्वाचे मुद्दे आहेत त्यांचा उल्लेख केला. विकसित देशात शासन मदत करते. वास्तव क्षेत्र वाढते, परंतु मुद्रा क्षेत्र संकुचित होते. सरकारचे वर्चस्व आवश्यक आहे.

८) डॉ. वैशाली देशमुख, अमरावती: फिलीप्स वक्राचा भारताच्या संदर्भातील अभ्यास विचारात घेतला. वास्तव क्षेत्र व मुद्दा क्षेत्र यांचा विस्तार समान रितीने न झाल्याने आर्थिक अरिष्ठ निर्माण होते. बेरोजगारी जास्त असेल तर मजुरी दर कमी असतो. व्यापार क्रियांचे स्वरूप महत्वाचे असते असे मांडले बेरोजगारीचे आर्थिक, सामाजिक विपरीत परिणाम झाल्याचे प्रतिपादन केले. किंमती वाढुनही उत्पादकता वाढली नाही. बेरोजगारी कमी करण्याचे उपाय किंमत वाढीला कारणीभूत ठरतात.

९) डॉ. सुभाष सोनवणे, पुणे: काळापैसा आणि निवडणुकामधील वापर यांचा विचार केला आर्थिक धोरण ठरविणे, काळ्या पैशामुळे कठीण जाते, पैश्याचा भ्रमण वेग स्थिर आहे असे फिशरचे म्हणणे मांडले पैश्याची मागणी खरोखर वर्तविता येते का ? काळा पैसा असतांना हे शक्य आहे का ? याचा विचार केला काळा पैसा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.

१०) डॉ. संजय तुपे, नाशिक: वास्तव क्षेत्र व मुद्रा क्षेत्र याचा संबंध मान्य करावा परंतु कोणते क्षेत्र कारण आणि कोणते क्षेत्र परिणाम हे ठरविणे अवघड आर्थिक संकट एका देशात निर्माण होऊन दुसऱ्या देशात स्थलांतरीत होतात.

डॉ. संतोष दास्ताने, डॉ. स. दा. तुपे, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. सुभाष दगडे, डॉ. माहोरे, प्रा. देवशटवार यांनी चर्चेत सहभाग घेतला.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकाचा अहवाल - चर्चासत्र दुसरे

## जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल

सुत्र संचालक: विनायक भिसे, औरंगाबाद,
प्राध्यापक- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
वृत्त संकलक: आर. जी. रसाळ, प्रवरानगर
विभाग प्रमुख व उपप्राचार्य, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३८ व्या राष्ट्रीय अधिवेशनात दुसरे चर्चासत्र दि.०८ नोव्हेंबर २०१४ रोजी सकाळी १०:०० वाजता सुरू झाले. या चर्चासत्रात एकूण ३१ शोध निबंध आले होते. परंतु त्यापैकी १३ संशोधकांनी शोध निबंध सादर केले. या चर्चासत्राचे दोन भाग करण्यात आलेले होते. सकाळी १०:०० ते १:००व दुपारच्या सत्रात २:०० ते ४:०० असे विभाजन करून संशोधकांना शोध निबंध सादर करण्यास पुरेसा वेळ देण्यात आला.

प्रथम डॉ. जयश्री भंगाळे यांनी कृषी जैवतंत्रज्ञान व भारताचा कृषी विकास या विषयावर शोध निबंध सादर करून जैवतंत्रज्ञान शेतकऱ्यांना कसे महत्त्वाचे आहे हे सांगितले. कृषी जैवतंत्रज्ञानासाठी सरकारने आर्थिक मदत केली पाहिजे असे प्रतिपादन केले. त्यानंतर डॉ. मोहन चौधरी यांनी भारतीय शेतीत जैवतंत्रज्ञान व त्याचे महत्त्व प्रतिपादन केले. डॉ. संगिता टक्कामोरे, रामटेक यांनी जैवतंत्रज्ञानाचे भारतीय कृषीवर परिणाम या विषयावर शोध निबंध सादर केला. यात त्यांनी जैवतंत्रज्ञानाचा कृषीवरील विपरित परिणामही सांगितला. डॉ. आर. जी. भांडवलकर, यवतमाळ यांनी कृषी व्यापार व नोकरी यांची क्रमवार चर्चा केली. प्रा.सौ. वर्षा नेहते, जळगांव यांनी जैविक तंत्रज्ञान आधुनिक शेतीसाठी वरदान या विषयावर शोध निबंध सादर केला. जैविक तंत्रज्ञानाची उत्पत्ती कशी झाली याचा आढावा घेऊन कृषी विकासातील जैवतंत्रज्ञानाचे महत्व प्रतिपादन केले.

त्यानंतर प्रा. प्रविण महाजन, जळगांव यांनी अन्नसुरक्षेत जैवतंत्रज्ञानाचे योगदान प्रा. राठोड मदनसिंग सुपडू, धुळे, प्रा.डॉ. शकुंतला पाटील, इचलकरंजी, प्रा.डॉ.वि.ड.विभूते, उदगीर, डॉ. कल्याणकर, सौ. माने, प्रा.व्ही.एन. चौधरी, शिरपूर

यांनी या चर्चासत्रात आपले शोध निबंध सादर केले.

या चर्चासत्रात डॉ.दि.व्यं. जहागिरदार, डॉ. जगदाळे, डॉ. एस.एन. कुलकर्णी, डॉ. विजय गांवडे, डॉ. जोशी यांनी चर्चेत सहभाग घेऊन मोलाची भर घातली. सर्व संशोधकांनी जैवतंत्रज्ञानाने इष्ट व अनिष्ट परिणाम यावर चर्चा केली. तसेच कोरडवाहू शेतीसाठी जैवतंत्रज्ञान कसे आवश्यक आहे. यावर भर दिला. भविष्यात जैवतंत्रज्ञानानावर अधिक संशोधनाची गरज प्रतिपादन केली.

शेवटी सूत्रसंचालक डॉ. व्ही. बी. भिसे यांनी कृषी तंत्रज्ञान अधिक विकसित करून जैवतंत्रज्ञानाची गरज प्रतिपादन केली. कृषि क्षेत्रात प्रक्रिया उद्योग स्थापन करून ज्यासाठी ही जैवतंत्रज्ञानाची मदत होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

या सत्राच्या शेवटी डॉ. राम देशपांडे, बँगलोर, यांनी जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेती या संबंधी अभ्यासपूर्ण विवेचन केले. तसेच कृषीमालाच्या किंमती स्थिर कशा राहतील यासाठी उपाय करणे आवश्यक आहे यावर त्यांनी भर दिला. डॉ. आर. जी. रसाळ, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर यांनी शेवटी चर्चासत्राचा थोडक्यात गोषवारा घेऊन सर्वांचे आभार मानले.

---

### मराठी अर्थशास्त्र परिषद: महत्त्वाची सूचना

## मतदारांसाठी ओळखपत्र आवश्यक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनात मराठी अर्थशास्त्र परिषद कार्यकारी मंडळ सदस्य, अध्यक्ष, कार्याध्यक्ष व कार्यवाह खजिनदार यासारख्या जागांसाठी मतदान घेतले जाते. या मतदानासंदर्भात जळगाव येथील मुळजी जेठा महाविद्यालयात १९ एप्रिल २०१५ रोजी परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत पुढील महत्त्वपूर्ण निर्णय झाला आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विविध जागांसाठी यापुढे घेतल्या जाणाऱ्या मतदानात परिषदेच्या आजीव सदस्य मतदारांनी आपले छायाचित्र असलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. यामध्ये आधार कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेले ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे याची कृपया सन्माननीय आजीव सदस्यांनी नोंद घ्यावी.

बारामती येथे १९, २० व २१ नोव्हेंबर २०१५ या दरम्यान तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात होणाऱ्या ३९व्या अधिवेशनापासूनच ओळखपत्र सक्तीचे करण्यात येत आहे. ओळखपत्र नसल्यास मतदान करता येणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

-कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकाचा अहवाल - चर्चासत्र तिसरे

## महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल : सद्यस्थिती व आव्हाने

सुत्र संचालकः विनायक देशपांडे,
कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपुर.
भ्रमणध्वनी: ९८२२७३७७२५
वृत्त संकलकः सुभाष रा. गुर्जर, वरवट-बकाल.
भ्रमणध्वनी: ९७६६१५१९८७

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलः सद्यस्थिती व आव्हाने या विषयावरील एकूण २० संशोधकांनी आपले शोधनिबंधाचे वाचन केले.

१) प्रा. सुभाष गुर्जर यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये संयुक्त महाराष्ट्राची पार्श्वभुमी, प्रादेशिक असमतोल संकल्पना व त्यावरील अध्ययनाचे दृष्टीने विविध समितीचे अहवाल व लेख यांचा मागोवा, महाराष्ट्रातील विभागवार अनुशेष मानव विकासातील विषमता, महाराष्ट्रातील सिंचन क्षेत्रातील अनुशेष व निष्कर्ष यांची मांडणी केली.

२) प्रा. विश्वजीत बिराजदार यांनी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय आर्थिक आढावा घेऊन त्यामध्ये साक्षरता, आरोग्य उर्जा याबाबतीत असमतोल दिसून येतो त्यामुळे मानवविकास निर्देशांक कमी आहे. यावर उपाय म्हणून सेवाक्षेत्रात अनुकूल बदल, जलसिंचन सुविधा, योग्य निधीची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे असे मत मांडले.

३) डॉ. अविनाश निकम यांनी आपल्या निबंधात भारताच्या तुलनेत महाराष्ट्राची आर्थिक स्थिती, प्रतिव्यक्ती उत्पन्नाची तुलनात्मक स्थिती, विविध राज्याची व जिल्ह्याची स्थिती व्यक्त करून विकासाची फळे अर्थव्यवस्थेतील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

४) डॉ.अशोक खाचणे व सुरेश ढाके यांनी आपल्या निबंधामध्ये प्रादेशिक असमतोलाची संकल्पना, असमतोलाची भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक इत्यादी कारणे त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या व महाराष्ट्र सरकारने असमतोल दूर करण्यासाठी हाती घेतलेल्या योजनांची मांडणी केली आहे.

५) प्रा. संगिता नाडकर्णी यांनी आपल्या शोधनिबंधात महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल कमी करणे शक्य आहे. परंतु तो नष्ट करणे अशक्य आहे. त्यांनी विभिन्न क्षेत्रातील असमतोल दर्शवून त्यावर उपाय सुचविले आहेत.

६) प्रा.प्रेमजी आचार्यांनी आपल्या शोध निबंधामध्ये विविध अहवालावर चर्चा करून जनगणना स्त्री, पुरूष, लोकसंख्या त्यांचे प्रमाण दरडोई उत्पन्न इ.बाबत असमतोल स्पष्ट केला.

७) डॉ. धनश्री महाजन यांनी आपल्या आपल्या शोध निबंधामध्ये औद्योगिकीकरणातील असमतोल स्पष्ट करून महाराष्ट्रातील विविध विभागाची स्थिती स्पष्ट करून उद्दिष्टे व निष्कर्ष सांगितले आहेत.

८) प्रा. अभिमन्यु बच्छाव यांनी नैसर्गिक साधन संपत्तीतील विषमता, औद्योगिक विकासातील समस्या, दरडोई उत्पन्नातील विषमता बाबत परिस्थिती स्पष्ट केली.

९) डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी आपल्या निबंधामध्ये महाराष्ट्रातील असमतोलाचे विश्लेषण करून नियोजनाच्या दृष्टीकोनातून विविध समित्या व अहवाल व त्यावरील उपाययोजनांचा आढावा घेतला.

१०) प्रा. सुभाष रणशुर व डॉ. सुभाष पाटील यांनी आपल्या शोधनिबंधात महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील असमतोलाचे विश्लेषण केले आहे.

११) डॉ. वनिता चोरे यांनी आपल्या निबंधामध्ये महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांकद्वारे आरोग्य व पोषणाचे अध्ययन करून आरोग्य व पोषणाचा असंतुलनाशी सबंध व्यक्त केला आहे.

१२) डॉ.विद्या पाटील यांनी शोधनिबंधात मानव विकासाची संकल्पना, त्या संबंधीचे निकष व्यक्त करून असंतुलन दूर करण्यात येणाऱ्या उपाय योजनांचे विश्लेषण केले.

१३) डॉ. विठ्ठल घिनधिने व डॉ. विनोद बागवाले यांनी मानव विकास निर्देशांकाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमतेचे वास्तव स्पष्ट करून त्यावर उपाय योजना सुचविल्या आहेत.

१४) डॉ. लालासाहेब घाटगे आणि कुंभार यांनी मानव विकास निर्देशांकामधील असंतुलन व उपाय योजना स्पष्ट केल्या.

१५) प्रा.बी.डी.इंगळे यांनी मानव विकास निर्देशांक व प्रादेशिक असंतुलन यामध्ये आरोग्य, रोजगार, पिण्याचे पाणी यांची परिणामकारकता स्पष्ट केली.

१६) प्रा. वंदना कटारे यांनी मानव विकास निर्देशांकाच्या आधारे विविध देशांची विभागणी करून त्यामधील सहसंबंध, जिल्ह्याची विभागणी व सहसंबंध स्पष्ट केला.

१७) प्रा. संजय तायडे यांनी महाराष्ट्रातील शेळीपालन व्यवसायातील असमतोलाचे अध्ययन केले आहे.

१८) प्रा. कविता हिरूळकर यांनी असमतोल दूर करण्याकरिता विदर्भातील उद्योगाची अवस्था पर्यटन स्थळ, प्रक्रिया उद्योगाचा विकास करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

१९) डॉ. जीवन सोळंके यांनी विधानसभा मतदार संघाच्या पुनर्रचनेचा प्रादेशिक असमतोलावर होणारा परिणाम स्पष्ट केला.

२०) प्रा.धिरज कदम यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये विदर्भ व मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील असमतोल स्पष्ट करून त्यावर उपाययोजना सुचविल्या आहेत.

या शिवाय डॉ. के. के. पाटील, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. संतोष दास्ताने, डॉ. पठाण, डॉ. मिसाळ, डॉ. माहोरे, डॉ. संजय तुपे, डॉ. मोहन चौधरी, डॉ. राम देशपांडे, प्रा. सुभाष दगडे, डॉ. एस.एन. कुलकर्णी इत्यादी मान्यवरांनी चर्चा सत्रामध्ये भाग घेऊन असमतोलाशी संबंधी सर्व घटकावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन, बारामती

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एकोणचाळीसवे वार्षिक अधिवेशन **बारामती** येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात दि.१९, २० व २१ नोव्हेंबर २०१५** या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. संगमनेर येथील डॉ.सुहास आव्हाड हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, स्थानिक कार्यवाह डॉ.रामभाऊ खाडे (भ्रमणध्वनी:९९२२८९५५४६) हे आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

**१) गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार.**

**२) पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन.**

**३) महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्याची फलश्रुती.**

वरील विषयांचे टिपण सूत्रसंचालकांनी ***अर्थसंवाद*** च्या या अंकामध्ये दिले आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त २००० शब्दात विषय मांडावयाचा असून निबंधासोबत ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंध **Shree-Dev7-2336** या फॉन्टमध्ये **PageMaker 6.5** या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ **14** असावी. MS-Word मध्ये टाईप करू नयेत. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असला पाहिजे. निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रसिध्द केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

दि.५ सप्टेंबर २०१५ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

डॉ. आव्हाड सुहास धोंडिबा,
ज्ञानदीप, गोल्डन सिटी, अकोले बायपास रोड,
संगमनेर-४२२ ६०५, जिल्हा अहमदनगर
भ्रमणध्वनी: ९९२२४३५८७१

- आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन

### निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा: चर्चासत्र पहिले

## गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार

**दि. व्यं. जहागिरदार, अमरावती,**

माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

पार्श्वभूमी: गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील कानलुक या खेड्यात ९ मे १८६६ रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापूरला झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात व पुण्याच्या डेक्कन कॉलेजात झाले. पुण्याच्या तत्कालीन न्यु हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षकांची नोकरी स्वीकारली. पुढे त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयात अर्थशास्त्र, गणित व इतिहास असे विषय शिकवलेत. ते डेक्कन सोसायटीचे सक्रीय सभासद होते. न्यायमूर्ती रानडे यांच्या सहवासात ते १८८७ पासून होते. तसेच गोखले हे रानडेंना आपले गुरू मानीत. महात्मा गांधी गोपाळ कृष्ण गोखले यांना आपले राजकीय गुरू मानीत. गोखले १८८९ पासून काँग्रेसमध्ये सहभागी झालेत व त्यांची राष्ट्रीय पातळीवर ओळख होऊ लागली. १९०५ मध्ये ते राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष झालेत. त्यावेळी पूर्वीच्या अध्यक्षांपेक्षा वयाने सर्वात कमी वयाचे ते अध्यक्ष होते. विविध प्रकारच्या कामांसाठी ते जवळपास सात वेळा इंग्लंडला गेले होते. तेथे त्यांनी आपल्या बुद्धीमत्तेची व वक्तृत्वाची छाप पाडली होती. गोखल्यांच्या जीवनात अशा अनेक घटना घडल्यात की, ज्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाला भरारी प्राप्त झाली व राष्ट्रीय पातळीवर त्यांना लोकप्रियता व मानाचे स्थान प्राप्त झाले. त्यामध्ये दोन प्रमुख घटनांचा उल्लेख केला पाहिजे. पहिली घटना म्हणजे तीन सहकाऱ्यांच्या सहाय्याने त्यांनी १९०५ मध्ये स्थापन केलेली सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी या सोसायटीचे ते पहिले आदर्श भारत सेवक झालेत. दुसरी घटना म्हणजे फिरोजशहा मेहता निवृती झाल्यावर इम्पीरियल लेजिस्लेटीव्ह कौन्सिलवर त्यांची झालेली निवड. सतत दहा वर्षे या कौन्सिलमध्ये त्यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडून आपली मुत्सद्देगिरी व विद्वत्तेची चुणूक दाखविली. या विविध भाषणांद्वारे तसेच कौन्सिलच्या बाहेर अन्यत्र

केलेल्या भाषणांद्वारे आपणास त्यांच्या आर्थिक विचारांचा परिचय होतो.

गोखले ज्या कालखंडात कार्यरत होते त्या काळातील अनेकांचा त्यांच्या विचारसरणीवर प्रभाव पडला होता. दादाभाई नौरोजी, लो. टिळक, न्या. रानडे, रोमेशचंद्र दत्त अशा नेत्यांशी त्यांच्या व्यक्तीगत परिचय होता. गोखले हे नेमस्त वा मवाळ विचारांचे नेते होते. ब्रिटीश राजवटीमधील अनेक सुधारणांना ते अनुकूल होते. भारताला स्वायत्त वसाहतीचा दर्जा मिळावा असे नेमस्त गटाचे मत होते. गोखल्यांनी कौन्सिल मध्ये केलेल्या भाषणांमध्ये सांख्यिकीचा वापर केला होता. ते भरपूर आकडेवारी वापरत. तत्कालीन आर्थिक अभ्यास जी. व्ही. जोशी यांचे कडून आकडेवारीचे विश्लेषण करण्याची कला गोखले यांनी शिकली होती. सतत कार्यमग्न राहणे या वृत्तीमुळे त्यांना खुप दगदग सहन करावी लागे. अखेरीस दमा आणि मधुमेहाच्या विकारामुळे १९ फेब्रुवारी १९१५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या शंभराव्या स्मृतीवर्ष निमित्त त्यांच्या आर्थिक विचारांचे विवेचन व विश्लेषण करण्यासाठी आपल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेने हा विषय ठरविला आहे.

## गोखले यांचे आर्थिक विचार:

मुंबई विधी मंडळ, इम्पिरियल लेजिस्लेटीव्ह ॲसेब्ली, विविध कमिशन्स समोर दिलेल्या साक्षी, देशात व परदेशात दिलेल्या भाषणांद्वारे गोखले यांचे आर्थिक विचार कळतात.

(अ) अंदाजपत्रक आणि वित्तीय प्रशासन हे गोखल्यांचे आवडते विषय. इम्पिरियल विधी मंडळात अंदाजपत्रकावर भाष्य करतांना त्यांनी अंदाजपत्रका संबंधातील अनेक विषय हाताळलेत. शिलकीचे अंदाजपत्रक, वाढता लष्करी खर्च, उत्पन्नापेक्षा कमी खर्च दर्शविल्यामुळे शिक्षण, आरोग्य इ. आवश्यक सेवांवर कमी खर्च करण्याची प्रवृत्ती, देशात काही वर्षे दुष्काळाची स्थिती असूनही शासनाने लावलेले नवे कर इत्यादी बाबींवर त्यांनी टीका केली. रेल्वे विकासासाठी तत्कालीन शासनाने कर्जे घेतलीत आणि या कर्जाची परतफेड एकूण उत्पन्नातून करण्यात येई. गोखले यांचे असे मत पडले की, रेल्वे हा एक व्यवसाय आहे. या व्यवसायातून जे उत्पन्न मिळते त्यातूनच कर्जाची परतफेड करावी. अंदाजपत्रकावरील चर्चा समग्र स्वरूपात न करता खाते निहाय करावी व त्यास खातेनिहाय मंजुरी दिली जावी. खर्चावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता त्यांनी विषद केली. उत्पन्न-खर्चाचे अंकेक्षण करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असण्याची गरज आहे हे त्यांनी प्रतिपादले.

(ब) गोखले यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणा बाबतचा ठराव १९१० मध्ये मांडला होता. तो मंजुर न झाल्याने १९११ मध्ये त्यांनी तो बिलाच्या स्वरूपात सादर केला. या संदर्भात देशात विविध ठिकाणी भाषणेही दिलीत. मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अंमलबजावणीचे प्रारूपही त्यांनी मांडले. शिक्षणावरील खर्चाही भरपाई शिक्षणपट्टी लावून करावी असेही त्यांनी सुचविले. मात्र त्यांनी मांडलेले बिल पारित होऊ शकले नाही. विकासात गोखले यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. विशेष म्हणजे स्त्री शिक्षणाची गरज त्यांनी प्रभावीपणे मांडली होती. त्यांनी १८९७ मध्ये लंडन येथे हिंदुस्थानात स्त्री शिक्षणाची किती गरज आहे यावर भाषण दिले होते. स्त्री शिक्षण हे देश कल्याणाचे

बहुमोल साधन असल्याचे त्यांनी प्रतिपादले. विविध प्रांतांमधील स्त्री शिक्षणाची आकडेवारी त्यांनी सादर केली.

(क) उद्योगांच्या विकासासाठी संरक्षण देण्याचे त्यांनी समर्थन केलेले. बाल उद्योगांना अशा संरक्षणाची किती गरज असते हे त्यांनी पटवून दिले. पण असे संरक्षण नेहमीसाठी फलदायी ठरणार नाही असाही इशारा त्यांनी दिला.

(ड) शेती हा अर्थव्यवस्थेचा पाया आहे. शेतकऱ्यांना सहजपणे तसेच सुलभपणे कर्ज प्राप्त झाले पाहिजे हे सांगतांना त्यांनी सिंचन सोयींमध्ये वाढ करण्याची आवश्यकता स्पष्ट केली.

(इ) केंद्र सरकार विविध करांच्या रूपाने जे उत्पन्न प्राप्त करते त्या कर उत्पन्नाचे प्रांतिक सरकार व स्थानिक संस्थांमध्ये समप्रमाणात वाटप झाले पाहिजे असे सांगून गोखले यांनी स्थानिक संस्थांच्या कमकुवत आर्थिक स्थितीकडे लक्ष वेधले. या संदर्भात त्यांनी केंद्रापासून स्थानिक संस्था पातळीपर्यंत सत्तेच्या विकेंद्रीकरणाची आवश्यकता प्रतिपादली आहे.

(फ) गोखलेंना मुक्त व्यापाराचे धोरण तत्वतः मान्य असले तरी व्यापार विषयक धोरण देशाच्या आर्थिक सामाजिक स्थितीशी सुसंगत असले पाहिजे असे त्यांचे मत होते. आपल्या अर्थव्यवस्थेत मुक्त व्यापार धोरण स्वीकार्य ठरू शकत नाही असा त्यांचा विश्वास होता.

(ग) १) १९ व्या शतकातील अर्थतज्ञांनी निःसारण सिद्धान्त (Drain Theory) मांडला होता. गोखलेंनी देखील या बाबत विवेचन करतांना राजकीय निःसरण आणि औद्योगिक निःसारण असा फरक केला होता.

२) औद्योगिक मागासलेपणाची आणि स्थिरावस्थेची कारणे सांगून त्यांनी भारतात औद्योगिक आणि तांत्रिक शिक्षणाच्या सोईमध्ये वाढ करण्याची गरज स्पष्ट केली. जपान देशाने या बाबत केलेली प्रगती आदर्श व अनुकरणीय आहे हे सांगून गोखले यांनी देशप्रेम आणि शिस्त यासारख्या गुणांचा अंगीकार करण्यावर या संदर्भात भर दिला आहे.

३) गोखले यांनी पिण्याचे पाणी आणि सांड पाण्याची सोय यांची योग्य व्यवस्था निर्माण करण्यावर भर दिला होता. समाजात आरोग्य विषयक स्वच्छतेची गरज त्याद्वारे त्यांनी अधोरेखित केली.

४) मद्यपानात होत असलेल्या वाढत्या प्रवृत्तीवर त्यांनी चिंता व्यक्त केली असून समाजातील निम्न पातळीवरील वर्गावर त्याचे दुष्परिणाम दिसत असल्याचे त्यांनी नमूद केले आहेत.

५) भारतातील खेड्यांमधून अनेक श्रमिक मालकांशी करारनामा करून मळे (Plantations) उद्योगात रोजगारासाठी जातात. त्यासाठी देशात किंवा विदेशातही ते जात असतात. या श्रमिकांना करारनामा श्रमिक (Inadventured Labourer) म्हटले जाई. त्यांना हलाखीच्या परिस्थितीत आणि अल्प वेतनावर काम करावे लागत असे. अशा प्रकारच्या व्यवस्थेची गोखले यांनी निर्भत्सना केली आहे.

६) निर्माणीमध्ये (Factories) काम करणाऱ्या बाल श्रमिकांच्या स्थितीबाबत गोखले यांनी चिंता व्यक्त केली असून त्यांची स्थिती सुधारली पाहिजे हे सांगतांना त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी मालक वर्गाने घ्यावे असे ते म्हणतात.

७) जंगलात राहणाऱ्या रहिवाशांच्या स्थितीची त्यांना काळजी वाटे. वेल्बी कमिशनपुढे दिलेल्या

साक्षीत त्यांनी जंगल विषयक नियमांमधील उणीवा दर्शविल्यात.

गोखल्यांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन करतांना १९ व्या शतकातील आर्थिक, सामाजिक स्थिती व विविध नेत्यांबद्दल चरित्रात्मक माहिती असावी लागते. गोपाळ कृष्ण गोखले यांच्यावर विविध पुस्तक व लेख उपलब्ध आहेत. प्रा. न.र. फाटक यांचे गोपाळ कृष्ण गोखलेंवर लिहिलेले चरित्र अत्यंत लोकप्रिय आहे. आर. पी. परांजपे यांचे Gopal Krishna Gokhale, बी.डी. माथुरांचे Gokhale, A political biography आणि कुंझर, पर्वते व देवगिरीकरांनी गोखलेंवर पुस्तके लिहिली आहेत.

भारतीय अभ्यासकांनी इंग्रजी, हिंदी व मराठीत जी History of Economic Thought वर पुस्तके लिहलीत त्यात भारतीय आर्थिक विचारावंतांमध्ये गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या आर्थिक विचारावर स्पष्टीकरण दिले आहे. बी. एन. गांगुली यांनी Indian Economic Thought (१९७७) हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात गोखलेंवर स्वतंत्र प्रकरण आहे. डी. जी. कर्वे आणि डी. व्ही. अंबेकर यांनी संपादीत केलेले Speeches and Writings of Gopal Krishana Gokhale, Vol. I & II अनेक जुन्या महाविद्यालयांच्या ग्रंथालयात उपलब्ध असते.

## शोधनिबंधाचे अपेक्षित स्वरूप :

गोखल्यांच्या आर्थिक विचारांचा उल्लेख संक्षेपाने केला आहे. त्यातील एखाद्या विषयावर स्वतंत्रपणे लेख लिहता येईल. एखादा विषय निश्चित करून गोखल्यांच्या काही विचारांचे वर्तमान संदर्भातही विश्लेषणात्मक लिखाण करता येईल. उदा.विविध कर, शासनाच्या अंदाजपत्रकाच्या बाबत खर्च नियंत्रण, केंद्र सरकारच्या कर उत्पन्नाचे राज्याराज्यातील वाटप, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण इ.

गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या विविध आर्थिक विवेवचनाचा प्रकाशझोत हा देशाच्या विकास व कल्याणावर होता. या दृष्टीने त्यांच्या विविध विषयांचा एकत्रित परामर्ष घेता येईल.

१९ व्या शतकात दादाभाई नौरोजी, रानडे, रोमेशचंद्र दत्त आणि गोखले या चार अर्थतज्ञांनी विविध विषयांवर जे लिखाण केले वा मत प्रदर्शित केले ते लक्षात घेऊन गोखल्यांच्या विचारांची तुलना रानडेंच्या विचारांशी किंवा दादाभाईंच्या विचारांशी करता येईल. रानडे व गोखल्यांची मुक्त व्यापाराच्या बाबत जे विवेचन केले ते अभ्यासून ही तुलना करता येईल. तसेच निःसारण सिद्धान्ताबाबत गोखले व दादाभाई नौरोजींच्या विचारातील साम्य-भेद स्पष्ट करता येईल. १९ व्या शतकातील भारतीय अर्थतज्ञांमध्ये गोखले यांचे काय स्थान आहे याचीही विश्लेषणात्मक चर्चा अभिप्रेत आहे. २० व्या शतकात भारतीय अर्थतज्ञांनी भारताच्या आर्थिक प्रश्नांवर जे विस्तृत विवेचन केले त्याची मुळे गोखले-रानडे यांच्या विचारांमध्ये आहेत का ? याचाही शोध घेतला जाऊ शकतो. गोखल्यांच्या आर्थिक विचारांवर विवेचन करतांना लेखकांना ज्या विषयावर लिहायचे आहे. त्याचे अनुषंगाने निबंधाला शीर्षक देण्यात यावे. सुचविलेल्या विषयांव्यतिरिक्त अन्य विषय ही विचारात घेऊन शोध निबंध लेखक लिहू शकतात. केवळ सोईसाठी अपेक्षित स्वरूप स्पष्ट केले आहे.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन

### निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा: चर्चासत्र दुसरे

## पं. जवाहरलाल नेहरू व भारतीय आर्थिक नियोजन

**ज. फा. पाटील, कोल्हापूर,**
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

### शोधनिबंधासाठी चर्चेचे संभाव्य मुद्दे

- पं. नेहरूंचे शिक्षण, विद्यापीठीय संस्कार, इंग्लंडमधील संस्कार, हरॉल्ड लास्कींचा व तत्कालीन समाजवादी विचाराचा प्रभाव.
- पं. नेहरूंवर रशिया भेट व रशियन आर्थिक नियोजनाचा प्रभाव.
- पं. नेहरूंचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या आर्थिक धोरणांवर प्रभाव व त्या संबंधीचे - आर्थिक धोरणाबद्दलचे काँग्रेस ठरावांचा आढावा - योजना समितीचे गठण.
- पं. नेहरूंचे योजना समितीचे अध्यक्ष म्हणून स्वातंत्र्यपूर्व कार्य.
- पंतप्रधान म्हणून घटनेत तरतूद नसलेल्या, योजना आयोगाच्या स्थापनेसंबंधीचा घटनाक्रम, त्यासंबंधी उपलब्ध प्रशासकीय कागदपत्र, धोरण, दृष्टीकोन यांचा चिकित्सक आढावा.
- पं. नेहरू व देशातील प्रमुख अर्थशास्त्रज्ञ डॉ. गाडगीळ, डॉ. एम.एन. दातवाला, डॉ. लकडावाला, सी.डी. देशमुख व इतर यांच्यातील वैचारिक विनिमय.
- योजना आयोगाच्या प्राथमिक / प्रारंभिक रचनेचे स्वरूप व तार्किक समर्थन.
- पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यासंबंधी चिकित्सा. मुख्य संदर्भ पं.नेहरूंच्या प्रभावाचा असावा. या योजनेचे प्रारूप, महालनोबीस दृष्टीकोन व त्यांच्यावरील हॅरोड-डोमर प्रारूपाचा प्रभाव.
- म. गांधी, पं. नेहरू व भारतीय नियोजन.
- दुसरी पंचवार्षिक योजना, पं. नेहरूंचा बदलता दृष्टीकोन, औद्योगिक धोरण १९५६, कॅल्डॉर सुधारणा, ग्रामीण पतपुरवठा अहवाल.
- तिसऱ्या योजनेचा समन्वय दृष्टीकोन व त्यावर पं. नेहरूंचा प्रभाव.
- नेहरूकालीन पंचवार्षिक नियोजन व पायाभूत सुविधा.

- नेहरूकालीन तीन पंचवार्षिक योजनाच्या धोरणांचा उद्दिष्टांचा दृष्टीकोनांचा तुलनात्मक अभ्यास.
- नेहरूकालीन तीन पंचवार्षिक योजनांच्या खर्च रचनेचा तुलनात्मक अभ्यास.
- नेहरूकालीन तीन पंचवार्षिक योजनांच्या साधनसामग्री उभारणीचा तुलनात्मक अभ्यास.
- नेहरूकालीन आर्थिक नियोजनातील - उद्दिष्टचे, गुंतवणूक, औद्योगिक, स्थानिकीकरण धोरण, कर धोरण, कर्ज धोरण, व्यापार धोरण, तंत्र निवड व त्यासाठी वापरली जाणारी साधने किंवा प्रक्रिया व एकूण व्युहरचना.
- नेहरूकालीन आर्थिक नियोजन व संघ राज्यीय व्यवस्था.
- योजना - कार्यक्रम मुल्यमापन व्यवस्थेचे कार्य - आढावा.
- नेहरूंच्या नियोजनासंबंधीच्या संसदेतील भाषणांचा चिकित्सक आढावा.
- नेहरूंच्या योजनांसंबंधी धोरण व कार्यक्रमावर झालेल्या
  - राजकीय टीकेचा आढावा.
  - अर्थशास्त्रीय टीकेचा आढावा.
- नेहरूकालीन आर्थिक नियोजनाचे
  - पाश्चात्य तज्ञांनी केलेले मुल्यमापन
  - देशी तज्ञांनी केलेले मुल्यमापन
- नेहरू (पंतप्रधान कार्यालय) अर्थमंत्री व नियोजनमंत्री यांच्यातील परस्पर संबंध व इतर खाती उद्योग, व्यापार, शेती, श्रम यांचा संबंध.
- नेहरूकालीन आर्थिक नियोजनाच्या काळातील
  - भांडवल - उत्पादन गुणोत्तर
  - गुंतवणूक रोजगार गुणोत्तर
  - तुटीचा अर्थकारण
  - वृद्धीदर
  - रोजगार निर्मिती
  - प्रादेशिक समतोल व

  तत्सम निकषावर चिकित्सक मुल्यमापन.
- पं. नेहरू व आर्थिक नियोजन - एक सैद्धांतिक विश्लेषण / तत्त्वज्ञानात्मक या संदर्भात संदर्भ साहित्य म्हणून
- संसदीय कागदपत्रे - विशेषतः अंदाज समिती, सार्वजनिक लेखा समिती व संस्थेतील कामकाजाचे अहवाल. योजना मसुदे
- योजना आयोगाचे - कागदपत्रे पंचवार्षिक योजनांचे दृष्टीकोन, विशेषतः विविध अभ्यासगृहांचे अहवाल.
- काँग्रेस पक्षाच्या योजना समितीने तयार केलेले क्षेत्रीय अहवाल.
- अलक घोष - यांचे भारतीय अर्थव्यवस्थेवरचे क्रमिक पुस्तक.
- व्ही.के.आर.व्ही.राव यांचे लेखन.
- डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे लेखन.
- देशातील तत्कालीन डाव्या राजकीय नेते व तज्ञांची भुमिका.
- जे.एल.हॅन्सन यांचा भारतीय नियोजनावरचा ग्रंथ.
- गुन्नर मिर्डाल यांच्या 'रशियन ड्रामा' या ग्रंथातील विश्लेषण.
- काँग्रेस पक्षाच्या वार्षिक अधिवेशनांचे अहवाल यांचा वापर करता येईल.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन

## निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा: चर्चासत्र तिसरे

# महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्यांची फलश्रुती

**धनश्री महाजन, औरंगाबाद,**
प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ.

पितृसत्ताक समाजव्यवस्था आणि त्या अनुषंगाने तयार केलेल्या कायद्यांमुळे तसेच रीतीरिवाजांमुळे पुरूषांच्या तुलनेत महिलांना वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक निर्णय घेण्याबाबत कमी अधिकार मिळतात. कुटुंबात दुय्यम स्थान मिळाल्याने महिलांना समाजातही आपोआपच दुय्यम स्थान मिळते. त्यातून महिलांसमोर अनेक समस्या उभ्या राहतात. या विविध समस्यांचे वर्गीकरण नकार, वंचना आणि हिंसाचार या तीन प्रकारात करता येईल असे मत लीना मेहेंदळे यांनी मांडले आहे.

महिला सबलीकरणाची संकल्पना पहिल्यांदा १९८५ मध्ये नैरोबी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय महिला परिषदेमध्ये मांडण्यात आली. या परिषदेने 'सामाजिक सत्तेचे आणि साधन संपत्तीचे महिलांना अनुकूल पुर्नवाटप करण्याची प्रक्रिया म्हणजे महिला सबलीकरण होय' अशी व्याख्या केली.

संयुक्त राष्ट्र संघाने महिला सबलीकरणाचे पाच घटक मांडले आहेत.

(१) आत्म-सन्मानाची जोपासना.
(२) विकल्पांच्या उपलब्धतेचा आणि त्यांच्या निवडीचा अधिकार.
(३) संधी आणि साधनसंपत्ती प्राप्त करण्याचा अधिकार.
(४) स्वतःच्या जीवनाबद्दल निर्णय घेण्याचा आणि नियंत्रणाचा अधिकार.
(५) अधिक न्याय सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने सामाजिक बदलाची दिशा प्रभावित करण्याची क्षमता मिळविणे.

महिला सबलीकरणात केवळ अर्थार्जन आणि दीर्घायुष्यच अभिप्रेत नसून त्या बरोबरच महिलांना आपल्या क्षमतांची, अधिकारांची, स्वायत्ततेची जाणीव होणे अपेक्षित आहे. अशी जाणीव होत असतांना महिलांना विकल्प उपलब्ध असणे आणि साधनसंपत्ती प्राप्त करण्याचे अधिकारही मिळवून देण्याची व्यवस्था स्थापित करणे यातून सबलीकरण प्रक्रिया गतीमान होऊन महिलांमध्ये सामाजिक बदलांची दिशा प्रभावित करण्याची क्षमता येऊ शकते.

### महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण :

संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित केले. संयुक्त राष्ट्र संघाच्या या घोषणेचे औचित्य साधून त्याच वर्षी महाराष्ट्र शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाच्या माध्यमातून राज्य शासनाने महिलांना प्रशिक्षित करून रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. महिला सबलीकरणाच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने टाकलेले हे पहिले मोठे पाऊल होय.

महिलांसाठीच्या योजनांचा दुसरा महत्त्वाचा टप्पा म्हणजे महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये जाहीर केलेले पहिले महिला धोरण होय. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने २००१ मध्ये आपले दुसरे महिला धोरण जाहीर केले. या दोन्ही धोरणांमध्ये महिलांवरील अत्याचारांना आळा घालणे, त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी मदत करणे, स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून महिला सक्षमीकरण घडवून आणणे, बचत गट तयार करणे, महिलांच्या हक्कांबाबत जनजागृती आणि महिला विषयक कायद्यात सुधारणा घडविणे यावर भर होता.

यानंतर २०१३ मध्ये राज्य शासनाचे तिसरे महिला धोरण जाहीर झाले. या नव्या धोरणाची उद्दिष्टे https:// womenchild. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पाहता येतील.

### महिला सबलीकरणाचे निर्देशक :

सुनीता किशोर आणि कमला गुप्त यांनी २००४ मध्ये इकोनॉमिक अ‍ॅण्ड पॉलिटिकल वीकली मध्ये "Women's Empomerment in India and its States" या शीर्षकाचा शोधनिबंध प्रकाशित केला. हा शोधनिबंध नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे-२ वर आधारित होता. या शोधनिबंधात महिला सबीकरणाचे निर्देशक वापरण्यात आले. निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी त्यातील काही निर्देशक उदाहरणार्थ देत आहे.

अ) सबलीकरणाचा पुरावा दर्शविणारे निर्देशक :

१. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत महिला सहभाग
२. लिंगभाव समन्यायाबाबत (Gender Equity) महिलांचा दृष्टीकोन (उदा. स्त्री-पुरूषांची कुटुंबातील भूमिका काय असावी याबाबतचे मत)

वरील निर्देशकांतून महिलांचे त्यांच्या सभोवतालच्या स्थितीवर कितपत नियंत्रण आहे हे आजमावता येऊ शकते.

ब) सबलीकरणाच्या मुख्य स्त्रोतांच्या उपलब्धतेचे निर्देशक :

१. शिक्षणाच्या संधीची उपलब्धता.
२. माध्यमांची उपलब्धता (वृत्तपत्र, दूरचित्रवाणी इ.)
३. रोजगाराच्या संधीची उपलब्धता (विशेषतः अपारंपारिक व्यवसायातील संधी)

क) महिलांच्या जीवन स्थितीचे निर्देशक :

१. (पहिल्या) विवाहाच्या वेळचे वय.
२. पती-पत्नीच्या वयातील अंतर
३. हिंसाचाराचा अनुभव.

लेखकांना पुढील विषयांचा विचार करता येईल.

१. महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणांचा आढावा घेता येईल.
२. विशिष्ट योजनेची निवड करून तिच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने तिचे मुल्यमापन करता येईल.
३. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेपासून ते आत्तापर्यंतच्या कामगिरीचे मूल्यमापन करता येईल.
४. संयुक्त राष्ट्र संघाने मांडलेल्या महिला सबलीकरणाच्या पाच घटकांच्या संदर्भात नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे च्या आकडेवारीच्या मदतीने महाराष्ट्र शासनाच्या १९९४ च्या किंवा २००१ च्या महिला धोरणाच्या फलश्रुतीचा अभ्यास करता येईल. (महाराष्ट्रासाठीची आकडेवारी १९९८-९९ आणि २००५-०६ च्या NFHS सर्व्हेमध्ये संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)
५. विशिष्ट महिला बचत गटांच्या कार्याचा आणि त्यातून होत असेल्या महिला सबलीकरणाचा प्रश्नावली सर्वेक्षणाद्वारे अभ्यास करता येईल. लेखकांकरिता पुढील संदर्भ उपयुक्त ठरतील.


१) Datar Chhaya (2003) *Status of Women in Maharashtra an update*, unit for women's studies, Tata Institute of Social Science, Mumbai.

२) Mehendale Leena (2000), *National Comission for Women - An Appraisal*, Yojana, Vol 44, November 2000, P-22

3) Bhat S, Kulkarni S (2010), *Issues and concerns of Dererted Women in Maharashtra*, Economic and Political Weekly, Vol XLV, No. 38

4) Kishor Sunita, Gupta Kamala (2004) *Women Empomerment in India and its States : Evidence from the NFHS*, Economic and Polictical Weekely, Feb. 14, 2014 P.P. 695 - 696.

५) YASHADA (2012) *Maharashtra Human Development Report 2012, Tenards Indusive Human Development*, Pune

६) साखरे सीमा (२००४) *स्त्रीयांच्या न्यायाचा प्रश्न*, सीमा प्रकाशन, नागपूर

७) https://womenchild. mahahrashtra. gov.in www.un.org www.pchiips.org/nfhs/factsheet.shtml

## अर्थसंवाद चे लेखक व्हा

### ऑक्टोबर-डिसेंबर २०१५ अंकासाठी लेख पाठवा

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठविणे अत्यावश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अ‍ॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- **संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे:** कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ३८ वे वार्षिक अधिवेशन: २०१४-१५

### कार्यवाहांचा अहवाल

आर. बी. भांडवलकर
कार्यवाह - खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर ते रविवार दि. ९ नोव्हेंबर २०१४ या तीन दिवसांच्या कालावधीत श्री. शिवाजी महविद्यालय, अकोला येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. प्रा.डॉ. श्रीराम जोशी, जळगाव (खान्देश) हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

**अधिवेशन उद्‌घाटन सोहळा:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३८ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्‌घाटन शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर २०१४ रोजी डॉ. भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख आणि संत गाडगेबाबा यांचे प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाले. त्यानंतर स्वागतगीत सादर करण्यात आले. उद्‌घाटन सोहळ्याचे अध्यक्ष अॅड. अरूणभाऊ शेळके, परिषदेचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी, संस्थेचे उपाध्यक्ष महादेवराव भुईभार, अकोल्याच्या महापौर सौ. उज्वलाताई देशमुख, उद्‌घाटक खा. संजयजी धोत्रे, परिषदेचे माजी अध्यक्ष प्राचार्य जे.एस. पाटील, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह-खजिनदार डॉ. आर. बी. भांडवलकर, अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम, प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे, स्थानिक कार्यवाह डॉ. रामेश्वर भिसे, डॉ. मिलींद कुलट, डॉ. आर. के. शेख उपस्थित होते. त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. स्थानिक कार्यवाह डॉ. रामेश्वर भिसे यांनी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि अधिवेशन आयोजनामागील भुमिका प्रास्ताविकातून विशद केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आणि कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर उद्‌घाटक खा. संजयजी धोत्रे आणि महापौर उज्वलाताई देशमुख यांचा सामाजिक कार्याबद्दल तसेच डॉ. के. के. पाटील यांचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल

यथोचित सत्कार करण्यात आला. अधिवेशनानिमित्त प्रकाशित 'अर्थक्रांती' या स्मरणिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन सोहळ्यात डॉ. आर. के. शेख लिखित 'बालकामगार समस्या व समाधान', डॉ.मधुकर शिंदे यांच्या 'स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र' या पुस्तकाचे आणि अर्थशास्त्र विभागातर्फे 'जागो ग्राहक जागो' या पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

परिषदेच्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन अकोल्याचे लोकप्रिय खासदार मा.संजयजी धोत्रे यांचे हस्ते झाले. या प्रसंगी आजच्या मानवी जीवनाला अर्थाशिवाय महत्व नाही. परंतु राजकारणामध्ये व समाजात बॅक फुटवर असणाऱ्या ठेकेदार, बिल्डर यांचा अंतर्भाव वाढला आहे. तर दुसरीकडे समन्वयाच्या अभावामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. बाजार व्यवस्थेमध्ये होणाऱ्या लुटीविरूद्ध ग्राहक जागृती मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. तसेच सर्वात मोठे अर्थकारण हे राजकारणात आले आहे. ते बंद झाल्या शिवाय हे राष्ट्र टिकू शकणार नाही असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले यांनी परिषदेच्या स्थापने मागील उद्देश आणि पार्श्वभूमी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ. आर. बी. भांडवलकर यांनी परिषदेच्या विविध उपक्रमाची माहिती आणि परिषदेच्या कार्याचा अहवाल सादर केला.

अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी, जळगाव यांचे 'भारतातील आर्थिक विषमता आणि दारिद्र्य राज्यस्तरीय विश्लेषण' या विषयावर अभ्यासपुर्ण भाषण झाले. त्यांनी आर्थिक विषमता हा केवळ व्यासपीठावर चर्चा करण्याचा विषय नाही. हा विषय प्रत्येक व्यक्तीशी संबंधित आहे. आर्थिक विषमता मोजण्याचे कारण नियोजनकर्त्यांना मार्गदर्शन करणे हे असते. परंतु विषमता कशी मोजायची या बाबत एकमत नाही हे सांगतांना जागतिक व आशियाई देशातील विषमता, गिनी सहगुणक पद्धतीने व्यक्त करून भारतातील आर्थिक वृद्धीदर, विषमता व दारिद्र्य यांचा संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्थिक सुधारणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळाली हे मान्य करावेच लागेल कारण या काळात सेवा क्षेत्रात झालेल्या वेगवान वृद्धीमुळे हे शक्य झाल्याचे स्पष्ट होते. तसेच सुधारणांची प्रक्रिया राज्याराज्यातील विषमता कमी करण्यास उपयुक्त ठरली आहे. परंतु आर्थिक वृद्धीचा विषमतेवर परिणाम होतो की विषमतेचा आर्थिक वृद्धीवर परिणाम होतो या बाबत शंका निर्माण होते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमुळे आणि शासकीय धोरणामुळे काही प्रमाणात दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली आहे. शेवटी वृद्धीदरातील बदल दारिद्र्य यात विरोधाभासात्मक चित्र दिसून येत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष ॲड. अरूणभाऊ शेळके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शेती, शेतीउद्योग आणि शेतकरी यांचे जीवन धोक्यात आणणारी आजची व्यवस्था राजकीय अर्थव्यवस्था होय. संस्कृतीचा विकास हा शेतीतून झाला असून हे करणाऱ्या शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच परिषदेने

अशा अधिवेशनाच्या माध्यमातून शेती वाचवा, शेतकरी वाचवा पर्यायाने देश वाचवा याच दृष्टीने अध्ययन करावे अशी अपेक्षा आहे. उद्घाटन सोहळ्याचे संचालन प्रा. जया काळे आणि आभार प्रदर्शन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. के. शेख यांनी केले.

**चर्चासत्रे:**

अधिवेशन कालावधीत दरवर्षीप्रमाणे एकूण चार चर्चासत्रे संपन्न झाली. शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर २०१४ रोजी भोजनावकाशानंतर दुपारी वास्तवक्षेत्र व मौद्रिकक्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैद्धांतिक विवेचन या विषयावरील पहिल्या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. दि. व्यं. जहागिरदार, अमरावती आणि वृत्तसंकलन प्रा. अरूण पिसे, धुळे यांनी यशस्वीरित्या केले. शनिवार दिनांक ८ नोव्हेंबर २०१४ रोजी जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल आणि महाराष्ट्रातील असमतोल, सद्य:स्थिती आणि आव्हाने या दोन समांतर (दुसऱ्या व तिसऱ्या) चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. व्ही.बी. भिसे, औरंगाबाद आणि डॉ. विनायक देशपांडे, नागपूर तसेच वृत्तसंकलन डॉ. राजेंद्र रसाळ व प्रा. सुभाष गुर्जर यांनी केले. रविवार दिनांक ९ नोव्हेंबर २०१४ रोजी सकाळच्या चवथ्या सत्रामध्ये दुष्काळ, कारणे व उपाय या ऐनवेळच्या विषयावर चर्चासत्र संपन्न झाले. प्रमुख वक्ते डॉ. एस.टी. सांगळे, औरंगाबाद यांनी दुष्काळाची भयावह स्थितीबाबत विवेचन केले. दुष्काळाचे समाजावर आणि अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा परामर्श घेतला. दुष्काळाची मीमांसा करतांना त्यांची कारणे याची सविस्तर उदाहरणासह त्याकरिता करावयाच्या उपाययोजना बाबत मत व्यक्त केले. त्यांनी सरकार व समाज यांच्या जबाबदारीची सुद्धा चर्चा केली. सदर चर्चा सत्राचे सूत्रसंचालक डॉ. अनिल पडोशी व वृत्तसंकलन डॉ. संतोष कुटे यांनी केले.

**प्रा. नी. वी. सोवनी स्मृती व्याख्यान:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वी. सोवनी स्मृती व्याख्यान हा एक नाविण्यपूर्ण उपक्रम सन २०१० च्या बदलापूर येथील ३४ व्या वार्षिक अधिवेशनापासून सुरू केलेला आहे. सदर व्याख्यान करीता सदस्यांनी दिलेल्या आर्थिक योगदानातून अंदाजे एक लाख रूपयापर्यंतचा निधी निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ज्ञ आणि दुसऱ्या जलसिंचन आयोगाचे अध्यक्ष डॉ. माधवराव चितळे यांनी नागरीकरण का व कसे? या विषयावर पाचवे पुष्प गुंफले. जगाच्या व मानवाच्या कल्याणाचे दृष्टीने नागरीकरण आणि त्याचा दर्जा हा एक मापदंड आहे. नागरीकरणाची गती ही चिंता निर्माण करणारी आहे. नागरीकरणात जीवन सुखमय व्हावे अशी अपेक्षा असते, लोकसंख्येची घनता दारिद्र्याचे कारण नाही इतरही कारणे आहेत, आज पर्यटनाकडे आंतरराष्ट्रीय सामाजिक व आर्थिक शास्त्र म्हणून पाहिल्या जात नाही हा चिंतेचा विषय आहे. तसेच नागरीकरणाच्या उणिवा का निर्माण झाल्या याचे अध्ययन केले जात नाही. भारताला नागरीकरणाची प्राचीन आणि प्रदीर्घ परंपरा आहे. नागरीव्यवस्थेचे पर्यावरणीय आघात महत्वाचा अभ्यास विषय आहे. नागरीकरणाकडे एकाच शास्त्राच्या माध्यमातून न पाहता सर्व शास्त्राच्या दृष्टीने अभ्यास करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या व्याख्यानाचे प्रास्ताविक डॉ.

आर. बी. भांडवलकर यांनी करून प्रा. नी. वी. सोवनी स्मृती व्याख्यान आयोजना मागील भूमिका विशद केली. प्रा. नी.वी.सोवनी व्याख्यानाचे वेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे, सुप्रसिद्ध कवी डॉ. विठ्ठल वाघ, महादेवराव भुईभार व डॉ. अविनाश निकम उपस्थित होते. अध्यक्षीय भाषण डॉ. श्रीराम जोशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अविनाश निकम यांनी केले. संचालन डॉ. मंजुषा मुसमाडे, पुणे यांनी केले.

**वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा):**

शनिवार दिनांक ८ नोव्हेंबर २०१४ रोजी सायंकाळी ६:०० वाजता डॉ. श्रीराम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाली. सभेच्या सुरूवातीला माजी अध्यक्ष डॉ. आनंद नाडकर्णी आणि ज्ञात-अज्ञात दिवंगत आजीव सदस्य यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेतील काही महत्वाचे निर्णय पुढील प्रमाणे आहेत.

ऑक्टोंबर / नोव्हेंबर २०१५ मध्ये होणाऱ्या ३९ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानस्पद स्वीकारण्यासाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती जि. पुणे येथील एकच निमंत्रण प्राप्त झाल्यामुळे आणि कार्यकारी मंडळाच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांचे निमंत्रण एकमताने स्वीकारले. ३९ व्या वार्षिक अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

१) गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार.

२) पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन.

३) महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्याची फलश्रृती.

**निवडणुका:**

३९ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी डॉ. सुहास आव्हाड, संगमनेर, जि. नाशिक यांची बहुमताने निवड झाली. विश्वस्त प्राचार्य डॉ. जगदाळे सुर्यकांत हरिचंद्र यांची मुदत दि. ३१-३-२०१५ रोजी पूर्ण होत असल्यामुळे आणि कार्यकारी मंडळाने डॉ. व्ही. बी. भिसे यांच्या नावाची शिफारस सर्वसाधारण सभेस केल्यामुळे सन २०१५-१८ या तीन वर्षासाठी डॉ. व्ही. बी. भिसे, औरंगाबाद यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली. सन २०१५-१८ या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळावर प्राचार्य डॉ. संजय धनवटे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपुर विद्यापीठ नागपुर, डॉ. तुकाराम मुंडे स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ, नांदेड, डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची निवड झाली. सत्र २०१५-१८ या तीन वर्षासाठी कार्याध्यक्ष पदाकरीता प्रा. चारूदत्त गोखले यांची बहुमताने निवड झाली.

**डॉ. श्री. आ. देशपांडे स्मृती जीवनगौरव पुरस्कार :**

परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ हा पुरस्कार सन २०१२ पासून सुरू करण्यात आला. शुक्रवार दिनांक ८ नोव्हेंबर २०१४ रोजी सायंकाळी पुरस्कार वितरण सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे

अध्यक्षस्थानी डॉ. अनिल पडोशी होते. पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रास्ताविक डॉ. आर. बी. भांडवलकर, कार्यवाह-खजिनदार यांनी केले. डॉ. श्री. आ. देशपांडे यांच्या जीवन कार्याबाबत डॉ. आर. वाय. माहोरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. श्री. आ. देशपांडे स्मृती जीवन गौरव पुरस्काराचे तिसरे मानकरी सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांचा परिचय डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार, अमरावती आणि डॉ. ज. फा. पाटील, कोल्हापूर यांनी प्रभावीपणे करून दिला. डॉ. विनायक देशपांडे, नागपूर यांनी मानपत्राचे वाचन केले. यानंतर डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, मानपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पहार व गुच्छ सन्मानपुर्वक प्रदान करून यथोचित सत्कार डॉ. अनिल पडोशी, ठाणे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर सत्कारमुर्ती डॉ. श्रीनिवास खांदेवाले, नागपुर यांनी अकोला शहरातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. अकोला जन्म जिल्हा असल्यामुळे हा पुरस्कार स्वीकारतांना अत्यंत आनंद होत आहे. त्यांनी मार्क्सवादाचे महत्व सांगतांना समाजवादाच्या चळवळीबाबत मनोगत व्यक्त केले. जगामध्ये कोणकोणत्या पद्धतीने मार्क्सवाद मांडला गेला याचा अभ्यास केला पाहिजे. आपण अध्ययन संपन्न व्हावे म्हणजेच अध्यापन संपन्न होईल असा मार्मिक सल्ला सुद्धा त्यांनी या प्रसंगी दिला. कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप डॉ. अनिल पडोशी यांनी केला. परिषदेचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. विनायक देशपांडे, नागपुर, डॉ. अविनाश निकम, संपादक अर्थसंवाद उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. युगंधरा देशपांडे (टोपरे) यांनी केले तर आभार डॉ. अविनाश निकम यांनी मानले.

**समारोप सोहळा:**

रविवार दिनांक ९ नोव्हेंबर २०१४ रोजी सकाळी ११:३० वाजता समारोप सोहळ्यास प्रारंभ झाला. प्रमुख अतिथी आमदार रणधीर सावरकर होते. व्यासपीठावर डॉ. विनायक देशपांडे, कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, मा. महादेवराव भुईभार, प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे, परिषदेचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी, नवनियुक्त अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह-खजिनदार डॉ. आर. बी. भांडवलकर, डॉ. रामेश्वर भिसे सर्व कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रामेश्वर भिसे यांनी केले. परिषदेच्या आणि महाविद्यालयाच्या तीन दिवसीय आयोजनाचा आढावा डॉ. संगिता टक्कामोरे, रामटेक आणि डॉ. मंजुषा मुसमाडे, पुणे यांनी प्रतिनिधींच्या वतीने मनोगत व्यक्त करून घेतला.

प्रमुख अतिथी डॉ. विनायक देशपांडे, कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी अर्थशास्त्र हा विषय अतिशय क्लिष्ट असल्याने अनेक विद्यार्थी त्याकडे पाठ फिरवतात. आजच्या शिक्षण पद्धतीत बदल होत असून प्रत्येक क्षेत्रात बदल होणे गरजेचे आहे. नवीन तंत्रज्ञान स्थानिक पातळीवर निर्माण व्हावे यासाठी शिक्षणाचा फायदा होतो. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या निर्मितीमुळे अर्थशास्त्र सोपे झाले. त्यामुळे अर्थशास्त्राचा इतर शास्त्रासोबत अभ्यास करण्यास सोयीचे झाले. अर्थशास्त्र

मराठीत समजण्यासाठी परिषदेची महत्वाची भुमिका आहे असे मत व्यक्त केले. तर एका शास्त्राचे अध्ययन करतांना दुसऱ्या एखाद्या विषयातील काही बाबींचा संबंध त्यात येतो. त्यामुळे त्याचा देखील अभ्यास करणे आवश्यक असावे. एखाद्या विषयात संशोधन करतांना फक्त एका विषयावर भर न देता त्यात अनेक विषयांचा समावेश असतो असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत व्हावी, त्यांची विषयातील गोडी वाढावी यासाठी असे अधिवेशन आवश्यक असल्याचे मत आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केले. परिषदेमुळे नवसंशोधकांना प्रेरणा मिळते तसेच विषयातील विविध घटकांवर सविस्तर चर्चा घडते असे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महादेवराव भुईभार यांनी सांगितले. यावेळी परिषदेच्या माजी अध्यक्षांचे डॉ. रामेश्वर भिसे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच संपुर्ण कार्यकारिणी सदस्य आणि विश्वस्त यांचे सुद्धा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. नवनियुक्त अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड, संगमनेर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. नवनियुक्त कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, जळगांव, डॉ. टी.व्ही. मुंडे, प्राचार्य डॉ. संजय धनवटे व डॉ. पांडुरंग कल्याणकर यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. तसेच पुढील वार्षिक अधिवेशनाचे स्थानिक कार्यवाह डॉ. रामभाऊ खाडे, बारामती यांचेही स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. आर. के. शेख यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. रामेश्वर भिसे यांनी केले.

**परिषदेच्या वतीने विविध पारितोषिकांचे वितरण :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण प्रमुख पाहुणे व मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रू.१०००/-) : प्राचार्य बी. एस. काडे, यांच्या 'अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथास देण्यात आले.

२) प्रा. मो.स.भावे पारितोषिक (रू.५००/-) : अर्थसंवाद मधील सर्वोत्कृष्ट लेख प्रा. बी.एन. सापनर आणि प्रा. एस.एन. साबळे यांच्या लेखास देण्यात आले.

३) मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (रू.१०००/-) : डॉ. संगीता टक्कामोरे, रामटेक यांच्या 'विदर्भातील आर्थिक व सामाजिक विचार' या ग्रंथास देण्यात आले.

४) प्रा.सौ. अरूणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार,

प्रथम पारितोषिक (रू.१०००/-) : डॉ. संजय तुपे, नाशिक यांच्या 'आपलाच दाम खोटा' या लेखास देण्यात आले.

द्वितीय पारितोषिक (रू.५००/-) : प्रा. कमलाकर हनवंते, दारव्हा यांच्या 'हाक स्वातंत्र्याची' या लेखास देण्यात आले.

**अधिवेशन काळात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषिके:**

१) कै. ग.प्र. पिंपरकर (रू.१०००/-):

डॉ. विश्वजीत दिलीप कदम यांना देण्यात आले. (सदर पारितोषिक सन २०१३

पासून स्वतंत्रपणे देण्यात येत आहे. या करिता प्रा.डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी त्यांना मिळालेली पारितोषिकांची रक्कम ११०००/- परिषदेस देणगी दिली. परिषदेच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार)

२) मा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्यसेन पारितोषिक (रू.५००/-) :

डॉ. प्रशांत हरमकर, अमरावती यांना देण्यात आले.

३) डॉ. ज.फा. पाटील, कोल्हापूर पारितोषिक (रू.१०००/-) :

उमेश घोडेस्वार, अकोला यांना देण्यात आले.

४) पद्मजा गंधे पारितोषिक (रू.१०००/-) :

डॉ. धनश्री महाजन, औरंगाबाद यांना देण्यात आले.

**ऋणनिर्देश :**

१) तज्ज्ञ परिक्षक :

डॉ. संतोष दास्ताने, पुणे, डॉ.सौ. युगंधरा देशपांडे- टोपरे, औरंगाबाद, डॉ. करमसिंग राजपूत, वाणी, डॉ. धनश्री महाजन, औरंगाबाद, डॉ. संहिता आठवले, पुणे, डॉ. तानाजी गीते, पुणे, डॉ. सुभाष दगडे, सांगली, डॉ. प्रशांत काटोले, अमरावती, डॉ. शामराव कुलकर्णी, ठाणे.

२) सूत्रसंचालक व वृत्तसंकलक :

पहिले सत्र - प्रा.डॉ. दि. व्यं. जहागिरदार, अमरावती, प्रा. अरूण पिसे, धुळे, दुसरे सत्र - डॉ. व्ही. बी. भिसे, औरंगाबाद, डॉ. राजेंद्र रसाळ, तिसरे सत्र - डॉ. विनायक देशपांडे, नागपूर, प्रा. सुभाष गुर्जर, वरवट (बकाल), चवथे सत्र - प्रमुख वक्ते डॉ. एस.टी. सांगळे, औरंगाबाद, डॉ. अनिल पडोशी, ठाणे, डॉ. संतोष कुटे, मेहकर.

३) निवडणूक अधिकारी व सहकार्य :

प्राचार्य डॉ. आर.जी. टाले, खापरखेडा, प्रा. एस. डब्ल्यू. मिसाळ, प्रा. मोहन चौधरी, डॉ. अशोक खाचणे, डॉ. प्रशांत काटोले, प्रा.डॉ. करमसिंग राजपूत या सर्वांनी मानद सेवा देऊन अधिवेशनाच्या यशस्वीतेत मोलाचे योगदान दिले. याशिवाय ज्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले त्या सर्वांचे परिषदेच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. हे कार्य करीत असतांना कोणी अवधानाने दुखावले गेले असल्यास त्यांच्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करून सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो. अशा प्रकारे परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन अकोला येथे सर्वार्थाने यशस्वीरित्या संपन्न झाले.

# अर्थसंवाद वार्षिक अहवाल
## २०१४-१५ (खंड ३८, अंक १ ते ४)

**अविनाश रामलाल निकम**
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या *अर्थसंवाद* त्रैमासिकाचा २०१४-१५ या वर्षाचा ३८ व्या खंडाचा वार्षिक अहवाल परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांसमोर सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतला हा चतुर्थ अहवाल. अर्थसंवादचे ३८ खंड अखंडपणे प्रकाशित झाले. सन २०१४-१५ या वर्षात अर्थसंवादचे चार अंक प्रकाशित झाले. अर्थसंवाद ISSN व Registration Number प्राप्त जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीतील प्रतिष्ठाप्राप्त नियतकालिक ठरले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, अर्थसंवादचे लेखक, जाहिरातदार, वर्गणीदार यांच्या सहकार्यामुळेच परिषदेला हे त्रैमासिक चालू ठेवणे शक्य झाले आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थांनी अनुदान मंजूर करुन मोलाचे सहकार्य दिले आहे, त्याबद्दल मी या संस्थांचा परिषदेच्या वतीने अत्यंत कृतज्ञ आहे.

सन २०१४-१५ च्या अडतिसाव्या खंडात स्वतंत्र लेख, ग्रंथ परीक्षण, परिषदेच्या ३८ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा वृत्तांत, प्रत्येक अंकात संपादकीय, पी.एच्.डी. प्रबंधाचा गोषवारा, ग्रंथ परीक्षण, अर्थ शब्दांची वाट पाहे, अध्यक्षीय भाषण, अर्थसंवाद २०१४-१५ चा अहवाल, ३८ व्या राष्ट्रीय अधिवेनातील सत्रांचा अहवाल ३९व्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी विषयांची रूपरेषा अशा विविधांगी मजकुराचा समावेश करण्यात आला आहे. सन २०१४-१५ या वर्षात प्रकाशित झालेल्या चारही अंकांची मिळून अनुक्रमणिकेसह एकूण **४६४** पाने झाली. वर्षभरात ज्या ज्या लेखकांचे योगदान अर्थसंवादला मिळाले त्या सर्व लेखकांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. संपादक पदाची ज़बाबदारी स्वीकारल्यानंतर सर्व माजी प्रमुख संपादकांनी आपल्या कार्यातून निर्माण केलेल्या

आदर्श परंपरा कायम राखून बदलत्या काळानुसार विचारपूर्वक काही निर्णय घेतले. त्यानंतर बदल आणण्याचा प्रयत्न केला आहे.

१) कोणत्याही लेखकाचे एकापेक्षा जास्त लेख गेल्या तीन वर्षांप्रमाणेच या वर्षातसुध्दा अर्थसंवादमध्ये समाविष्ट केले नाहीत. त्यामुळे अर्थसंवादच्या इतिहासात सर्वाधिक लेखकांचा समावेश ३६ व्या खंडात होता ३७ व्या खंडात नवीन उच्चांक आपण गाठू शकलो आहोत. ३८ व्या खंडात जास्तीत जास्त सभासदांना अर्थसंवादचे लेखक होण्याची संधी प्राप्त होण्यासाठी हा निर्णय घेतला. त्यासह शोधनिबंधाच्या पृष्ठसंख्येवर नियंत्रण आणल्याने समाधानकारक संख्येने लेख देऊन अंकाची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न देखील केला आहे. तसेच काही आर्थिक विषयांचे स्पष्टीकरणासाठी जास्त पृष्ठांची आवश्यकता लक्षात घेता या वर्षी त्यांना जास्त पृष्ठे उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे लेख व लेखक संख्येवर या वर्षी काहीसे नियंत्रण आले आहे.

२) शहरी भागातील लेखकांबरोबरच ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण लिहिणाऱ्या लेखकांना तितकीच संधी अर्थसंवादच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

३) प्रस्थापित लेखकांबरोबरच नवीन लेखकांना अधिक संधी देण्याचा प्रयत्न करताना महाराष्ट्राच्या सर्व भागातील, अगदी काना-कोपऱ्यातील लेखकांना अर्थसंवादच्या लेखकसूचीमध्ये आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

४) अर्थसंवादच्या माध्यमातून अर्थशास्त्रीय लेखन करणाऱ्या नवीन लेखकांची एक पिढी महाराष्ट्रातील इतर दैनिके, मासिके, साप्ताहिके, जर्नल्स यामध्ये लिहिण्यासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेने द्यावी यासाठी प्रयत्न केला.

५) अर्थसंवादचा प्रत्येक अंक उत्तरोत्तर उत्तम यावा, सुबक यावा यासाठी सातत्याने गुणवत्तावाढीचे प्रयत्न केले, प्रयत्न करणे सुरूच आहे.

६) गेल्या २ वर्षांप्रमाणे या वर्षीसुध्दा प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, मुखपृष्ठ व मलपृष्ठाच्या आतील पृष्ठे असे एकूण चार पृष्ठे रंगीत दिली आहेत.

७) मुखपृष्ठ व आतील पृष्ठांचा किफायतशीर खर्चात अधिकाधिक उत्तम दर्जा उपलब्ध करून देता यावा यासाठी प्रयत्न केले आहेत.

८) ज्या ज्या सन्माननीय आजीव सदस्यांना अर्थसंवादमध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्याची इच्छा आहे, ज्यांनी योग्य त्या फॉण्टमध्ये गुणवत्तापूर्ण शोधनिबंध पाठविला त्यांना अर्थसंवादमध्ये संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गेल्या ३६ वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक शोधनिबंध या ३७ व्या खंडात प्रकाशित झाले आहेत. तर ३८ व्या खंडातही समाधानकारक संख्येने लेख प्रकाशित केले आहेत.

९) ३८ व्या खंडात अर्थसंवादचा एक विशेषांक प्रकाशित झाला. हा विशेषांक आर्थिक महाराष्ट्र या विषयावर आधारित होता. लेखकांनी या विशेषांकाला उत्तम प्रतिसाद दिला.

१०) अंकाचे पाकीट पूर्वी परंपरेने खाकी रंगाच्या

कागदाचे होते. सन्माननीय सभासदांपर्यंत पोहोचेपर्यंत बऱ्याच वेळा ते फाटत असे. अंक सर्वांपर्यंत सुरक्षित पोहोचावा यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकाप्रमाणे दर्जेदार प्लॅस्टिकचे पाकीट गेल्या २ वर्षांप्रमाणे याही वर्षातील चारही अंकांसाठी आपण वापरले.

११) अंकास आपण मशीनवरील परफेक्ट बाइंडिंग गेल्या चार वर्षांपासून देत आहोत. या बाइंडिंगमध्ये पीनचा वापर केला जात नाही.

१२) कागदाच्या किमती गेल्या दोन-तीन वर्षात खूपच वाढल्या आहेत. अशा महागाईच्या काळात देखील जळगाव येथील सातपुडा ऑफसेट लाठी परिवाराच्या सहकार्याने किफायतशीर किमतीत अंक तयार केले आहेत.

१३) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी महाविद्यालय व ग्रंथालयाच्या वर्गणी वाढीचा प्रस्ताव सादर केला होता. *अर्थसंवादची वार्षिक वर्गणी आधीच्या रु.६००/- वरून रु.१०००/- करावी, पंचवार्षिक वर्गणी आधीच्या रु.१०००/- यात वाढ करून रु.१५००/- करावी, तसेच वार्षिक वर्गणी स्वीकारणे बंद करावे* या प्रस्तावाला आजीव सदस्यांनी गेल्या वर्षापूर्वी एकमताने मंजुरी दिली. त्यामुळे अर्थसंवादच्या चालू वर्षातील उत्पन्नात गेल्या २ वर्षांप्रमाणे भरीव वाढ झाली आहे.

१४) अर्थसंवादच्या पृष्ठ संख्येने या वर्षी नवीन उच्चांक गाठला आहे. पृष्ठ संख्येचे नियोजन केल्याने सलग चौथ्या वर्षीदेखील सर्व अंकांमध्ये एकही पृष्ठ कोरे सोडलेले नाही.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून महाविद्यालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. अर्थसंवाद आपापल्या महाविद्यालयात घेतला जाईल याकडे परिषदेच्या सर्व सदस्यांनी लक्ष दिल्यास वर्गणीदार महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होऊन अर्थसंवादचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व पदाधिकारी कार्यकारिणी सदस्य व सन्माननीय सभासदांनी आपापल्या परिसरातील एखादी पूर्ण पानाची जाहिरात उपलब्ध करुन दिल्यास अर्थसंवादची तूट कमी होण्यास निश्चितच मदत होईल. अर्थसंवाद त्रैमासिकाच्या प्रत्येक अंकाच्या सामान्यपणे १८१८ प्रती छापल्या जात आहेत. आजीव सदस्य व वर्गणीदार यांच्या संख्येत सातत्याने वाढ होणे ही अर्थसंवादची जमेची बाजू आहे. चारही अंकांची अनुक्रमणिकेसह एकूण पृष्ठसंख्या ४६४ इतकी ठेवण्यात आली असून प्रत्येक अंक सामान्यपणे ११८ पृष्ठांच्या जवळपास ठेवण्याची परंपरा निर्माण केली आहे. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अर्थसंवादच्या जाहिरातीपासून एकूण उत्पन्न रु.६३०००/- मिळाले आहे. हे उत्पन्न मिळविण्यासाठी कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले व प्रा.रामेश्वर भिसे यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्वांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळात विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी निवडले जातात. या प्रतिनिधींना जाहिरात पाठविण्याविषयी विनंती केली आहे. सन्माननीय

## अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती

| तपशिल | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|
| चार अंकातील एकूण लेख | ३९ | ६३ | ६५ | ५६ |
| चार अंकातील एकूण लेखक | ५० | ७५ | ७७ | ७१ |
| चार अंकाच्या एकूण प्रती | ६८६० | ७१४० | ७२२० | ७२७० |
| चार अंकाची एकूण पृष्ठे (अनुक्रमणिकेसह) | ४२२ | ४४२ | ४६२ | ४७२ |
| चार अंकातील रंगीत अंकसंख्या | ०३ | ०४ | ०४ | ०४ |
| चार अंकाचा एकूण खर्च (रु.) (टपालखर्चासह) | २२५७७३ | २५९११८ | २९८५०० | ३१२४६८ |
| दर नगाचा सरासरी खर्च (रु.) (टपालखर्चासह) | ३२.९१ | ३६.३० | ४१.३४ | ४२.९८ |
| दर पानाचा सरासरी खर्च (रु.) (टपालखर्चासह) | ०.३१ | ०.३२ | ०.३५ | ०.३६ |
| जाहिराती पासून उत्पन्न (रु.) | ४३००० | ५५००० | ५५००० | ६३००० |

सदस्य पुढील वर्षी प्रत्येकी एक जाहिरात देऊन सहकार्य करतील अशी अपेक्षा बाळगू या. ३८ व्या खंडातील चारही अंकांचा एकूण खर्च रु.३१२४६८/- इतका झाला. गेल्या दोन-तीन वर्षात कागदाच्या किमती खूपच वाढल्या आहेत. तरी देखील अर्थसंवादचा खर्च काटकसरीने केला आहे ही उल्लेखनीय बाब सभासदांच्या निदर्शनास आणू इच्छितो. अर्थसंवादच्या खर्चात या वर्षी थोडी वाढ झाली आहे. त्याची कारणे- १) आजीव सदस्य संख्या वाढली आहे. त्यामुळे अंकांची संख्या वाढली. २)या वर्षी सर्व अंक रंगीत आहेत. ३) सर्व अंकांच्या मुखपृष्ठास लॅमिनेशन केले आहे. ४) या वर्षी चार अंकांची एकूण पृष्ठसंख्येत भरीव वाढ झाली. ५) आर्थिक महाराष्ट्र विशेषांक अधिक चांगला करण्याचा प्रयत्न केला. ६) अंक संख्या वाढल्याने पाकीट व पोस्टेज खर्चात वाढ झाली. ७) या वर्षीदेखिल चारही अंकांसाठी आंतरराष्ट्रीय नियतकालिकांप्रमाणेच प्लॅस्टीकचे पाकीट वापरले आहे. ८) अंकबिलामध्ये या आर्थिक वर्षातील व्हॅट(VAT)चा एकूण खर्च रु.१३०८५/- समाविष्ट आहे.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांचे योगदान मोलाचे असते. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेकडून २०१४-१५ मध्ये अर्थसंवाद प्रकाशनास अनुदान मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने २०१४-१५ साठी रु.४५०००/- अनुदान दिले आहे. दरवर्षी या दोन्ही संस्था अनुदान देतात. या दोन्ही संस्थांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. हे अनुदान प्राप्त करण्यासाठी माझ्यासह कार्यवाह डॉ.आर.बी.भांडवलकर यांनी प्रयत्न केले.

अर्थसंवाद येत्या वर्षात अधिक दर्जेदार व अधिक पृष्ठांसह येण्यासाठी अधिक रकमेची तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे.

भारतीय अर्थव्यवस्था व जागतिक अर्थव्यवस्थेत घडणाऱ्या विशेष महत्त्वाच्या घटनांविषयी चालू घडामोडींवर आधारित लेख देण्याची परंपरा कायम राखली. स्वतंत्र लेख, सैद्धांतिक लेख, तसेच शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र, जागतिकीकरण, सेवा क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, सहकार क्षेत्र, रोजगार क्षेत्र, आदिवासी विकास या विषयावरील लेख अर्थसंवादमध्ये प्रकाशित करण्यात आले.

बऱ्याच वेळी ठरलेल्या फॉण्टमध्ये व पेजमेकरमध्ये टाईप करून लेख न येणे, पाकीटात सीडी तडा पडून प्राप्त होणे किंवा आलेली सीडी ओपन न होणे, लेख/मजकूर उशिरा प्राप्त होणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे विजेचे भारनियमन अशा कारणांनी अर्थसंवादचा अंक पूर्ण करताना समस्या आल्यात. आपण अर्थसंवादच्या प्रत्येक अंकात जाहिरात देतो त्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्या करिता कार्यकारिणी सदस्य, सल्लागार मंडळ, आजीव सदस्य यांनी अर्थसंवादला सहकार्य करण्याची गरज आहे. अकोला येथे संपन्न झालेल्या अडतीसाव्या वार्षिक अधिवेशनात ६ नोव्हेंबर २०१४ रोजी अर्थसंवादच्या सल्लागार मंडळाची बैठक संपन्न झाली. या प्रसंगी पदाधिकारी व सदस्यांनी अर्थसंवादचा दर्जा वाढविण्यासाठी मार्गदर्शनपर सूचना केल्या.

अर्थसंवादच्या ३८ व्या खंडाची जडण घडण करण्यासाठी अनेकांनी मला मोलाची मदत केली. आदरणीय कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. अर्थसंवाद प्रकाशित करताना येणाऱ्या अडचणी दूर करीत असताना माझे गुरूवर्य प्रा.चारुदत्त गोखले यांनी वेळोवेळी सहकार्य केले. लेखक, जाहिरातदार, कार्यकारी मंडळ सदस्य, माजी अध्यक्ष डॉ. ज. फा. पाटील, डॉ. विनायक भिसे, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. दि. व्यं. जहागीरदार, डॉ.संतोष दास्ताने, डॉ.जगन्नाथ पाटील, डॉ.मधुकर शिंदे, डॉ. के.के. पाटील, कार्यवाह खजिनदार डॉ.आर.बी. भांडवलकर, अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी, विश्वस्त डॉ. सूर्यकांत जगदाळे, विश्वस्त डॉ. मुक्ता जहागीरदार, विश्वस्त डॉ.अर्जुन महाडिक यांचे मार्गदर्शन व योगदान महत्त्वाचे ठरले. डॉ.बालाजी शिंदे (परभणी), डॉ.रामकृष्ण टाले (नागपूर), डॉ.तुकाराम मुंडे (मानवत), डॉ. बालाजी सुरवसे (फोंडा), डॉ. विद्या पाटील(धुळे), डॉ.तुकाराम बारबोले (उस्मानाबाद), डॉ.संजय तुपे(नाशिक), डॉ.राजू शिंदे(धुळे), महादेव पाटील(मीरज), हनुमंत नन्नवरे(अकलूज), सुभाष गुर्जर(वरवट बकाल) या कार्यकारी मंडळ सदस्यांचे सहकार्य लाभले. डॉ.सुहास आव्हाड(संगमनेर), डॉ.हरिहर तिवारी, डॉ.राजेंद्र गव्हाळे(खामगाव), डॉ.रावसाहेब जाधव, डॉ.संजय धनवटे, डॉ.मोहन चौधरी, डॉ.तानाजी गिते, डॉ.तेजस्विनी मुडेकर, डॉ.विजय भोपाळे, डॉ. संतोष कदम, प्रा.अरुण पिसे(धुळे), डॉ. सुरेश जगताप, प्रा. एस. एल. भालेराव यांचे सहकार्य लाभले. सर्व अंकांची कॉम्प्युटरमध्ये जडण घडण व प्रूफ रीडींग करणारे सुनील भांडारकर व सातपुडा ऑफसेटचे निलेश लाठी या मित्रांच्या सहकार्याशिवाय मी अंक आणू शकलो नसतो. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. अर्थसंवादचे सहाय्यक संपादक शंकर पवार, सल्लागार मंडळ सदस्य डॉ. प्रशांत काटोले, डॉ.

अशोक खाचणे, डॉ. राहूल म्होपरे व डॉ.अशोक हळ्ळी यांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. अर्थसंवाद पाकीटात टाकणे, पोस्टाची तिकिटे चिकटवणे या संदर्भात कु.ईशा लाठी व कु.नेहा लाठी यांनी उत्स्फूर्त सहकार्य दिल्याबद्दल मी त्यांचा देखील आभारी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्रैमासिक अर्थसंवाद अधिक दर्जेदार करण्यास सर्व जण यथाशक्ती योगदान देऊ या.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मान चिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी २०१४ ते ३१ डिसेंबर २०१४ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरीत पाठवाव्यात.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १/१/२०१४ ते ३१/१२/२०१४ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत पाठवाव्यात.

### डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१४ ते ३१ डिसेंबर २०१४ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख, वृत्तपत्राचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्ट २०१५ पूर्वी कार्यवाह, म.अ.प., गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ (भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६) यांच्याकडे पाठवावेत. २०१५ च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

- डॉ. आर.बी.भांडवलकर, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# अर्थ शब्दांची वाट पाहे
# देशी
# (Homebred)

**ज. फा. पाटील, कोल्हापूर,**
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

होमब्रेड:

सध्या आंतरराष्ट्रीय व्यापार वाढत आहे. अनेक वस्तूंची आयात होत असते. अशा वातावरणात बाजारातील स्पर्धाही, स्थानिक उत्पादने व प्रत्यक्ष आयात उत्पादने यांच्यात होत असते. आयात वस्तूंच्या बाबतीत परकीय वस्तू आयात वस्तू असे शब्द वापरले जातात. काही वस्तूंच्या बाबतीत उत्क्रांती/ निपज कुठे झाली याला महत्त्व असते. देशात उत्क्रांत झालेल्या वस्तूंना देशी किंवा स्थानिक असे भौगोलिक व प्रादेशिक विशेषण लावता येईल. पण होमब्रेड या इंग्रजी शब्दांत ब्रीडींग म्हणजे पैदास करणे. ब्रीडचा अर्थ जात (मानव समाजातील नव्हे) वस्तू तयार करण्याची, तयार होण्याची स्थानिक देशी पध्दत लक्षात घेवून अशा वस्तूस होमब्रेड म्हटले जाते. यात उत्पादन प्रक्रियेसाठी उत्क्रांती हा महत्त्वाचा घटक असतो. या सर्व गोष्टी लक्षात घेवून आपण होमब्रेड या शब्दांसाठी देशी हे विशेषण वापरणे अधिक योग्य होईल. डोमेस्टिक म्हणजे स्थानिक असा एक पर्याय देता येईल. पण त्यात देशी  , देशी खेळणी, देशी कापड, देशी रंग या शब्दांत व्यक्त होणारा अर्थ येत नाही. साहजिकच होमब्रेड या शब्दासाठी देशी असाच शब्द वापरणे योग्य ठरेल असे वाटते.

# मराठी अर्थशास्त्र परिषद : उपक्रम थोडक्यात

## कमलाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी

कौटील्य ज्ञान प्रबोधिनी अमरावती, मराठी अर्थशास्त्र परिषद आणि विदर्भ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांच्या मातोश्री कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार यांच्या जन्मशताब्दीनिमित्त १३ जानेवारी २०१५ रोजी सायंकाळी विज्ञान तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र या विषयावर व्याख्यानाचे आयोजन अमरावती येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विनायक देशपांडे हे होते. या वेळी व्यासपीठावर मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ.श्रीराम जोशी, कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले, विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा डॉ.वनिता चौरे, कार्यवाह खजिनदार डॉ.आर.बी.भांडवलकर, प्रमुख वक्ते डॉ.संतोष दास्ताने, डॉ.दत्तात्रय जहागिरदार, डॉ.श्रीहरी मांडवगणे, संयोजक वळतकर, डॉ. दि. व्यं. जहागिरदार, विश्वस्त डॉ.मुक्ता जहागिरदार आदी उपस्थित होते. डॉ.श्रीराम जोशी यांनी जहागिरदार कुटुंबाच्या योगदानाची माहिती दिली. आपल्या व्याख्यानात डॉ.दत्तात्रय जहागिरदार यांनी विज्ञान म्हणजे शक्ती व निसर्गाचा अभ्यास होय असे विचार व्यक्त केले. तर डॉ.श्रीहरी मांडवगणे यांनी आपल्या व्याख्यानात तंत्रज्ञानाची व्याप्ती फार मोठी असून खऱ्या अर्थाने तंत्रज्ञानाची प्रगती औद्योगिक क्रांतीनंतरच झाली असे विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरू डॉ.विनायक देशपांडे म्हणाले की, संवेदनशीलतेतून आलेली सर्जनशीलता महत्त्वाची आहे. गांधीयन टेक्नॉलॉजी याकरिता महत्त्वाची असून दुसऱ्याचे दु:ख समजून तंत्रज्ञान विकसित केल्यास खऱ्या अर्थाने विकास घडून येईल. कार्यक्रमाचा समारोप डॉ.आर.बी.भांडवलकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

## स्वर्गीय जमनालाल बजाज व्याख्यानमाला

श्री. म. द. भारती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्णी जिल्हा यवतमाळ येथे १४ मार्च २०१५ रोजी स्व. जमनालाल बजाज व्याख्यानमाला संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष प्रियदर्शनी भारती हे होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख वक्ते डॉ.दि.व्यं. जहागीरदार, डॉ.आर.बी.भांडवलकर, डॉ.करमसिंग राजपूत, प्रभारी प्राचार्य राजेंद्र तातेड, कार्यक्रमाचे संयोजक प्रा.एन.ए.पिस्तुलकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका प्रा.एन.ए.पिस्तुलकर यांनी व्यक्त केली. डॉ.आर.बी.भांडवलकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख वक्ते डॉ.दि.व्यं. जहागीरदार यांनी आपल्या भाषणात ग्रामीण विकासाची संकल्पना व्यक्त करताना ग्रामीण लोकांच्या जीवनामध्ये वाढ करण्यासाठी शिक्षणाच्या सोयी, आरोग्याच्या सोयी, कर्जविषयक सुविधा, शेतीविषयक गरजा पूर्ण करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. ग्रामीण भागातील उत्पन्न विषमता उदाहरणासह विषद केली. ग्रामीण भागातील लोकांना आधारभूत सोयी आणि सुविधा मिळाल्या पाहिजेत शुध्द पिण्याच्या पाण्याची सुविधा खेड्यात निर्माण व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ.करमसिंग राजपूत यांनी ग्रामीण क्षेत्राची विदारक स्थिती स्पष्ट केली. डॉ.शंकर सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्र संचालन प्रा.टोकसे यांनी केले. तर प्रा.आवटे यांनी आभार मानले.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## सन २०१४-१५

## या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | सभासदाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ | खानझोडे संदीप मनोहरराव, वाठोडा | १६३४ |
| २ | कायरकर मनीष काशिनाथ, बल्लारपूर | १६३५ |
| ३ | कदम विश्वजित दिलीप, नाशिक | १६३६ |
| ४ | कावडकर नितीन बळिराम, धुग्गुस | १६३७ |
| ५ | पाटील रविंद्र पुंडलिक, देवपूर | १६३८ |
| ६ | हजारे वैशाली रामदास, कुसुंबा | १६३९ |
| ७ | वाळवणकर संतोष नंदकुमार, वाळोणा | १६४० |
| ८ | माहोरे समीर लक्ष्मण, नागपूर | १६४१ |
| ९ | साठे ज्योती वसंत, पुणे | १६४२ |
| १० | विभुते उमाकांत पंढरी, नांदेड | १६४३ |
| ११ | चौधरी नितीन ज्ञानदेव, अकोला | १६४४ |
| १२ | पगार प्रभाकर वसंत, आमोदे | १६४५ |
| १३ | पगार अमोल अरूण, नळेगाव | १६४६ |
| १४ | खडतकर आरती वाल्मिकराव, बुलढाणा | १६४७ |
| १५ | सांगोळकर उमेन्द्र भिमराव, पातूर | १६४८ |
| १६ | देशमुख अश्विनी हरिश्चंद्र, भेंडा | १६४९ |
| १७ | हाडे प्रवीण भास्करराव, गोहोगाव | १६५० |
| १८ | किरकिरे प्रकाश लक्ष्मण, गडचिरोली | १६५१ |
| १९ | तिवारी निता नंदलाल, अकोला | १६५२ |
| २० | वारडे विजयानंद अभिमन, वेले | १६५३ |
| २१ | कामटे सुनिता सुनिल, मुंबई | १६५४ |
| २२ | भोसले मनिषा भास्कर, मुंबई | १६५५ |
| २३ | रंगाचार्य देवेंद्र शिवदास | १६५६ |

# अर्थसंवाद (खंड ३८, २०१४-१५)

## (अ) लेख सूची:


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांचा विकास | ७ - ११ |
| २ | महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील संक्रमण: एक मागोवा | १३ - १८ |
| ३ | शेतमाल निर्यात वाढीस म.रा.कृ.पणन मंडळातर्फे प्रोत्साहन | १९ - २५ |
| ४ | कोरडवाहू शेतीअभियानाद्वारे शाश्वतीकरण | २६ - ३१ |
| ५ | महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग | ३२ - ४१ |
| ६ | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल: एक दृष्टिक्षेप | ४३ - ४८ |
| ७ | महाराष्ट्रातील नागरीकरण: स्वरूप व कारणे | ४९ - ५३ |
| ८ | महाराष्ट्रातील महिला नागरी सह. बँका: वास्तव व अपेक्षा | ५४ - ५८ |
| ९ | महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विविध पैलू | ५९ - ६४ |
| १० | महाराष्ट्राची अर्थव्यवस्था: विविध पैलू | ६५ - ७० |
| ११ | महाराष्ट्रातील बँकींग क्षेत्र-नागरी बँका: एक दृष्टिक्षेप | ७१ - ७६ |
| १२ | महाराष्ट्रातील कृषि विकास: शासकिय धोरण | ७७ - ८२ |
| १३ | अस्मानी संकट: महाराष्ट्रतील शेती उत्पादन | ८३ - ८९ |
| १४ | महाराष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक-स्वरूप | ९० - ९५ |
| १५ | महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विशेष पैलू | ९६ - १०१ |
| १६ | समाजवादाच्या नव्या वाटा? | ११७-१२३ |
| १७ | औष्णिक विद्युत केंद्रातील मजुरांची स्थिती | १२४-१२८ |
| १८ | दारिद्र्याचे मोजमाप: एक संक्षिप्त आढावा | १२९-१३५ |
| १९ | स्वराज्यातील आदर्श आर्थिक अर्थनिती | १३६-१४१ |
| २० | बेकारीचे साहित्यातील संदर्भ: एक चिकित्सा | १४२-१४७ |
| २१ | सी. रंगराजन समिती: दारिद्र्याचा अंदाज | १४८-१५४ |
| २२ | जागतिकीकरणाचा विकसनशील अर्थव्यवस्थेवरील परिणाम | १५५-१६३ |
| २३ | केंद्रिय अर्थसंकल्प २०१४-१५: शेती व ग्रामीण विकास | १६४-१६९ |
| २४ | ब्रिक्स् बँक - भारताला संधी | १७०-१७४ |
| २५ | जागतिक आर्थिक संकटाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम | १७५-१८० |
| २६ | जलस्वराज्य प्रकल्पातील लोकसहभाग व ग्रामीण विकास | १८१-१८६ |
| २७ | महाराष्ट्रातील वित्तीय समावेशन वास्तवता | १८७-१९३ |
| २८ | अर्थसंकल्प २०१४-१५ व कृषि क्षेत्र | १९४-१९७ |

| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | मानव अधिकार आणि भारतीय शेतकन्यांची सद्यस्थिती | १९८-२०३ |
| ३० | जागतिकीकरणानंतर बँकींग क्षेत्रासमोरील आव्हाने | २०४-२०९ |
| ३१ | भारतातील दारिद्र्याचा अभ्यास | २१०-२१५ |
| ३२ | धुळे शहरातील नागरिकांची गुंतवणूक प्रवृत्ती | २१६-२२० |
| ३३ | अंदाजपत्रकीय खर्चाचा तपशिल | २२१-२२६ |
| ३४ | शिवकालीन अर्थव्यवस्थेचे राजकोषीय धोरण | २३१-२३५ |
| ३५ | भारतातील नागरी दारिद्र्याचे स्वरूप | २३६-२४७ |
| ३६ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | २४८-२५९ |
| ३७ | उर्जा संशोधन स्थितीचे अध्ययन | २६०-२६४ |
| ३८ | महाराष्ट्रातील दारिद्र्य: एक अभ्यास | २६५-२७० |
| ३९ | महाराष्ट्रातील शेती क्षेत्राचे बदलते स्वरूप | २७१-२७८ |
| ४० | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ | २७९-२८७ |
| ४१ | पंतप्रधान जनधन योजना | २८८-२९४ |
| ४२ | लोकसंख्येची गुणात्मकता | २९५-२९८ |
| ४३ | महाराष्ट्रातील पाणी प्रश्न-सद्यस्थिती | २९९-३०६ |
| ४४ | राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान | ३०७-३१० |
| ४५ | आदिवासी जमाती: आर्थिक समस्या | ३११-३१७ |
| ४६ | नागपूर जिल्ह्यातील लिंबूवर्गीय फलोत्पादन योजना | ३१८-३२४ |
| ४७ | ठिबक सिंचन पध्दतीचे कृषिविकासातील महत्त्व | ३२५-३३० |
| ४८ | भारतातील आर्थिक विषमता आणि दारिद्र्य | ३४९-३६० |
| ४९ | केंद्रीय अर्थसंकल्प: अपेक्षा आणि वास्तव | ३६५-३७१ |
| ५० | नीती आयोग | ३७२-३८२ |
| ५१ | ग्रामीण भारतातील शेतीक्षेत्राची वाटचाल | ३८३-३८७ |
| ५२ | भारतीय महिला बँकेची भविष्यातील वाटचाल | ३८८-३९१ |
| ५३ | भारतीय अन्नसुरक्षा विधेयक | ३९२-३९८ |
| ५४ | ग्रामविकासात परंपरागत उद्योगांची भूमिका | ३९९-४०४ |
| ५५ | भारतीय आयुर्विमा महामंडळ:आर्थिक विश्लेषण | ४०५-४१० |
| ५६ | परामर्श- केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-१६ | ४११-४१५ |

| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **अर्थ शब्दांची वाट पाहे** | |
| १ | खाद्य सुरक्षा | ११३-११४ |
| २ | व्यल्पगम्य | ३४३-३४४ |
| ३ | होमब्रेड | ४५१-४५१ |
| | **पीएच.डी. प्रबंधाचा सारांश** | |
| १ | जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राची बेरोजगारी निर्मूलनातील भूमिका | ३३१-३३५ |
| २ | वर्धा जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्राचे महिलांच्या आर्थिक-सक्षमीकरणात योगदान | ४१६-४१९ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | गुंतवणूक पंचायतन | ३३६-३४१ |
| | **श्रध्दांजली** | |
| १ | अर्थशास्त्राचे व्यासंगी प्राध्यापक डॉ. आनंद नाडकर्णी | ३ - ६ |
| २ | डॉ.व्यं.सु.पाटणकर - एक प्रगल्भ व्यक्तिमत्त्व | ३६१-३६४ |
| | **३८ वे अधिवेशनः सूत्रसंचालकांचा अहवाल** | |
| १ | मौद्रिक क्षेत्र व वास्तव क्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैध्दांतिक विवेचन | ४२०-४२१ |
| २ | जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल | ४२२-४२३ |
| ३ | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल सद्यस्थिती व आव्हाने | ४२४-४२६ |
| | **३९ व्या अधिवेशनाच्या विषयांची रूपरेषा** | |
| १ | गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार | ४२८-४३१ |
| २ | पं. जवाहरलाल नेहरू व भारतीय आर्थिक नियोजन | ४३२-४३३ |
| ३ | महिला सबलीकरण: महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्यांची फलश्रुती | ४३४-४३६ |
| ४ | अडतीसावे वार्षिक अधिवेशन | ४३८-४४४ |
| ५ | अर्थसंवाद वार्षिक अहवाल | ४४५-४५० |

# अर्थसंवाद (खंड ३८, २०१४-१५)

## (ब) लेखक सूची:



| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | कुंडलिक भिमराव चौगुले, अलिबाग | ७ - ११ |
| २ | माधव शिंदे, अहमदनगर | १३ - १८ |
| ३ | शशिकांत चंद्रकांत आंडगे, मोहोळ | १९ - २५ |
| ४ | मधुकर रामचंद्र वेदपाठक, मुरूड-जंजीरा | २६ - ३१ |
| ५ | रामकृष्ण टाले, खापरखेडा, मनिष कायरकर, बल्लारपूर | ३२ - ४१ |
| ६ | दिपक चौधरी, मुंबई, अशोक खाचणे, जळगाव | ४३ - ४८ |
| ७ | धनाजी बाबुराव इंगवले, तिसंगी | ४९ - ५३ |
| ८ | श्रीमती बी. डी. पाटील, ओझर-मिग | ५४ - ५८ |
| ९ | नलिनी पाचर्णे, पुणे | ५९ - ६४ |
| १० | दिलीप रामभाऊ जगताप, नंदुरबार | ६५ - ७० |
| ११ | गजानन भाकरे, कोल्हापूर | ७१ - ७६ |
| १२ | वनिता चोरे, चांदुरबाजार | ७७ - ८२ |
| १३ | कल्पना भागवत, धुळे; वर्षा नेहेते, भालोद | ८३ - ८९ |
| १४ | आर.के.नाळे, सरूड | ९० - ९५ |
| १५ | संभाजी गोपाळा शिंदे, पिंपरी | ९६ - १०१ |
| १६ | माधव दातार, मुंबई | ११७-१२३ |
| १७ | श्रीराम जोशी, जळगाव; विनोद मोरे, डोंगरकठोरे | १२४-१२८ |
| १८ | पांडुरंग कडुकर, मुंबई | १२९-१३५ |
| १९ | नारायण टाक, सासवड | १३६-१४१ |
| २० | तेजस्विनी मुडेकर, कोल्हापूर | १४२-१४७ |
| २१ | पांडुरंग कल्याणकर, फुलंब्री | १४८-१५४ |
| २२ | मृणालिनी तापस, नागपूर | १५५-१६३ |
| २३ | संजय रुपे, संतोषकुमार यादव, कोल्हापूर | १६४-१६९ |
| २४ | अब्दुल रऊफ शेख, अकोला | १७०-१७४ |
| २५ | शामराव वायसे, नंदुरबार | १७५-१८० |
| २६ | अनघा पाठक, प्रमिला पाटील, कोल्हापूर | १८१-१८६ |
| २७ | महंमद रफीक मुलाणी, शारदानगर | १८७-१९३ |
| २८ | मारुती सूर्यवंशी, कराड | १९४-१९७ |

| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | गजानन भारती, अमरावती | १९८-२०३ |
| ३० | दिनकर टकले, परतूर | २०४-२०९ |
| ३१ | मुरलीधर गायकवाड, मुरुड जंजिरा | २१०-२१५ |
| ३२ | कारभारी दिवटे, हेमंत जोशी, धुळे | २१६-२२० |
| ३३ | धर्मा धेडे, वारणानगर | २२१-२२६ |
| ३४ | संतोष कदम, सोलापूर | २३१-२३५ |
| ३५ | अविनाश कुलकर्णी, पुणे | २३६-२४७ |
| ३६ | निरगुडे इमाम अब्दूल, श्रीरामपूर | २४८-२५९ |
| ३७ | शिवाजी यादव, पैठण | २६०-२६४ |
| ३८ | वाल्मिक परहर, मंडणगड | २६५-२७० |
| ३९ | सुरेखा फाकडे, पेठवडगाव | २७१-२७८ |
| ४० | हनुमंत शिंदे, पुणे | २७९-२८७ |
| ४१ | वसंत नथ्थू हिस्सल, उमरगा | २८८-२९४ |
| ४२ | बापूसाहेब सोनवणे, औरंगाबाद | २९५-२९८ |
| ४३ | बंडू कदम, जगन्नाथ पाटील, कोल्हापूर | २९९-३०६ |
| ४४ | माधुरी लेले, नागपूर | ३०७-३१० |
| ४५ | मनोज गायकवाड, शहादा | ३११-३१७ |
| ४६ | लिलाधर खरपुरिये, मोहपा | ३१८-३२४ |
| ४७ | मदन शिंदे, पाटोदा | ३२५-३३० |
| ४८ | श्रीराम जोशी, जळगाव | ३४९-३६० |
| ४९ | राहूल म्होपरे, अर्जुननगर | ३६५-३७१ |
| ५० | प्रशांत हरमकर, अमरावती | ३७२-३८२ |
| ५१ | गजानन कदम, इंदापूर | ३८३-३८७ |
| ५२ | हरिभाऊ गिलबिले, भूम | ३८८-३९१ |
| ५३ | निकिता भोरे, सांगली | ३९२-३९८ |
| ५४ | दिपक शेलार, चिंचणी | ३९९-४०४ |
| ५५ | विरेंद्र वडेर, इस्पुर्ली | ४०५-४१० |
| ५६ | जयराम गायकवाड | ४११-४१५ |

| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **अर्थ शब्दांची वाट पाहे:** ज. फा. पाटील | |
| १ | खाद्य सुरक्षा | ११३-११४ |
| २ | व्यल्पगम्य | ३४३-३४४ |
| ३ | होमब्रेड | ४५१-४५१ |
| | **पीएच.डी. प्रबंधाचा सारांश** | |
| १ | नितीन चौधरी, अकोला | ३३१-३३५ |
| २ | हेमराज चौधरी, आर्वी | ४१६-४१९ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | मंजुषा मुसमाडे, पुणे | ३३६-३४१ |
| | **श्रध्दांजली** | |
| १ | संतोष दास्ताने, पुणे | ३ - ६ |
| २ | यशवंत रारावीकर, कोलकाता | ३६१-३६४ |
| | **३८ वे अधिवेशन: सूत्रसंचालकांचा अहवाल** | |
| १ | दि. व्यं. जहागिरदार, अमरावती | ४२०-४२१ |
| २ | विनायक भिसे, औरंगाबाद | ४२२-४२३ |
| ३ | विनायक देशपांडे, नागपूर | ४२४-४२६ |
| | **३९ व्या अधिवेशनाच्या विषयांची रूपरेषा** | |
| १ | दि. व्यं. जहागिरदार, अमरावती | ४२८-४३१ |
| २ | ज. फा. पाटील, कोल्हापूर | ४३२-४३३ |
| ३ | धनश्री महाजन, औरंगाबाद | ४३४-४३६ |
| ४ | आर. बी. भांडवलकर - ३८ वे वार्षिक अधिवेशन | ४३८-४४४ |
| ५ | अविनाश निकम - अर्थसंवाद वार्षिक अहवाल | ४४५-४५० |
| | **अंकांचा तपशील खंड: ३८** | **पृष्ठ संख्या** |
| १ | एप्रिल-जून २०१४ | ११४ |
| २ | जुलै-सप्टेंबर २०१४ | ११४ |
| ३ | ऑक्टोबर-डिसेंबर २०१४ | ११८ |
| ४ | जानेवारी-मार्च २०१५ | ११८ |

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### इमारत निधी

| अ.क्र. | नाव | पावती क्र. | आजीव क्र. | रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | खानझोडे संदीप मनोहरराव, वाठोडा | ३०१ | १६३४ | २०००/- |
| २ | कायरकर मनीष काशिनाथ, बल्लारपूर | ३०२ | १६३५ | २०००/- |
| ३ | कदम विश्वजित दिलीप, नाशिक | ३०३ | १६३६ | २०००/- |
| ४ | कावडकर नितीन बळिराम, धुग्गुस | ३०४ | १६३७ | २०००/- |
| ५ | पाटील रविंद्र पुंडलिक, देवपूर | ३०५ | १६३८ | २०००/- |
| ६ | हजारे वैशाली रामदास, कुसुंबा | ३०६ | १६३९ | २०००/- |
| ७ | माहोरे समीर लक्ष्मण, नागपूर | ३०८ | १६४१ | २०००/- |
| ८ | साठे ज्योती वसंत, पुणे | ३०९ | १६४२ | २०००/- |
| ९ | विभुते उमाकांत पंढरी, नांदेड | ३१० | १६४३ | २०००/- |
| १० | चौधरी नितीन ज्ञानदेव, अकोला | ३११ | १६४४ | २०००/- |
| ११ | पगार प्रभाकर वसंत, आमोदे | ३१२ | १६४५ | २०००/- |
| १२ | पगार अमोल अरूण, नळेगाव | ३१३ | १६४६ | २०००/- |
| १३ | खडतकर आरती वाल्मिकराव, बुलढाणा | ३१४ | १६४७ | २०००/- |
| १४ | सांगोळकर उमेन्द्र भिमराव, पातूर | ३१५ | १६४८ | २०००/- |
| १५ | देशमुख अश्विनी हरिश्चंद्र, भेंडा | ३१६ | १६४९ | २०००/- |
| १६ | हाडे प्रवीण भास्करराव, गोहोगाव | ३१७ | १६५० | २०००/- |
| १७ | किरकिरे प्रकाश लक्ष्मण, गडचिरोली | ३१८ | १६५१ | २०००/- |
| १८ | तिवारी निता नंदलाल, अकोला | ३१९ | १६५२ | २०००/- |
| १९ | वारडे विजयानंद अभिमन, वेले | ३२० | १६५३ | २०००/- |
| २० | कामटे सुनिता सुनिल, मुंबई | ३२१ | १६५४ | २१००/- |
| २१ | भोसले मनिषा भास्कर, मुंबई | ३२२ | १६५५ | २१००/- |
| २२ | तुपे संजय, नाशिक | २०१ | -- | २०००/- |
| २३ | हरमकर प्रशांत, अमरावती | २१८ | -- | ५००/- |
| २४ | कदम विश्वजीत दिलीप | २१९ | -- | १०००/- |
| २५ | जोशी श्रीराम, जळगाव | २२२ | -- | ५०००/- |
| २६ | भांडवलकर रामदास बापुराव, यवतमाळ | २२३ | ११२४ | ५०००/- |
| २७ | रंगाचार्य देवेंद्र शिवदास, अमरावती | ३२३ | १६५६ | २०००/- |

# ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, बारामती

## निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करु नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये कारण ते सर्वांना माहित असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक - सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या-त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या *'अर्थशास्त्र परिभाषा कोश'* आणि *'शासन व्यवहार कोश'* यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करुन वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरीत नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दात गोषवारा द्यावा.

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

जिल्हा:.................................
विद्यापीठ क्षेत्र: ..........................

# मराठी अर्थशास्त्र परिषद

सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र.एफ-४६१५ मुंबई.

## आजीव / साधारण सभासदत्वासाठीचा अर्ज

(कृपया अर्ज मराठीतून भरावा)

फोटो

१. संपूर्ण नाव : ..............................................................

२. महाविद्यालय/संस्थेचे नाव: ..............................................................

३. शैक्षणिक पात्रता : ..............................................................

..............................................................

४. पत्रव्यवहारासाठी पत्ता : ..............................................................

..............................................................

५. दूरध्वनी क्र.(कोड सह) :

महाविद्यालयाचा / संस्था:.................... निवास: ..................................

भ्रमणध्वनी क्र.: ............................ ई-मेल: ..................................

६. वर्गणी:

आजीव सभासद रु.३०००+ इमारत निधी रु.२०००+ सभासद सूची रु.१००= **रु.५१००/-**

(साधारण सभासद रु.३००/-)

अर्जदाराची स्वाक्षरी

श्री/श्रीमती........................................ यांचेकडून परिषदेची आजीव/साधारण सभासद वर्गणी रुपये:............ आज दि................. रोजी रोख/मनी ऑर्डर / डीडी ने मिळाली.

कार्यवाह - खजिनदार

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.६,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !



डॉ. सुहास आव्हाड,
अध्यक्ष
ज्ञानदीप,गोल्डन सिटी,
अकोले बायपासरोड,
संगमनेर-४२२ ६०५, जिल्हा अहमदनगर
भ्रमणध्वनी: ९९२२४३५८७१

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

## मराठी अर्थशास्त्र परिषद

# ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, बारामती

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एकोणचाळीसवे वार्षिक अधिवेशन अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथे दि.१९, २० व २१ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. संगमनेर येथील डॉ. सुहास आव्हाड हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रु.१२००/- आहे. जे परिषदेचे सदस्य नाहीत त्यांना साधारण शुल्क रु.३००/- अतिरिक्त भरून सहभागी होता येईल. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार.

२) पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन.

३) महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्याची फलश्रुती.

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असून तो परिषदेचे मा. अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. आयत्या वेळेच्या विषयासाठी शोधनिबंध मागवले जात नाहीत. अधिवेशनास उपस्थित राहून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

| | |
|---|---|
| डॉ. सुहास आव्हाड,<br>अध्यक्ष | प्रा. चारुदत्त गोखले,<br>कार्याध्यक्ष |
| प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर,<br>स्थानिक कार्याध्यक्ष | डॉ. आर. बी. भांडवलकर,<br>कार्यवाह-खजिनदार |
| डॉ. रामभाऊ खाडे,<br>स्थानिक कार्यवाह<br>भ्रमणध्वनी:९९२२८९५५४६ | डॉ.अविनाश निकम,<br>प्रमुख संपादक<br>अर्थसंवाद |